CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

सोलापूर | रविवार, १७ मे २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १६८ | पाने १२+८ | किंमत रु. ८/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.|
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



हिंदुत्व हा या सहस्रकातील सर्वांत महत्त्वपूर्ण असा चर्चाविषय होईल, असे संकेत या सहस्रकाच्या प्रारंभापासूनच मिळत होते. स्वाभाविकच हिंदुत्वाचे खरे स्वरूप विश्वाच्या समोर मांडण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी संघाला उचलावी लागणार आहे.

**स्व. श्रीकांत जोशी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. प्रचार प्रमुख

## महत्त्वाचे

### चांदीच्या आयातीवर नवे निर्बंध लागू

**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेतील तणाव आणि होर्मुझ सामुद्रधुनीतून होणाऱ्या जलवाहतुकीच्या प्रभावाने कच्च्या तेलाचे वाढलेले दर आणि डॉलर्सच्या तुलनेत रुपयांत होणारी घसरण पाहता केंद्र सरकारने उपाययोजना राबवायला सुरुवात केली. याचाच भाग म्हणून परदेशी चलनाच्या बचतीसाठी सरकारने शनिवारी चांदीच्या आयातीवर नवीन निर्बंध लागू केले आहेत. सरकारच्या नव्या निर्णयानुसार, आता चांदीच्या अनेक प्रकारांना निशुल्क आयात धोरणातून काढून मर्यादित आयात श्रेणीत टाकण्यात आले आहे. त्यामुळे आता परदेशातून चांदीच्या आयातीसाठी सरकारची परवानगी घेणे अनिवार्य राहणार आहे. चांदीची आयात करायची असल्यास व्यावसायिकांना ठोस कारण द्यावे लागेल.

### बेकायदेशीर बाईक टॅक्सी सेवांना सरकारचा दणका

**मुंबई :** राज्यात परवानगीशिवाय सुरू असलेल्या बाईक टॅक्सी सेवांविरोधात महाराष्ट्र सरकारने मोठी कारवाई सुरू केली असून, महाराष्ट्र सायबर विभागाने थेट अॅपल आणि गुगलला नोटिसा बजावल्या आहेत. ओला, उबर आणि रॅपिडोसारखी राईड-हेलिंग अॅप्स महाराष्ट्रात बेकायदेशीरपणे बाईक टॅक्सी सेवा पुरवत असल्याचा आरोप करीत ही अॅप्स संबंधित अॅप स्टोअर्समधून हटवण्याचा निर्देश देण्यात आला आहे. १५ मे रोजी महाराष्ट्र सायबर विभागाने जारी केलेल्या नोटिसांमध्ये अॅपल अॅप स्टोअर आणि गुगल प्ले स्टोअरवरून संबंधित अॅप्स काढून टाकण्यासह त्यांचा प्रवेश रोखण्यास सांगण्यात आले आहे. या नोटीस महाराष्ट्र सायबर विभागाच्या अतिरिक्त पोलिस महासंचालक कार्यालयामार्फत पाठवण्यात आल्या आहेत. राज्य सरकारने थेट अॅप स्टोअर कंपन्यांवर कारवाईची भूमिका घेतल्याने या निर्णयाकडे विशेष लक्ष वेधले जात आहे. राज्य सरकारच्या मते, महाराष्ट्रात सध्या बाईक टॅक्सी सेवांना अधिकृत परवानगी देण्यात आलेली नाही.

### पारुल चौधरीला सातवे स्थान

**शांघाय, १६ मे -**
राष्ट्रीय विक्रमवीर पारुल चौधरीने शनिवारी येथे झालेल्या हंगामातील पहिल्याच डायमंड लीग स्पर्धेत ३००० मीटर स्टीपलचेस शर्यत आपल्या कारकिर्दीतील दुसऱ्या सर्वोत्तम वेळेत पूर्ण करीत सातवे स्थान मिळविले. ३१ वर्षीय पारुलने अत्यंत चुरशीच्या आणि उच्च दर्जाच्या स्पर्धेत ९ मिनिटे १२.८४ सेकंदांची वेळ नोंदविली. युगांडाची २०२१ टोकियो ऑलिम्पिक विजेती पेरुथ चे्ताई हिने ८:५१.४७ वेळेसह विजेतेपद पटकावले; तर केनियाची विश्वविजेती फेथ चेरोटीच ही केवळ 0.0१ सेकंदांच्या फरकाने, ८:५१.४८ वेळेसह दुसऱ्या स्थानावर राहिली. ही पारुलची या हंगामातील पहिलीच शर्यत होती.

## 'ऑपरेशन अंतिम प्रहार'

# आठ जहाल नक्षल्यांना अटक

### सर्व माओवादी संपुष्टात आल्याचा पोलिसांचा दावा






अटक केलेल्या माओवाद्यांसह पोलिस, दुसऱ्या छायाचित्रात जप्त केलेल्या शस्त्रांसह पोलिस अधिकारी

**गडचिरोली, १६ मे**
गडचिरोली पोलिस दलाने राबविलेल्या 'ऑपरेशन अंतिम प्रहार' या विशेष मोहिमेत मोठे यश मिळवत आठ जहाल नक्षलवाद्यांना अटक केली. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा, जिवंत काडतुसे आणि ६५.३४ लाख रुपयांची रोख जप्त करण्यात आली. शासनाने या सर्वांवर ६४ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.

७ फेब्रुवारी रोजी फोदेवाडा जंगल परिसरात झालेल्या चकमकीत सी-६० जवानाच्या हत्येत सहभागी असलेल्या नक्षलवाद्यांचा शोध घेण्यासाठी गडचिरोली पोलिस अधीक्षक एम. रमेश यांच्या नेतृत्वात पोलिसांनी विशेष मोहीम सुरू केली होती. या अंतर्गत तेलंगणातून चार, कुमनार येथून दोन आणि नेताळा परिसरातून दोन अशा आठ नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली.

जप्त करण्यात आलेल्या शस्त्रसाठ्यात दोन एलएमजी, चार एके-४७, चार एसएलआर, तीन इन्सास रायफलचा समावेश आहे. अटक केलेल्या नक्षलवाद्यांमध्ये राजू उर्फ मंगडू, ज्योती, जन्नी, जयराम गावडे, मुकेश, विजय, रजिता आणि आमतीचा समावेश आहे.

या कारवाईमुळे जिल्ह्यातील नक्षल चळवळीला मोठा धक्का बसला असून, पोलिसांच्या अभिलेखावरील बहुतांश सक्रिय नक्षलवादी पकडले गेले किंवा शरण आले आहेत. कंपनी क्रमांक १० मधील महिला नक्षलवादी मोनी मडावीने छत्तीसगडमध्ये आत्मसमर्पण केल्यामुळे गडचिरोलीतील सक्रिय नक्षल नेटवर्क जवळपास संपुष्टात आल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. *(तभा वृत्तसेवा)*

### ३८ लाखांचे बक्षीस असलेले ५ नक्षलवादी शरण

गडचिरोली जिल्ह्यातील माओवादी चळवळीला आणखी एक मोठा धक्का बसला असून, ३८ लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या पाच वरिष्ठ माओवाद्यांनी शनिवारी गडचिरोली पोलिस आणि सीआरपीएफसमोर आत्मसमर्पण केले. २०२५ पासून आतापर्यंत १३७ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केल्याची माहिती पोलिसांनी दिली. आत्मसमर्पण केलेल्यांमध्ये मधु, जीवन, रजनी, मंगली रघु आणि लक्ष्मी डेंगा पुनेम यांचा समावेश आहे. या सर्वांनी अनेक वर्षे विविध दलम, प्लाटून आणि तांत्रिक पथकांमध्ये कार्यरत राहून माओवादी संघटनेत महत्त्वाची भूमिका बजावली होती.मधु ऊर्फ राकेशवर शासनाने १६ लाख, जीवन मडकाम याच्यावर आठ लाख, रजनी धुर्वा हिच्यावर सहा लाख तर, मंगली कुरसाम आणि लक्ष्मी पुनेम यांच्यावर प्रत्येकी चार लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांना केंद्र आणि राज्य शासनाकडून पुनर्वसनासाठी आर्थिक मदत देण्यात येणार आहे. यावेळी उपमहानिरीक्षक अजय कुमार शर्मा, पोलिस अधीक्षक एम. रमेश, अपर पोलिस अधीक्षक कार्तिक मधिरा, गोकुल राज जी. यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# पुण्यातील शिक्षिका मनीषा मांढरेला अटक

### नीट पेपरफूट प्रकरण




**पुणे, १६ मे**
देशभरात गाजत असलेल्या 'नीट' प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरणात पुण्यातील मॉडर्न महाविद्यालयातील जीवशास्त्राची शिक्षिका मनीषा गुरुनाथ मांढरेला सीबीआयने दिल्लीतून अटक केली. मांढरे परीक्षा प्रक्रियेशी (एनटीए) संबंधित आहे. तिचा या प्रकरणाशी संबंध असल्याचे उघडकीस आल्यानंतर कारवाई करण्यात आल्याचे सीबीआय अधिकाऱ्यांनी सांगितले.

मनीषा मांढरे वरिष्ठ शिक्षिका आहे. तिचा संबंध परीक्षा प्रक्रियेशी होता. या प्रकरणात दिल्लीत चौकशी केल्यानंतर तिला अटक करण्यात आली. परीक्षा प्रक्रियेत तिचा संबंध वनस्पतीशास्त्र तसेच प्राणीशास्त्र विषयाच्या प्रश्नपत्रिकांशी होता.

या प्रकरणी बिबवेवाडीतील ब्युटी पार्लर चालक मनीषा वाघमारेला अटक झाली होती. वाघमारेने विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी घरी बोलावले होते. तेथे मनीषा मांढरेने विद्यार्थ्यांना प्रश्नोत्तरांची अचूक माहिती दिल्याचे तपासात समोर आल्यानंतर तिला सीबीआयने अटक केली.

नीट प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणात सीबीआयने अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथून धनंजय लोखंडेला ताब्यात घेतले. लोखंडे पुण्यातील काही जणांच्या संपर्कात असल्याची माहिती तपासात मिळाली. त्यानंतर, बिबवेवाडी परिसरात ब्युटी पार्लर चालविणाऱ्या मनीषा वाघमारे आणि धनंजय लोखंडेला अटक करण्यात आली.

सीबीआयने देशातील विविध भागांत छापे टाकून कागदपत्रे, मोबाईल संच तसेच अन्य इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त केली आहेत. जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे आणि अहिल्यानगर परिसरातून आतापर्यंत नऊ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणातील पाच आरोपींना सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. *(तभा वृत्तसेवा)*

### दोन्ही मनीषा एकाच सोसायटीतील

मनीषा वाघमारे आणि मनीषा मांढरे या दोघी पुण्यातील बिबवेवाडी येथील सुखसागरनगर परिसरातील गंगा ओशन सोसायटीत राहत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणाची सुरुवात याच ठिकाणाहून झाली का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, मनीषा वाघमारेचे पती दंतवैद्यकीय तज्ज्ञ असून, मनीषाला अटक झाल्यापासून ते बेपत्ता असल्याची माहिती आहे.

### मांढरेची सात महिन्यांवर होती निवृत्ती

मनीषा मांढरे २४ वर्षांपासून शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयात अकरावी आणि बारावीला शिकवत आहेत. पुढील सात महिन्यांत त्या निवृत्त होणार होत्या. मात्र, त्यापूर्वीच 'नीट-यूजी' पेपरफुटी प्रकरणातील त्यांच्या कथित सहभागाचा उलगडा झाला.

### टीईटीच्या तारखेतही बदल

नीट परीक्षेसाठी नॅशनल टेस्टिंग एजन्सीने देशभरातील विविध परीक्षा केंद्र नीट परीक्षेसाठी घेतले असल्याने टीईटीची तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. नीट व टीईटीसाठी काही ठिकाणी एकच केंद्र असल्यामुळे टीईटी परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेतला जाणारी टीईटी आता २१ जून ऐवजी २८ जून रोजी सकाळी साडेदहा ते दुपारी एक या वेळेत घेतली जाणार आहे. दुसरा पेपर त्यात दिवशी पुपारी अडीच ते एक या वेळेत होईल.

# प्राचीन भारतीय संस्कृती लोकांच्या हृदयात : पंतप्रधान

**ॲम्स्टरडॅम, १६ मे**
काळाच्या ओघात जगातील अनेक संस्कृती लुप्त झाल्या, पण भारताची प्राचीन संस्कृती आजही येथील लोकांच्या हृदयात स्पंदन करते. पिढ्या बदलल्या, देश बदलले, वातावरण बदलले पण कौटुंबिक मूल्ये तशीच राहिली आणि आपलेपणाची भावनाही टिकून राहिली आहे. भारतमातेची मुले कुठेही असली तरी, आपुलकी आणि जीवनाला उत्सवाप्रमाणे साजरे करण्याची भावना त्यांनी कायम जोपासली, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी नेदरलँडसमधील एका कार्यक्रमात भारतीय वंशांच्या नागरिकांना संबोधित करताना म्हणाले.



आज यद्ध आणि ऊर्जा संकटामुळे मानवतेसमोर अनेक मोठी आव्हाने आहेत. परिस्थिती कायम राहिल्यास अनेक दशकांच्या कामावर पाणी फिरेल आणि जगातील मोठी लोकसंख्या गरिबीत अडकून पडेल, असा इशारा त्यांनी यावेळी दिला. संयुक्त अरब अमिरातीचा (यूएई) दौरा आटोपून मोदी शनिवारी नेदरलँड्समध्ये पोहोचले. द हेग येथे अनिवासी भारतीयांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाला संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले, द हेग हे भारतीय मैत्रीचे एक जिवंत प्रतीक आहे. मानवी इतिहासात अनेक संस्कृती विकसित झाल्या आणि लयास गेल्या, मात्र भारतीय संस्कृती विकसित होत गेली आणि अजूनही लोकांच्या जीवनाचा भाग आहे. *(वृत्तसंस्था)*

# 'फिल्मी स्टाईल'ने एटीएम मशीनच पळवले

### सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ मे-**
'फिल्मी स्टाईल'ने एटीएम मशीन पळविल्याची धक्कादायक घटना जुने विडी घरकुल परिसरातील सग्गम नगर येथे शुक्रवारी मध्यरात्री ३ वाजता घडली. या धाडसी चोरीमुळे एकच खळबळ उडाली आहे. चोरट्यांनी चारचाकी वाहनाच्या सहाय्याने एटीएम मशीनला मजबूत दोरखंड बांधला आणि जोराने ओढून मशीन बाहेर काढले. त्यानंतर संपूर्ण एटीएम मशीन वाहनात टाकून आरोपी घटनास्थळावरुन पसार झाले.




घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. एटीएम सेंटरमधील अंतर्गत दोन तसेच बाहेरील एक अशा तीन सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज पोलिसांनी ताब्यात घेतले. फुटेजमध्ये संशयित वाहन आणि काही हालचाली कैद झाल्याची माहिती समोर येत आहे. अतिशय नियोजनबध्द आणि धाडसी पध्दतीने हा प्रकार घडल्याचा पोलिसांनी प्राथमिक अंदाज व्यक्त केला.

### एटीएम मशीनमधील रकमेविषयीची माहिती

चोरीला गेलेल्या एटीएम मशीनमध्ये किती रक्कम होती? याबाबत अधिकृत माहिती अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. संबंधित बँकेचे अधिकाऱ्यांनीही घटनास्थळी दाखल होत परिस्थितीचा आढावा घेतला.

# मान्सून अंदमान-निकोबारमध्ये दाखल

### केरळम्‌मध्ये २६ मे रोजी होणार दाखल
### 'आयएमडी'ची माहिती



**पुणे, १६ मे**
देशभरात उष्णतेच्या झळांनी नागरिक हैराण झाले असतानाच भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) मान्सून अंदमान-निकोबार द्वीपसमूहात दाखल झाल्याची दिलासादायक माहिती दिली. यंदा नैऋत्य मान्सून २६ मे रोजी केरळम्‌मध्ये दाखल होण्याची शक्यता असून, तो नेहमीपेक्षा तब्बल सहा दिवस आधी पोहोचण्याचा अंदाज आहे.

अंदाजामध्ये चार दिवसांचा फरक गृहीत धरण्यात आला आहे. सामान्यतः नैऋत्य मान्सूनचा केरळम्‌मधील प्रवेश १ जून रोजी होतो. मात्र, यंदा वातावरणीय स्थिती अनुकूल असल्याने मान्सूनचे आगमन वेळेआधी होण्याचे संकेत मिळत आहेत. सलग दुसऱ्या वर्षी मान्सून केरळम्‌मध्ये लवकर दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली. गेल्या वर्षी मान्सून २४ मे रोजी केरळम्‌मध्ये दाखल झाला होता.

सध्या हिंद महासागराच्या विस्तृत क्षेत्रावर विषुववृत्त ओलांडून येणाऱ्या नैऋत्य मौसमी वाऱ्यांचा प्रवाह सक्रिय झाला आहे. त्याचबरोबर नैऋत्य आणि लगतच्या बंगालच्या उपसागरावर ठळक कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले असून, त्याच्या प्रभावामुळे अंदमान-निकोबार बेटांसह तामिळनाडू आणि आंध्रप्रदेश किनारपट्टी भागांत सर्वदूर पावसाचे वातावरण निर्माण झाले आहे. मान्सून आगमनासाठी आवश्यक असलेले निकष झपाट्याने पूर्ण होत असल्याने दक्षिण बंगालचा उपसागर, अंदमान समुद्र आणि अंदमान-निकोबार बेटांवर शनिवारी मान्सून दाखल होऊन, यंदाच्या पावसाळी हंगामाची अधिकृत सुरुवात होणार असल्याचा अंदाज 'आयएमडी'ने वर्तवला आहे.

मान्सून आगमनाचा अंदाज वर्तवण्यासाठी भारतीय हवामान विभागाने अत्याधुनिक स्वदेशी सांख्यिकीय मॉडेल विकसित केले आहे. या मॉडेलमध्ये उत्तर-पश्चिम भारतातील किमान तापमान, दक्षिण द्वीपकल्पातील पूर्वमान्सून पर्जन्य, दक्षिण चीन समुद्रावरील ओएलआर, आग्नेय हिंदी महासागरातील वारे, नैऋत्य पॅसिफिक क्षेत्रातील ओएलआर आणि ईशान्य हिंद महासागरातील निम्नस्तरीय वारे अशा सहा महत्त्वाच्या घटकांचा विचार केला जातो. *(तभा वृत्तसेवा)*

### काय सांगते आकडेवारी?

| वर्ष | मान्सून दाखल | 'आयएमडी'चा अंदाज |
|---|---|---|
| २०२० | १ जून | ५ जून |
| २०२१ | ३ जून | ३१ मे |
| २०२२ | २९ मे | २७ मे |
| २०२३ | ८ जून | ४ जून |
| २०२४ | ३० मे | ३१ मे |
| २०२५ | २४ मे | २७ मे |

### यंदा अल-निनोचा प्रभाव

या वर्षी अल-निनोचा प्रभाव राहण्याची शक्यता अमेरिकेची हवामान संस्था 'नॅशनल ओशनिक अॅण्ड अॅटमॉस्फेरिक अॅडमिनिस्ट्रेशन'ने वर्तवली आहे. यामुळे कमकुवत मान्सून, दुष्काळ आणि उष्णतेच्या लाटांची शक्यता वाढली आहे. अल निनो ही एक हवामानविषयक घटना आहे, जी पॅसिफिक महासागरातील पाणी गरम झाल्यावर घडते. यामुळे मान्सूनच्या वाऱ्यांची दिशा बदलते. परिणामी, भारत आणि आग्नेय आशियामध्ये कमी पाऊस आणि तीव्र उष्णता जाणवेल.

# भोजशाला येथे वाग्देवीची पूजा



**धार, १६ मे**
मध्यप्रदेश उच्च न्यायालयाच्या इंदूर खंडपीठाने धार येथील भोजशाला-कमाल मौला परिसराला राजा भोज यांच्या काळातील वाग्देवीचे (देवी सरस्वती) मंदिर मानले आहे. न्यायालयाने हिंदू पक्षाला येथे पूजेचा अधिकार दिला आहे.

निकालानंतर शनिवारी सकाळी भाविकांनी आणि विविध समित्यांच्या पदाधिकाऱ्यांनी शांततापूर्ण वातावरणात भोजशालेत पोहोचून दर्शन घेतले आणि पूजा-अर्चा केली. लोकांनी हनुमान चालिसाचे पठणही केले. उच्च न्यायालयाने ७ एप्रिल २००३ चा आदेश अंशतः रद्द केला आहे. या आदेशात मुस्लिम समुदायाला शुक्रवारी निश्चित वेळेसाठी नमाज पठणाची परवानगी देण्यात आली होती, असे हिंदू पक्षाचे वकील विष्णू शंकर जैन यांनी सांगितले.

अनेक वर्षांनंतर त्यांना कोणत्याही अडथळ्याशिवाय पूजा करण्याची संधी मिळाली, असे दर्शनानंतर भाविकांनी सांगितले. भोजशालेचा प्रत्येक कण हे एक मंदिर असल्याचे दर्शवतो, असे भोजशाला मुक्ती यज्ञाचे संयोजक गोपाल शर्मा म्हणाले. त्यांना सर्वोच्च न्यायालयात जाण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे, परंतु भोजशाला मंदिर होते, मंदिर आहे आणि नेहमीच मंदिर राहील, असे मुस्लिम पक्षाच्या पुढील कायदेशीर कारवाईवर ते म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### रॉबर्ट वाढेरांना जामीन मंजूर

**नवी दिल्ली** : शिकोहपूर जमीन व्यवहाराशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांचे पती, व्यावसायिक रॉबर्ट वाढेरा यांना जामीन मंजूर करण्यात आला. या निर्णयावर ते म्हणाले, मी निर्भय आहे. माझ्याकडे लपवण्यासारखे काही नाही.



मला फक्त ईडीचा सामना करायचा आहे. परिस्थितीला तोंड देण्यासाठी मी सक्षम आहे. माझा भारतीय न्यायव्यवस्थेवर संपूर्ण विश्वास आहे. मला माहीत आहे की, ईडी सरकारद्वारे चालवली जाते आणि सरकारच्या सांगण्यावरूनच काम करीत राहील, असा आरोपही त्यांनी केला. रॉबर्ट वाढेरा शनिवार राऊस ॲव्हेन्यू न्यायालयात हजर झाले. तिथे त्यांना ५०,००० रुपयांच्या मुचलक्यावर जामीन मंजूर करण्यात आला. वाढेरा यांच्या वकिलाने न्यायालयात असा युक्तिवाद केला की, या प्रकरणात त्यांना यापूर्वी कधीही अटक झाली नव्हती. त्यामुळे त्यांना जामीन मंजूर करण्यात यावा. त्यांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने जामीन मंजूर केला. या प्रकरणाची पुढील सुनावणी १० जुलै रोजी होणार आहे.

### आझम खान यांना दोन वर्षांची शिक्षा

**रामपूर** : जिल्हाधिकाऱ्यांविरुद्ध अपमानजनक टिप्पणी केल्याच्या आरोपात उत्तरप्रदेशच्या रामपूर जिल्हा सत्र न्यायालयाने समाजवादी पक्षाचे नेते आझम खान यांना दोषी ठरवत दोन वर्षांचा तुरुंगवास आणि २० हजारांचा दंड अशी शिक्षा सुनावली. २०१९ च्या लोकसभा निवडणूक प्रचारादरम्यान तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांना धमकावणे आणि त्यांच्याविरोधात अपमानजनक टिप्पणी केल्याच्या आरोपात भोट पोलिस ठाण्यात आझम यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला होता. पोलिसांनी तपास करून मागील वर्षी न्यायालयात आरोपपत्र सादर केले. दोन्ही पक्षाच्या युक्तिवादानंतर मागील आठवड्यात न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता. साक्षीदारांचे जबाब आणि पोलिसांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे आझम यांना दोषी ठरवत दोन वर्षांचा तुरुंगवास आणि २० हजारांच्या दंडाची शिक्षा सुनावली. न्यायालयाच्या निर्णयानंतर आझम यांनी शिक्षेला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. दरम्यान, आझम यांच्याकडे असलेल्या दोन पॅन कार्ड प्रकरणात रामपूर न्यायालयात सुनावणी झाली. शनिवारी सरकारी पक्षाच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने पुढील सुनावणीसाठी १८ मे ही तारीख निश्चित केली आहे.

# कामगारांच्या आंदोलनाला उत्तराखंडमध्ये हिंसक वळण

**पगारवाढीच्या मागणीसाठी निदर्शने | सेलाक्की औद्योगिक क्षेत्रात जाळपोळ-तोडफोड | दगडफेकीत २५ पोलिस जखमी**

◆ **डेहराडून, १६ मे**

उत्तराखंडची राजधानी डेहराडूनच्या विकासनगर भागातील सेलाक्की औद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्या आंदोलनाला शनिवारी हिंसक वळण लागले. पगारवाढीसह विविध मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या कामगारांनी कारखान्याबाहेर दगडफेक, जाळपोळ आणि तोडफोड केली. यात २५ पोलिस जखमी झाले. परिस्थिती चिघळल्याने संपूर्ण परिसरात अतिरिक्त पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला. याप्रकरणात ३० जणांना ताब्यात घेण्यात आले.

पगारवाढ आणि इतर मागण्यांसाठी चार दिवसांपासून विकासनगरमधील सेलाक्की औद्योगिक क्षेत्रातील कामगार आंदोलन करीत आहेत. मागण्यासंदर्भात दखल न घेतल्याने शनिवारी संतापलेल्या कामगारांनी परिसरातील कारखान्यात घुसून तोडफोड आणि जाळपोळ केली. कामगारांना रोखण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी पोलिसांवर दगडफेक करीत वाहनांना आग लावली. यात २५ पोलिस गंभीर जखमी झाल्याची माहिती पोलिस अधीक्षक पंकज गैरोला यांनी दिली. कामगारांच्या हिंसक आंदोलनानंतर सेलाक्की औद्योगिक क्षेत्रात संचारबंदी लागू करण्यात आली तसेच पोलिसांचे अतिरिक्त पथक घटनास्थळी तैनात करण्यात आले. याप्रकरणी ३० कामगारांना ताब्यात घेतले असून, त्यांची चौकशी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)



### मागण्या मान्य होऊनही आंदोलन

गैरोला यांनी सांगितले की, शुक्रवारी कामगार आयुक्त आणि कारखाना व्यवस्थापन यांच्यात कामगारांच्या मागण्यांवर एकमत झाले होते. कामगार संघटनांनी यावर समाधान व्यक्त करीत शनिवारपासून कामावर रुजू होण्याचे आश्नासन दिले होते. मात्र, शनिवारी त्यांनी पुन्हा आंदोलन करत जाळपोळ आणि तोडफोड केली. याप्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक पथक गठित केले आहे.

### किमान वेतनात वाढ : मुख्यमंत्री धामी

कामगारांच्या आंदोलनावर बोलताना मुख्यमंत्री धामी म्हणाले, त्यांच्या मागण्यासंदर्भात सरकार गंभीर असून, हिंसा कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही. कामगार आयोगाने सर्व उद्योगांना कामगारांसाठी ठरवलेल्या मानकांचे पालन करण्याचे निर्देश दिले. किमान वेतन, ओव्हरटाईम किंवा बोनस यांसारख्या कामगार संबंधित कोणत्याही बाबींमध्ये हलगर्जीपणा खपवून घेणार नाही. अकुशल कामगारांना १३,०१८ आणि अर्ध-कुशल कामगारांचा पगार वाढवून १६,९०० करण्यात आला आहे. नवीन वेतन दर १ एप्रिल पासून लागू असेल. कामगारांनी अफवांवर विश्वास ठेवू नये.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी कर्नाटकच्या बंगळुरू येथील आर्ट ऑफ लिव्हिंग आश्रमाला भेट दिली. यावेळी त्यांनी वासरांसोबत काही वेळ घालवला

# भारतीय तरुणांचा मला अभिमान

## 'त्या' वक्तव्यावर सरन्यायाधीशांचे स्पष्टीकरण

◆ **नवी दिल्ली, १६ मे**

सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी शुक्रवारी तरुण पिढीबाबत केलेल्या वक्तव्यावरून झालेल्या गदारोळानंतर शनिवारी स्पष्टीकरण दिले. माध्यमांनी माझ्या वक्तव्याचा विपर्यास केला, असा आरोप करीत सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले की, मला भारतीय तरुणांचा अभिमान आहे. माझी टिप्पणी देशातील तरुणांना उद्देशून नव्हती तर, बनावट पदव्या घेऊन व्यवस्थेत घुसलेल्या परजीवींना उद्देशून होती.

सरन्यायाधीश पुढे म्हणाले, शुक्रवारी एका खटल्याच्या सुनावणीदरम्यान मी केलेल्या तोंडी वक्तव्याचा माध्यमांनी कसा विपर्यास केला, हे वाचून मला खूप दुःख झाले. मी विशेषतः अशा लोकांवर टीका केली, जे बनावट आणि खोट्या पदव्यांच्या मदतीने कायद्यासारख्या क्षेत्रात घुसले आहेत. अशा काही व्यक्तींनी माध्यम, समाज माध्यम आणि इतर प्रतिष्ठित व्यवसायांमध्येही शिरकाव केला आहे म्हणूनच ते परजीवींसारखे आहेत. माझा तरुणांवर अढळ विश्वास आहे. तरुणांवर टीका केल्याचे आरोप पूर्णपणे निराधार आणि खोटे आहे असेही ते म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

# अवैध वास्तव्य करणारे विदेशी हद्दपार

## गोवा सरकारची कारवाई

◆ **पणजी, १६ मे**

व्हिसाची मुदत संपल्यानंतरही गोव्यात वास्तव्य करणाऱ्या नऊ विदेशी नागरिकांना हद्दपार करण्यात आले आहे, तर आणखी सात जणांची ओळख पटली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

गोवा पोलिसांच्या माहितीनुसार, या महिन्यात नऊ विदेशी नागरिकांना हद्दपार करण्यात आले. यात युगांडाचे पाच, रशियाचे तीन आणि नायजेरियाच्या एका नागरिकाचा समावेश आहे. त्यांना योग्य प्रवर्गांतर्गत काळ्या यादीत टाकण्याच्या प्रस्तावावर कार सुरू करण्यात आले आहेत, असे त्यांनी सांगितले. उत्तर गोव्याच्या किनारपट्टी भागात राबविण्यात आलेल्या मोहिमेत व्हिसाची मुदत संपल्यानंतरही वास्तव्य केल्याबद्दल सात नागरिकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे विदेशी प्रादेशिक नोंदणी कार्यालयाने सांगितले. या सात जणांमध्ये रशियाचे पाच आणि युक्रेन व दक्षिण आफ्रिकेचा प्रत्येकी एक नागरिक आहे. त्यांच्याविरुद्ध आवश्यक कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे, असे विदेशी प्रादेशिक नोंदणी कार्यालयाने निवेदनात म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

# इसिसचा दुसरा सर्वोच्च कमांडर ठार

## अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची माहिती

◆ **वॉशिंग्टन, १६ मे**

अमेरिकी लष्कराने नायजेरियामध्ये इसिसचा दुसरा सर्वोच्च जागतिक कमांडर अबू-बिलाल अल-मिनुकीला ठार केले,



अशी माहिती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी ट्रूथ या समाज माध्यमावर दिली.

त्यांनी या मोहिमेचे वर्णन एक गुंतागुंतीची आणि सुनियोजित मोहीम असे केले. अमेरिकी लष्कर आणि नायजेरियन सशस्त्र दलांनी संयुक्तपणे ही कारवाई अत्यंत अचूकतेने पार पाडली. ट्रम्प यांनी अल-मिनुकीचे वर्णन जगातील सर्वांत सक्रिय दहशतवादी असे केले.

ट्रम्प म्हणाले की, अल-मिनुकीला वाटले होते की तो आफ्रिकेत लपून राहू शकतो. परंतु, अमेरिकेकडे असे स्रोत होते ज्यांनी त्याच्या प्रत्येक हालचालीची माहिती पुरवली. या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना ट्रम्प म्हणाले की, हा दहशतवादी आता आफ्रिकेतील लोकांना घाबरवू शकणार नाही आणि अमेरिकन लोकांवर हल्ल्यांचे कट रचू शकणार नाही. या दहशतवाद्याचा खात्मा केल्याने जगभरातील आयसिसचे जाळे कमकुवत होईल, असा त्यांना विश्वास आहे. ◀(वृत्तसंस्था)

### कोण आहे अबू-बिलाल?

अबू-बिलाल अल-मिनुकी जो अबू बक्र इब्न मुहम्मद इब्न अली अल-मनुकी या नावानेही ओळखला जायचा. तो प्रामुख्याने आफ्रिकेच्या साहेल प्रदेशात सक्रिय होता. हा प्रदेश अटलांटिक महासागरापासून तांबड्या समुद्रापर्यंत सुमारे ५,९०० किलोमीटर पसरलेला आहे. यात सेनेगल, मॉरिटानिया, माली, बुर्किना फासो, नायजर, नायजेरिया, चाड आणि सुदान यांसारख्या देशांचा समावेश आहे. त्याचा प्रभाव गांबिया, गिनी, कॅमेरून आणि एरिट्रियापर्यंतही पसरला होता. अल-मिनुकी हा इस्लामिक स्टेट वेस्ट आफ्रिका प्रोव्हिन्सचा एक वरिष्ठ कमांडर होता.

# बंगालमध्ये जात प्रमाणपत्रांची होणार पडताळणी

**ममता बॅनर्जींच्या राजवटीत १.६९ कोटी लोकांना वाटप**



◆ **कोलकाता, १६ मे**

पश्चिम बंगाल सरकारने गत १५ वर्षांत राज्यात जारी केलेल्या सर्व जात प्रमाणपत्रांची पुन्हा पडताळणी करण्याचा निर्णय घेतला आहे. बंगाल मागासवर्गीय विकास विभागाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना २०११ ते २०२६ या कालावधीत जारी केलेल्या एससी, एसटी आणि ओबीसी प्रमाणपत्रांची पुन्हा पडताळणी करण्याचा निर्देश दिला आहे. या कालावधीत माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसचे सरकार होते.

नबन्ना सचिवालयातील सूत्रांनुसार, बनावट कागदपत्रे सादर करून बेकायदेशीरपणे ओबीसी किंवा इतर मागासवर्गीय प्रमाणपत्र मिळवणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाईचा निर्देश विभागाने जिल्हा अधिकाऱ्यांना दिला आहे. या १५ वर्षांत राज्यात सुमारे १.६९ कोटी मागासवर्गीय प्रमाणपत्रे जारी करण्यात आली होती. यात अंदाजे १ कोटी अनुसूचित जाती (एससी), २१ लाख अनुसूचित जमाती (एसटी) आणि ४८ लाख इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रमाणपत्रांचा समावेश आहे.

**प्रमाणपत्र वितरणातील अनियमिततेबाबत तक्रारी**

आरक्षणासारख्या लाभांचा कोणीही गैरवापर करू नये, हे सुनिश्चित करण्यासाठी सर्व १.६९ कोटी प्रमाणपत्रांची तपासणी केली जात आहे. मागील सरकारच्या काळात काही प्रमाणपत्रे जारी करण्यामध्ये अनियमितता झाल्याच्या तक्रारी समोर आल्या, त्यामुळे विभागाने हे कठोर पाऊल उचलले आहे. पैसे किंवा इतर लाभांच्या बदल्यात अयोग्य व्यक्तीला जात प्रमाणपत्र जारी केल्याचे आढळलेल्या कोणत्याही सरकारी अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्याचा निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनाही देण्यात आला आहे. ◀(वृत्तसंस्था)

### निकषांमध्ये फेरबदल केल्याचा भाजपाचा आरोप

मे २०२४ मध्ये, कलकत्ता उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २०१० नंतर बंगालमध्ये जारी केलेली सर्व ओबीसी प्रमाणपत्रे बेकायदेशीर ठरवून अवैध घोषित केली. २०१० नंतर तयार केलेली ओबीसी यादी कायद्यानुसार नव्हती, असे न्यायालयाने म्हटले होते. गतवर्षी डिसेंबरमध्ये, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाने बंगालमधील ३५ जातींना केंद्रीय ओबीसी यादीतून वगळले. या सर्व जाती मुस्लिम समाजाच्या होत्या. मागील ममता बॅनर्जी सरकारने विशिष्ट समाजांना फायदा व्हावा यासाठी ओबीसी यादीतील समावेशाच्या निकषांमध्ये फेरफार केल्याचा आरोप भाजपाने बऱ्याच काळापासून केला आहे.

# मनोज जरांगेंचे ३० मेपासून उपोषण

◆ **आंतरवाली, १६ मे**

मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी ३० मेपासून आंदोलन करणार असल्याची घोषणा केली. ३० मे पूर्वी सर्वांना जात प्रमाणपत्र द्यावे, नाही तर ३० तारखेपासून बेमुदत उपोषण सुरू करेल, असे त्यांनी म्हटले आहे.

माझे देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल वाईट मत नाही. पण, माझ्या समाजाचे वाटोळे होणार असेल तर मी कोणालाच मोजणार नाही. मला मित्र नको, मंत्र्यांशी संबंध नको मला केवळ माझ्या समाजाचे लेकरे मोठी करायची आहेत. मी फडणवीस यांना दोष देत नाही. हैदराबादचा जीआर काढला पण प्रमाणपत्र रोखले. ते आता बंद कसे झाले, तुम्हाला मराठ्यांनीच मुख्यमंत्री केले आहे हे लक्षात ठेवा, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले. मराठा आरक्षणासाठी सरकारने सातारा संस्थानच्या गॅझेटचा जीआर काढू, असे सरकारने सांगितले होते, पण तसे काही केले नाही. आंदोलन केल्याशिवाय सरकार काही ऐकत नाही.

हैदराबाद गॅझेटनुसार ३०८ का असेना नोंदी निघाल्या ना, अधिकारी सांगतात सरकारने आदेश दिले नाही, मग काय आमच्या पोरांचे वाटोळे झाल्यावर सरकार आदेश देणार का, असा प्रश्न मनोज जरांगे पाटील यांनी केला. ◀(वृत्तसंस्था)




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या काटकसरीच्या आवाहनानंतर इंधनाच्या बचतीबाबत डिजिटल क्रिएटर अरुण हरयाणी यांनी हातात पोस्टर घेऊन मेट्रोत जनजागृती केली.

### अभिषेक बॅनर्जींच्या कंपन्यांची चौकशी

◆ **कोलकाता. १६ मे**

तृणमूल काँग्रेसचे नेते अभिषेक बॅनर्जी आणि इतर नेत्यांच्या मालमत्ता आणि कंपन्यांच्या चौकशीचा आदेश शनिवारी मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांनी पोलिस विभागाला दिले.

राजकीय हिंसाचार आणि गुन्हेगारीच्या प्रकरणांचा तपास करण्याचा भाग म्हणून मालमत्तांची चौकशी केली जाणार असल्याचे शुभेन्दू यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

उत्पन्नाचे स्रोत आणि मालमत्तांचा ताळमेळ न दिसल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येईल. केंद्र सरकारच्या निधीतील कथित भ्रष्टाचाराची चौकशी केली जाणार आहे. यासंदर्भात सरकारकडे अनेक तक्रारी आल्या आहे. अभिषेक बॅनर्जी यांच्या 'लिप्स ॲण्ड बाउंड्स' या कंपनीच्या मालमत्तेची संपूर्ण यादी मिळाली असून, त्याची सखोल चौकशी केली जाईल. आसनसोलमधील सरकारी मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांकडून भरपाईची वसुली केली जाईल. त्यांच्या वैयक्तिक मालमत्ता जप्त करून लिलाव केला जाईल. ◀(वृत्तसंस्था)

# भारतीय वस्तूंवरील शुल्क बेकायदेशीर

## नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाची आदेशाला स्थगिती

◆ **काठमांडू, १६ मे**

भारताच्या सीमाभागातून नेपाळमध्ये येणाऱ्या वस्तूंच्या आयातीवर सीमाशुल्क आकारण्याच्या बालेन शाह सरकारचा आदेश नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाने शनिवारी स्थगित केला. भारतासोबत झालेल्या करारानुसार तेथील उत्पादनांवर शुल्क आकारणे बेकायदेशीर असल्याचे न्यायालयाने निर्णय देताना स्पष्ट केले.

भारतातून आणल्या जाणाऱ्या १०० नेपाळी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या जीवनावश्यक वस्तूंवर शुल्क वसूल करण्याचे आदेश शाह यांनी दिले होते. नव्या नियमांवर सीमावर्ती भागातील नागरिकांनी आणि ग्राहकांनी तीव्र आक्षेप घेत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. यावर शनिवारी झालेल्या सुनावणीत दोन्ही पक्षांची बाजू ऐकून घेतल्यावनंतर न्या. हरी प्रसाद फुयाल आणि न्या. टेक प्रसाद ढुंगाना यांच्या न्यायासनाने भारतीय वस्तूंवर शुल्क आकारण्याचा निर्णय रद्द केला. पुढील आदेशापर्यंत कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये, असे आदेशात नमूद केले. सरकारचा आदेश बेकायदेशीर असून, नियमांचे उल्लंघन करणारा आहे.

**नागरिकांमध्ये संताप**

याचिकाकर्त्यांच्या वकिलाने युक्तिवादात सांगितले की, सरकारच्या निर्णयामुळे नेपाळ-भारत सीमेवरील अनेक तपासनाक्यांवर गोंधळ आणि तणावाचे वातावरण आहे. सीमेजवळ राहणारे अनेक नेपाळी नागरिक स्वस्त दरात जीवनावश्यक आणि घरगुती वस्तू खरेदी करण्यासाठी वारंवार भारतीय बाजारपेठांमध्ये जात असतात. मात्र, हा नियम लागू झाल्यानंतर सीमा अधिकाऱ्यांनी भारतातून परतणाऱ्या नागरिकांची तपासणी आणि चौकशी वाढवली आहे. ◀(वृत्तसंस्था)

# कामाच्या ठिकाणी 'पॉश' कायद्याची कडक अंमलबजावणी

### राज्यभर धडक तपासणी मोहीम

◆ **मुंबई, १६ मे**

राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खासगी क्षेत्रातील महिला कर्मचाऱ्यांना सुरक्षित आणि सन्मानजनक वातावरण मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने कंबर कसली आहे. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ अर्थात (पॉश) कायद्याची राज्यभरात कडक अंमलबजावणी करण्याचा निर्देश महिला व बाल विकास विभागाने दिला आहे. यासंदर्भात एक महत्त्वपूर्ण शासन परिपत्रक जारी करण्यात आले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर थेट दंडात्मक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि विविध आस्थापनांची कसून तपासणी करण्यासाठी विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, राज्यभर धडक मोहीम राबवली जाणार आहे. ◀(तभा वृत्तसेवा)



### अंतर्गत तक्रार निवारण समिती बंधनकारक

शासनाच्या नवीन निर्देशानुसार, ज्या आस्थापनांमध्ये १० किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, अशा सर्व ठिकाणी अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करणे आता बंधनकारक असणार आहे. या समितीच्या रचनेबाबत शासनाने कडक अटी घातल्या आहेत.

### नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई!

या तपासणी मोहिमेदरम्यान ज्या आस्थापनांमध्ये त्रुटी आढळतील किंवा पॉश कायद्याचे उल्लंघन झाल्याचे समोर येईल, अशा संस्थांवर-२०१३ च्या कलम २६ नुसार कडक दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

### ३१ मुद्यांची विशेष तपासणी सूची

महिला व बाल विकास विभागाने या मोहिमेसाठी एक विशेष तपासणी सूची तयार केली आहे. यामध्ये एकूण ३१ मुद्द्यांचा समावेश असून, त्याद्वारे संबंधित कार्यालयाचे अंकेक्षण केले जाईल.


- १. कंपनीचे स्वतंत्र पॉश धोरण आहे का?
- २. कर्मचाऱ्यांसाठी नियमित जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रम होतात का?
- ३. वार्षिक अहवाल वेळेत सादर केला जातो का?
- ४. पोर्टलवर आस्थापनेची नोंदणी झाली आहे का?

### अटी पुढील प्रमाणे

- **५० टक्के महिला सदस्य** : समितीमध्ये किमान ५० टक्के महिला सदस्यांचा समावेश अनिवार्य आहे.
- **महिला अध्यक्ष** : आस्थापनेतील वरिष्ठ महिला कर्मचारी या समितीच्या अध्यक्ष असतील.
- **बाह्य तज्ज्ञ**: समितीमध्ये एखाद्या नामांकित स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधीचा समावेश आवश्यक राहील.
- **तक्रारींवर सात दिवसांत कारवाई** : महिलांना त्यांच्या तक्रारी नोंदवण्यासाठी ई-मेल, लेखी अर्ज आणि केंद्र सरकारच्या-(शी-बॉक्स) या ऑनलाईन पोर्टलची सुविधा उपलब्ध करून देण्याचा आदेश देण्यात आला आहे.
- **महत्त्वाचा नियम** : तक्रार प्राप्त झाल्यानंतर ७ दिवसांच्या आत त्यावर कायदेशीर कारवाई सुरू करणे बंधनकारक राहील. संपूर्ण चौकशी दरम्यान गोपनीयता राखली जाईल आणि पीडित महिलेला मानसिक त्रास होणार नाही याची काळजी घेत, आवश्यकतेनुसार अंतरिम दिलासाही दिला जाईल.

# मादकपदार्थ तस्करांचे २०४७ पर्यंत उच्चाटन

## अमित शाह यांची घोषणा ● 'ड्रग्ज'मुक्त भारताचा आराखडा तयार



**नवी दिल्ली, १६ मे**

देशातील मादकपदार्थांचा वाढता धोका आणि यात सहभागी तस्करांचे उच्चाटन करण्यासाठी सरकारने आराखडा तयार केला आहे. २०४७ पर्यंत ड्रग्ज मुक्त भारत आणि तस्करांची पाळेमुळे उद्ध्वस्त केली जातील, अशी घोषणा शनिवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने २०४७ पर्यंत देशाला मादपदार्थ मुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, असे अमित शाह यांनी राजधानी दिल्लीत रिसर्च ॲण्ड ॲनालिसिस विंगद्वारे (रॉ) आयोजित रामेश्वर नाथ काव मेमोरियल परिसंवादाला संबोधित करताना सांगितले. भारतीय सुरक्षा यंत्रणांनी येत्या काही वर्षांत मादकपदार्थ सिंडिकेट्सचे उच्चाटन करण्यासाठी एक आराखडा तयार केला आणि त्यावर काम सुरू झाले आहे.

भारताच्या शून्य सहिष्णुता धोरणांतर्गत, देश हे सुनिश्चित करेल की राज्याबाहेरून एक ग्रॅम मादकपदार्थही देशात येणार नाही किंवा सीमांच्या बाहेर जाऊ दिला जाणार नाही. मादकपदार्थांच्या विक्रीतून मिळणारा पैसा दहशतवादी आणि गुन्हेगारी टोळ्यांना निधी पुरवतो आणि समांतर अर्थव्यवस्थेला चालना देतो, जे कोणत्याही परिस्थितीत अस्वीकारार्ह आहे.

आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या गरजेवर भर देताना शाह म्हणाले, मादकपदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी अनेक देशांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. मित्र देशांच्या सहकार्याने आतापर्यंत ४० पेक्षा जास्त गुन्हेगारांचे प्रत्यार्पण करण्यात आले. तरुणांना मादकपदार्थाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. (वृत्तसंस्था)

### १८२ कोटींचे 'जिहादी ड्रग' जप्त

**मादकपदार्थ नियंत्रण विभागाने (एनसीबी) 'ऑपरेशन रेजपिल' अंतर्गत आंतरराष्ट्रीय ड्रग्ज टोळीचा भंडाफोड करीत भारतात पहिल्यांदाच १८२ कोटी रुपयांचे 'कॅप्टागॉन' नावाचे मादकपदार्थ जप्त केले. त्याला 'जिहादी ड्रग' नावानेही ओळखले जाते. या मादकपदार्थाचा साठा मध्यपूर्वेतील देशांमध्ये पाठवला जाणार होता. मात्र, भारतीय यंत्रणांनी सतर्कता दाखवत हा डाव हाणून पाडला. याप्रकरणी एका विदेशी नागरिकाला अटक करण्यात आल्याची माहिती शाह यांनी दिली. 'एनसीबी'च्या कामगिरीचे कौतुक करताना ते म्हणाले, भारताच्या भूमीचा वापर करून होणारी ड्रग्जची तस्करी रोखण्यासाठी एनसीबी कटिबद्ध आहे.**

### 'जिहादी ड्रग्ज' काय आहे ?

'कॅप्टागॉन' हे मूळचे 'फेनेटिलाईन' या सिंथेटिक उत्तेजकाचे ब्रॅण्ड नाव आहे. १९६० च्या दशकात एकाग्रतेचा अभाव, नैराश्य आणि अतिझोप येणे यासारख्या आजारांवरील उपचारांसाठी हे औषध विकसित करण्यात आले होते. या औषधामुळे मादकपदार्थांचे व्यसन जडत असल्याचे समोर आल्यानंतर, १९८० च्या दशकात संयुक्त राष्ट्राने याला प्रतिबंधित मादकपदार्थांच्या यादीत टाकले. दहशतवाद्यांकडून याचा मोठ्या प्रमाणावर वापर झाल्यामुळेच याला जगभरात 'जिहादी ड्रग' असे नाव पडले.



श्रीलंकन नौदलाच्या पश्चिम नौदलाचे कमांडर रीअर ॲडमिरल सीमांगे जगथ कुमारा (डावीकडे) यांनी गुरुवारी श्रीलंकेत पोहोचलेली भारतीय नौदलाची नौका सागरवरील अधिकाऱ्यांची भेट घेतली

# ओमान ते भारतापर्यंत टाकणार पाईपलाईन

## भारताने तयार केला आराखडा ● होर्मुझ जलमार्गाशिवाय होणार इंधनाची वाहतूक

**नवी दिल्ली, १६ मे**

अमेरिका आणि इराण संघर्षामुळे होर्मुझ सामुद्रधुनीमधील तणाव प्रचंड वाढला आहे. यामुळे संपूर्ण जगभरातच इंधनाचे संकट निर्माण झाले आहे. यावर उपाय म्हणून भारताने आखाती देशांकडून होणारा नैसर्गिक वायू आणि कच्च्या तेलाचा पुरवठा अखंडपणे सुरू ठेवण्यासाठी थेट खोल समुद्रात ओमान ते संयुक्त अरब अमिराती (यूएई) आणि भारतापर्यंत पाईपलाईन टाकण्याची योजना आखली आहे. यामुळे भारताचे होर्मुझ जलमार्गावरील अवलंबित्वही कमी होईल.

ओमान ते भारतापर्यंत प्रस्तावित या पाईपलाईनसाठी ४० हजार कोटी रुपयांचा खर्च येणार आहे आणि प्रकल्प पूर्ण होण्यासाठी ५ ते ७ वर्षांचा कालावधी लागणे अपेक्षित असल्याची माहिती पेट्रोलियम मंत्रालयातील एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला दिली. केंद्र सरकारने प्रकल्पाचा आराखडा तयार करण्याची जबाबदारी पेट्रोलियम मंत्रालय, इंजिनियर्स इंडिया आणि इंडियन ऑईल यासारख्या सरकारी कंपन्यांना दिली आहे. अहवालानंतर ओमानसोबत गॅस पुरवठा आणि निधीबाबत औपचारिक चर्चा करणे सोपे होईल. ही पाईपलाईन भू-राजकीयदृष्ट्या संवेदनशील भाग टाळून ओमान आणि यूएई मार्गे अरबी समुद्रातून भारतात येईल. या पाईपलाईनद्वारे भारताला ओमानसह सौदी अरब, इराण, कतार आणि तुर्कमेनिस्तान यासारख्या वायुसाठा संपन्न देशांकडून गॅस मिळवता येईल. (वृत्तसंस्था)




### अखंड पुरवठ्याचा मार्ग मोकळा

ही पाईपलाईन समुद्रसपाटीपासून ३,४५० मीटर खोल असेल, ज्यामुळे ती जगातील सर्वांत खोल समुद्री पाईपलाईनपैकी एक ठरेल. यामुळे होर्मुझवर अवलंबून न राहता गॅसचा अखंड पुरवठा सुरू राहील. हा प्रकल्प प्रत्यक्षात आल्यास भारताचा हा निर्णय अत्यंत धोरणात्मक ठरू शकतो. दरम्यान, इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर होर्मुझ सामुद्रधुनी जवळपास बंद आहे. यामुळे जागतिक ऊर्जा बाजार विस्कळीत झाला आहे.

# चीन-तैवान संघर्षात अमेरिका उतरणार नाही

## जिनपिंग यांच्या भेटीनंतर ट्रम्प यांची स्पष्टोक्ती

## दोन्ही देशांनी मुत्सद्देगिरीने तोडगा काढावा

**वॉशिंग्टन, १६ मे**

तैवानच्या मुद्द्यावरून भविष्यात संघर्षाची परिस्थिती उद्भवल्यास अमेरिका यात प्रत्यक्ष सहभागी होणार नाही. चीन-तैवानने मुत्सद्देगिरीने तोडगा काढावा, अशी आमची भूमिका असल्याचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीन दौऱ्यावरून परतल्यानंतर स्पष्ट केले.



तैवानवरून चीनला वेळोवेळी धमक्या देणारे ट्रम्प राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या भेटीनंतर नरमल्याचे दिसून येत आहे. वॉशिंग्टन येथे चीन दौऱ्याची माहिती देताना त्यांनी सांगितले की, जिनपिंग यांच्यासोबत माझी अनेक विषयांवर चर्चा झाली. व्यापारी अडथळे आणि जागतिक प्रश्नांवरील बहुतांश मुद्द्यांवर आम्ही सहमत आहे. चीन-तैवान तणावावर पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर ट्रम्प म्हणाले, तैवानवरून भविष्यात संघर्ष उद्भवल्यास अमेरिकेत त्यात सहभागी होणार नाही. दोन्ही देशांनी मुत्सद्देगिरीने तोडगा काढावा. अमेरिकेला सध्या युद्धाची अजिबात गरज नाही, विशेषतः ९,५०० मैल दूर असलेल्या युद्धाची तर, अजिबातच नाही. तैवानच्या स्वातंत्र्यासाठीच्या लढ्याला जिनपिंग यांचा तीव्र विरोध आहे. अशी कृती धोकादायक संघर्षासाठी कारणीभूत ठरू शकते, त्यामुळे अमेरिका तैवान मुद्द्यावरून दूर राहणार आहे. (वृत्तसंस्था)

### पाकिस्तानच्या विनंतीवरून युद्ध थांबवले

पाकिस्तानप्रती मैत्रीचे प्रतीक म्हणून अमेरिकेने इराणविरोधातील युद्ध थांबवले. निर्बंधांमधून सूट हवी असल्यास इराणने अणुकार्यक्रम पूर्णपणे बंद करावा. इराणला अणुशस्त्रे मिळवण्याची कधीही परवानगी देणार नाहीत. त्यांनी अनेक वर्षांपासून जमा केलेले समृद्ध युरेनियम पूर्णपणे सोडून द्यायला हवे. जिनपिंग हे देखील होर्मुझ सामुद्रधुनी व्यापारासाठी खुली करण्याच्या बाजूने असल्याचे ट्रम्प म्हणाले.

### इतिहासात झालेल्या कराराशी देणेघेणे नाही

पत्रकारांनी अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन यांनी १९८२ मध्ये तैवानला दिलेल्या आश्वासनाबद्दल विचारले असता, ट्रम्प म्हणाले, १९८२ ही खूप जुनी गोष्ट आहे. इतिहासात झालेल्या कराराशी मला देणे-घेणे नाही. अमेरिकेला आता कोणत्याही नव्या संघर्षात पडायचे नाही. तैवानसोबत झालेल्या शस्त्रविक्री कराराबाबत विचारले असता त्यांनी उत्तर देणे टाळले.

## चित्रपट वार्ता

### 'धुरंधर-२' ५ जूनला 'ओटीटी'वर

**मुंबई :** रणवीरसिंह अभिनित 'धुरंधर-२' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर विक्रमी कामगिरी केल्यानंतर आता डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे. आदित्य धर दिग्दर्शित हा चित्रपट ५ जूनपासून जिओ-हॉटस्टारवर स्ट्रीम होईल. चित्रपटाचा डिजिटल प्रीमियर ४ जून रोजी संध्याकाळी ७ वाजता ठेवण्यात आला आहे. चित्रपटाच्या ओटीटी प्रदर्शनाची माहिती स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मने त्यांच्या अधिकृत इन्स्टाग्राम हॅण्डलवर दिली आहे. वादळ बनून जो येत आहे त्याला 'धुरंधर' म्हणतात. बघा 'धुरंधर : द रिव्हेंज, रॉ आणि अनसीन'. ग्रॅण्ड डिजिटल प्रीमियर ४ जून संध्याकाळी ७ वाजता, स्ट्रीमिंग ५ जूनपासून फक्त जिओ-हॉटस्टारवर, असे पोस्टमध्ये लिहिले आहे. चित्रपटाने आतापर्यंत भारतात सुमारे १,१४४ कोटी रुपयांचे नेट कलेक्शन आणि जगभरात जवळपास १७९५ कोटी रुपयांची एकूण कमाई केली आहे.



### 'कप-बशी' चित्रपटाचा टीझर प्रदर्शित


**मुंबई :** आता पारंपरिक लग्न पद्धतीला आधुनिक काळाचा तडका देणारा 'कप-बशी' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचा टीजर नुकताच प्रदर्शित करण्यात आला आहे. निर्मिती सावंत, पूजा सावंत नवोदित चेहरा ऋषी मनोहर अशी फ्रेश स्टारकास्ट दिसणार आहे. या चित्रपटाची निर्मिती सुकल्प चित्र या निर्मिती संस्थेने केली असून कल्पक सदानंद जोशी हे चित्रपटाचे निर्माते आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन वैभव रामकृष्ण चिंचाळकर यांनी केले असून, पटकथा आणि संवाद चेतन सैंदाणे यांनी लिहिले आहेत. चित्रपटात निर्मिती सावंत, पूजा सावंत, ऋषी मनोहर, नयना आपटे, अनंत जोग, राहुल रानडे, आनंद इंगळे, आनंद काळे, चिन्मय शिंत्रे आणि उमा सरदेशमुख यांच्या प्रमुख भूमिका पाहायला मिळणार आहेत. येत्या १९ जून रोजी हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.



### 'राजा शिवाजी' ओटीटीवर?

**मुंबई :** सध्या चित्रपटगृहांमध्ये अभिनेता आणि दिग्दर्शक रितेश देशमुख यांचा 'राजा शिवाजी' चित्रपट गाजत आहे. साधारणपणे बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करणाऱ्या चित्रपटांना ओटीटीवर येण्यासाठी ४५ ते ६० दिवसांचा कालावधी लागतो. मात्र, या चित्रपटाच्या बाबतीत अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. दरम्यान, हा आता थेट जिओ हॉटस्टारवर स्ट्रीम केला जाण्याची शक्यता आहे. मात्र, याबाबत अधिकृत दुजोरा अद्याप मिळालेला नाही. प्रदर्शनाची तारीखही निश्चित करण्यात आलेली नाही. चित्रपटगृहांमध्ये 'राजा शिवाजी' मराठी आणि हिंदी भाषेत प्रदर्शित करण्यात आला आहे. मात्र, ओटीटीवर प्रदर्शित होताना हा चित्रपट पॅन इंडिया पातळीवर सादर केला जाईल, अशी चर्चा आहे. यानुसार चित्रपट मराठी, हिंदी, तमिळ, तेलुगू, कन्नड आणि मल्याळम अशा सहा भाषांमध्ये उपलब्ध होऊ शकतो.





अंदमान-निकोबार बेटांवरील 'सागरी कवच' या किनारी सुरक्षा सरावात सहभागी झालेली भारतीय तटरक्षक दलाची नौका

# भारतीय वंशाच्या इमामाला ब्रिटनमध्ये जन्मठेप

## अनेक मुलींचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप

**लंडन, १६ मे**

ब्रिटनमध्ये भारतीय वंशाचा इमाम अब्दुल हलीम खानला याला मुली आणि महिलांच्या लैंगिक शोषणाच्या आरोपात ब्रिटनच्या न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली.



न्यायालयाने आरोपीला बलात्कार, मुलांसोबत लैंगिक अत्याचार आणि लैंगिक शोषण यासह २१ प्रकरणांमध्ये दोषी ठरवले आहे. लंडन पोलिसांच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, आरोपी स्वतःला धार्मिक आणि आध्यात्मिक शक्ती असलेला भासवायचा जिन्न आणि वाईट आत्म्यांची भीती दाखवून त्याने महिला आणि मुलींचे लैंगिक शोषण केले. पीडितांमध्ये १२ वर्षांपर्यंतच्या मुलींचाही समावेश होता. २००४ ते २०१५ दरम्यान सात महिला आणि १४ मुलींवर अत्याचार केला. पूर्व लंडनमधील बांगलादेशी मुस्लिम समुदायात इमाम असल्याचा फायदा घेऊन लोकांची दिशाभूल करायचा. कुटुंबावर काळ्या जादूचा वापर करण्याची भीती दाखवल्याने अनेक मुली वर्षानुवर्षे गप्प राहिल्या. अखेर एका प्रकरणात त्याला अटक केल्यानंतर पीडितांनी त्याच्याविरोधात तक्रारी दाखल केल्याने त्याने केलेल्या अत्याचाराची माहिती समोर आली. (वृत्तसंस्था)

# ट्रम्प यांच्या हत्येसाठी ५५८ कोटी रुपयांचे बक्षीस

## इब्राहिम अझिझी यांची माहिती, इराणच्या संसदेत ठराव मंजूर

**तेहरान, १६ मे**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना युद्ध गुन्हेगार घोषित करण्याचा आणि त्यांना ठार करणाऱ्याला ५० दशलक्ष युरोंचे (५५८ कोटी) बक्षीस देण्याचा ठराव इराणच्या संसदेत मंजूर करण्यात आल्याची माहिती संसदेच्या राष्ट्रीय सुरक्षा समितीचे प्रमुख इब्राहिम अझिझी यांनी शनिवारी दिली.



अझिझी यांनी सांगितले की, ट्रम्प यांच्यावर सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनेई यांच्यासह देशातील ५० नेत्यांच्या हत्येचा आरोप आहे. इस्लामिक प्रजासत्ताकाच्या लष्करी आणि सुरक्षा यंत्रणांनी प्रत्युत्तरात्मक कारवाई म्हणून एक योजना केली. या योजनेला संसदेने मंजुरी दिली आहे. याशिवाय ट्रम्प यांची हत्या करणाऱ्याला ५५८ कोटींचे बक्षीस देण्याचा ठराव पारित करण्यात आला. जी कोणतीही व्यक्ती किंवा गट ट्रम्प यांना ठार करेल त्यांना ही रक्कम दिली जाईल. सुरक्षा यंत्रणांनी ट्रम्प आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांचा सूड घेण्यासाठी तयार केलेली योजनेला संसदेने मंजुरी दिली आहे. यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल. अयातुल्ला यांच्या हत्येचा सूड कोणत्याही परिस्थितीत घेतला जाईल. (वृत्तसंस्था)

# कृष्णविवरात आढळले ४३३ दिवसांचे दुर्मिळ प्रकाश चक्र

## १९ वर्षे केले निरीक्षण

**नवी दिल्ली, १६ मे**

वैज्ञानिकांनी विश्वातील गहन रहस्य उलगडण्यात एक मोठे आणि ऐतिहासिक यश मिळवले आहे. भारतीय आणि आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञांनी १९ वर्षांच्या निरीक्षणानंतर, ३सी४५४.३ नावाच्या एका ब्लेझारमध्ये (विशाल कृष्णविवर) एका अनोख्या प्रकाश चक्राचा शोध लावला.

अवकाशाच्या १९ वर्षांच्या अविरत निरीक्षणानंतर, भारतीय आणि आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञांच्या एका चमूने एका विशाल कृष्णविवरामध्ये एका अत्यंत दुर्मिळ आणि अनोख्या प्रकाश चक्राचा शोध लावला आहे. हा एक कृष्णविवरे आणि आपल्या आकाशगंगांच्या कार्यप्रणालीचे संपूर्ण स्पष्टीकरण देऊ शकणारा शोध आहे. 'होल अर्थ ब्लेझर टेलिस्कोप' प्रकल्पांतर्गत या क्वासारमधील माहितीचा १९ वर्षे बारकाईने अभ्यास करण्यात आला. या खगोलीय वस्तूची चमक दर ४३३ दिवसांनी एकसमान बदलते, असे या विस्तृत संशोधनातून दिसून आले. वैज्ञानिक भाषेत, या घटनेला 'ऑप्टिकल क्वासी-पिरिऑडिक ऑसिलेशन' (प्रकाशकीय अर्ध-आवर्ती दोलन) असे म्हणतात.

याचा सरळ अर्थ, या कृष्णविवरातून निघणारा प्रकाश कमी-जास्त होत नाही, तर सुमारे ४३३ दिवसांच्या निश्चित अंतराने तो वारंवार वाढतो आणि कमी होतो, असा आहे. या महत्त्वपूर्ण संशोधनात भारताच्या आर्यभट्ट रिसर्च इन्स्टिट्यूट ऑफ ऑब्झर्वेशनल सायन्सेसच्या शास्त्रज्ञांनीही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. ३सी४५४.३ हा खरेतर एक ब्लेझार आहे. ब्लेझार हे सक्रिय आकाशगंगांचा एक अतिशय विशेष प्रकार आहे. अशा आकाशगंगांच्या अगदी केंद्रस्थानी एक अत्यंत प्रचंड वस्तुमानाचे कृष्णविवर असते. हे प्रचंड वस्तुमानाचे कृष्णविवर आपल्या सभोवतालचा सर्व वायू आणि धूळ वेगाने गिळंकृत करते. या प्रलयंकारी प्रक्रियेमुळे प्रचंड प्रमाणात ऊर्जा निर्माण होते, ज्यामुळे आकाशगंगेचे केंद्र विलक्षण तेजस्वीपणे चमकते.



शास्त्रज्ञ या अत्यंत सक्रिय केंद्राला 'सक्रिय आकाशगंगा केंद्र' म्हणतात. जेव्हा या सक्रिय आकाशगंगा केंद्रामधून बाहेर पडणारा ऊर्जेचा शक्तिशाली झोत जवळजवळ थेट पृथ्वीच्या दिशेने येतो, तेव्हा त्या चमकणाऱ्या वस्तूला 'ब्लेझार' म्हणतात. (वृत्तसंस्था)

### विज्ञानासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण शोध

आपल्या विश्वातील अनेक वस्तू सातत्यपूर्ण किंवा स्थिर प्रकाश उत्सर्जित करत नाहीत. त्यांची चमक काळानुसार कमी-जास्त होत असते. नियमित अंतराने होणाऱ्या प्रकाशातील या बदलाला 'अर्ध-आवर्ती दोलन' म्हणतात. आतापर्यंत, शास्त्रज्ञांनी असे संकेत केवळ एक्स-रे मध्ये शोधले होते. ते कृष्णविवरांच्या अगदी जवळच्या भागातून येतात. तथापि, प्रकाशाच्या चमकेतील अशा चक्राचा शोध या शोधाला विज्ञानासाठी अत्यंत दुर्मिळ आणि अत्यंत महत्त्वपूर्ण बनवतो.

# भारताने करावी वाटाघाटीत मध्यस्थी

## इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांची साद

**नवी दिल्ली, १६ मे**

इराणशी संबंधित कोणत्याही मुद्द्यांवर लष्करी कारवाई हा तोडगा नाही. इराण एका अकारण आक्रमणाचा बळी ठरला आहे. जर समोरची बाजू गंभीर असेल, तर आम्ही चर्चेसाठी तयार आहोत. अमेरिकेवर विश्वास न ठेवण्याची आमच्याकडे सर्व कारणे आहेत. या प्रदेशात शांततेसाठी भारताने मध्यस्थी करण्यासाठी पुढाका घ्यावा, भारताने घेतलेल्या भूमिकेचे आम्ही स्वागत करू अशी माहिती इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी शनिवारी पत्रपरिषदेतून दिली.



ब्रिक्स सदस्य देशांच्या दोन दिवसीय शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी अराघची आले होते. मायदेशी परतण्यापूवी पत्रकारांशी संवाद साधताना अराघची म्हणाले, होर्मुझमध्ये अमेरिकेची नाकाबंदी कायम राहिल्यास कदाचित पुन्हा लढाई सुरू होऊ शकते. पण, आम्ही मुत्सद्देगिरीसाठीही तयार आहोत. अमेरिकेकडून येणाऱ्या अविश्वास आणि परस्परविरोधी संदेशांमुळे सध्याच्या चर्चेत अडथळा येत आहे. मला आशा आहे की, अखेरीस मुत्सद्देगिरीचाच विजय होईल. इराणने कधीही अण्वस्त्रांची मागणी केलेली नाही आणि ते आमचे धोरण नाही. आमचा अमेरिकेवर अजिबात विश्वास नाही. कोणत्याही राजनैतिक प्रयत्नांमधील हा सर्वांत मोठा अडथळा आहे. भारताने शांतता चर्चेत मध्यस्थी करावी अशी आमची इच्छा आहे, असे अराघची म्हणाले. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



रोखठोक

दिनेश गुणे

# क्रांतीच्या आडोशाला दडलेले धोके

गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासातील कामकाजात उद्धव ठाकरे गटाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी यांच्या एका अतारांकित प्रश्नावरील उत्तरात केंद्रीय पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल खात्याचे राज्यमंत्री कीर्तिवर्धन सिंह यांनी दिलेल्या माहितीतून देशासमोरील एका गंभीर समस्येचे रौद्ररूप स्पष्ट झाले. भारतात सर्वाधिक इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा कचरा जमा होत असल्याने ही भविष्यात देशासमोरील सर्वात मोठी समस्या असणार आहे, ही बाब आता स्वीकारली गेली आहे. देशभरातील गावोगावी आणि शहरांमध्ये इलेक्ट्रॉनिक कचऱ्याचे ढिगारे गोळा होत असताना त्यामधील घातक वस्तूंची विल्हेवाट लावण्याची पुरेशी यंत्रणा निर्माण करण्याचे मोठे आव्हान देशासमोर आहे. गेल्या चार-पाच वर्षांत निर्माण झालेला कचरा आणि पुनर्वापर करून या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न यांतील तफावत पाहता, या कचऱ्याची विल्हेवाट लागली नाही, तर केवळ पर्यावरणाचाच नव्हे, तर गुन्हेगारी विश्वाच्या नव्या आव्हानाचाही सामना देशाला करावा लागेल असे दिसते. सन २०२०-२१ मध्ये देशात तब्बल १३ लाख ४६ हजार ४९६ मेट्रिक टन ई-कचरा निर्माण झाला; त्यापैकी केवळ साडेतीन लाख टन कचऱ्यावर प्रक्रिया करणे शक्य झाले. २१-२२ मध्ये १६ लाख टन कचरा तयार झाला आणि जेमतेम पाच लाख टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आली. पुढील तीन वर्षांत सरासरी १५ लाख टन कचरा निर्माण झाला आणि सुमारे साडेसात टन ई-कचऱ्यावर प्रक्रिया केली गेली.

केंद्र सरकारकडून दिल्या गेलेल्या माहितीच्या आधारे भारतातील ई-कचऱ्याच्या समस्येचा वेगवेगळ्या अभ्यास मंचावर मागोवा घेताना समोर आलेले वास्तव केवळ बेचैन करणारे नव्हे, तर क्रांतीच्या दुसऱ्या धोकादायक बाजूचे भय गडद करणारे आहे. भारतातील घराघरात संगणक, इंटरनेटचा वापर वाढला आहे. मोबाईल क्रांतीमुळे खरोखरीच दुनिया मुठीत दाखल झाली आहे. डिजिटल व्यवहारांना सार्वत्रिक मान्यता मिळाली आहे. एका अर्थाने, संगणक साक्षरता वाढत चालली आहे, पण डिजिटल क्रांतीच्या दुसऱ्या बाजूमागे दडलेल्या धोक्यांविषयी मात्र समाज बराचसा अनभिज्ञदेखील आहे. उत्तर भारतात सायबर गुन्हेगारीचे जाळे उद्‌ध्वस्त केल्यानंतर पोलिसांना व तपास यंत्रणांना आलेल्या या विश्वातील गूढाची उकल होत गेली, आयएमईआय नावाची सुरक्षा व्यवस्था भेदून सायबर गुन्हेगारीने या क्रांतीच्या पायात गुलामीच्या बेड्या ठोकल्याचे स्पष्ट होऊ लागले, वापरून फेकून दिलेल्या मोबाईल फोनमधील पुसली न गेलेली माहिती संकट कशी ठरू शकते हे उघड होऊ लागले, तर नामवंत कंपन्यांच्या नावाने बनावट मोबाईल फोन तयार करणाऱ्या उद्योगांनी या क्षेत्राला घातलेला विळखा सोडविताना पोलिसांना आपले तपासाचे कसब पणाला लावावे लागले. सायबर फ्रॉडच्या वाढत्या दहशतीतून समाजास सोडविण्याचे आव्हान सोपे नाही, याची जाणीव आता गडद होऊ लागली आहे, एखादी टोळी उद्‌ध्वस्त झाली तरी त्यांचे जाळे भेदण्याचे आव्हान मोठे आहे, हेही स्पष्ट होऊ लागले आहे. यामुळेच या समस्येविषयी वेगवेगळ्या माध्यमांतून व्यक्त झालेल्या माहितीच्या संकलनातून समोर येणारे हे भयावह चित्रदेखील हिमनगाच्या केवळ एका टोकाएवढेच असावे. या संकटाची उकल न झालेली बाजू याहूनही भयानक असू शकते. त्यामुळे ही संकलित माहिती संकटाची तोंडओळख करून घेण्याकरिता पुरेशी ठरावी.

डिजिटल युगाने माणसाचे जीवन झपाट्याने बदलले. मोबाईल, संगणक, स्मार्ट टीव्ही, टॅबलेट, सर्व्हर, स्मार्ट उपकरणे यांनी सुसज्ज होत गेलेली तंत्रज्ञानाची ही दुनिया जितक्या वेगाने विस्तारत गेली, तितक्याच वेगाने इलेक्ट्रॉनिक कचरादेखील वाढत गेला. भारतासारख्या वेगाने डिजिटल होत असलेल्या देशात ही समस्या आता केवळ पर्यावरणापुरती मर्यादित राहिलेली नाही. ती सायबर सुरक्षा, डेटा गोपनीयता आणि राष्ट्रीय सुरक्षेशी निगडित गंभीर आव्हान बनली आहे. आज प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन आहे. कंपन्या, बँका, शासकीय यंत्रणा, रुग्णालये, शाळा, खरेदी विक्रीचे व्यवहार आणि दैनंदिन जनजीवनात जेथे जेथे रोख रकमेचा वापर केला जात होता, ते सर्व काही डिजिटल व्यवहारांत बदलून गेले आहे. पण या क्रांतीची पाळेमुळे खोल रुजत असतानाच, या डिजिटल क्रांतीची एक काळी बाजू लख्खपणे समोर येऊ लागली आहे. दररोज प्रगत होणारे तंत्रज्ञान, सतत येणारी नवी उपकरणे आणि जुन्या वस्तूंची वाढती विल्हेवाट यामुळे ई-कचऱ्याचा प्रचंड डोंगर तयार होत आहे. भारत हा जगातील सर्वाधिक वेगाने ई-कचरा निर्माण करणाऱ्या देशांपैकी एक बनला आहे आणि त्याची शास्त्रशुद्ध विल्हेवाट लागली नाही, तर त्यापासून निर्माण होणाऱ्या अनेक धोक्यांचे संकट भारताच्या भविष्याला ग्रासणार आहे, असा इशारा संयुक्त राष्ट्र संघाच्या अहवालात देण्यात आला आहे. मात्र, हे संकट केवळ कचऱ्याचे नाही. त्या कचऱ्यात दडलेल्या डेटाचा गैरवापर किंवा त्यापासून होणाऱ्या फसवणुकीची सामान्य माणसांना मोजावी लागणारी किंमत हे दुसरे संकटही त्यामध्ये दडलेले आहे.

नादुरुस्त झाल्यामुळे किंवा अधिक प्रगत तंत्रज्ञानाचा समावेश असलेले मोबाईल, लॅपटॉप खरेदी करण्याच्या सवयीतून जुने मोबाईल, लॅपटॉप वापरातून दूर केले जातात आणि त्यांचे रूपांतर कचऱ्यात होते. अशा उपकरणांचा वापर बंद केला तरी त्यातील सर्व माहिती पूर्णपणे नष्ट होतेच असे नाही. अनेकदा फक्त 'डिलीट' किंवा 'फॉरमॅट' केलेला डेटा अत्याधुनिक सॉफ्टवेअरच्या मदतीने पुन्हा मिळविता येतो. त्यामुळे जुनी उपकरणे भंगारात विकताना नकळतपणे वैयक्तिक छायाचित्रे, बँक माहिती, पासवर्ड, व्यावसायिक कागदपत्रे, सरकारी माहिती किंवा ग्राहकांचा डेटा दुसऱ्यांच्या हाती लागू शकतो; आणि येथूनच ई-कचरा आणि सायबर गुन्हेगारी यांची धोकादायक युती सुरू होते.



सायबर गुन्हेगार टाकून दिलेल्या उपकरणांमधून माहिती काढून ओळख चोरी, आर्थिक फसवणूक, ब्लॅकमेलिंग किंवा कॉर्पोरेट हेरगिरीसारखे गुन्हे करू शकतात. अनेक वेळा कंपन्यांचे जुने सर्व्हर, संगणक किंवा उपकरणे चुकीच्या पद्धतीने विकली गेल्याने संवेदनशील माहिती जाहीर झाल्याची उदाहरणे जगभर समोर आली आहेत. भारतामध्ये ई-कचऱ्याचा मोठा भाग अजूनही अनौपचारिक क्षेत्रातून हाताळला जातो. दिल्लीतील सीलमपूर, मोरादाबाद, मुंबई, चेन्नई किंवा बेंगळुरूसारख्या भागांमध्ये हजारो लोक भंगारातून इलेक्ट्रॉनिक वस्तू वेगळ्या करण्याचे काम करतात. या प्रक्रियेत सुरक्षेचे नियमांची काटेकोर अंमलबजावणी होतेच असे नाही. वायर जाळून तांबे काढणे, आम्ल वापरून धातू वेगळे करणे, हाताने सर्किट बोर्ड तोडणे, या पद्धतींमुळे केवळ पर्यावरणाचे नुकसान होत नाही, तर उपकरणांमधील डेटादेखील कोणाच्याही हाती लागू शकतो; अनेकदा यातील धोका समजतही नाही. जुना मोबाईल विकताना किंवा संगणक भंगारात देताना डेटा पूर्णपणे नष्ट करण्याची गरज किती गंभीर आहे, याबद्दलची अल्प जनजागृती हे याचे मुख्य कारण मानले जाते. केवळ मोबाईल किंवा संगणकच नव्हे, तर टीव्ही, स्मार्ट वॉच, सुरक्षा कॅमेरे, फ्रिज, कार, वैद्यकीय उपकरणेही इंटरनेटशी जोडली जात आहेत. माहिती महाजालाचा विळखा पडलेल्या या नव्या युगात प्रत्येक उपकरण डेटा निर्माण करते आणि साठवते. अशा उपकरणांची अयोग्य विल्हेवाट लावली गेल्यास वैयक्तिक जीवनशैलीपासून आरोग्यविषयक माहितीपर्यंत अनेक संवेदनशील गोष्टी उघड होऊ शकतात. त्यामुळे ई-वेस्टचा प्रश्न हा आता केवळ पर्यावरणीय नाही; तो डिजिटल सुरक्षिततेचाही आहे. याला आळा घालण्यासाठी कायदे अस्तित्वात असले, तरी त्याची अंमलबजावणी मात्र ठोस होत नसल्याने, ई-कचऱ्यापासून निर्माण होणाऱ्या धोक्यांची जाणीव करून देणाऱ्या जनजागृतीची गरज अधोरेखित झाली आहे. काही स्वयंसेवी संस्था, सायबर क्षेत्रातील तज्ज्ञ, संशोधकांकडून या धोक्याच्या घंटा सातत्याने वाजविल्या जातात, पण त्यांचा आवाज मात्र अजूनही सर्वत्र घुमलेला नाही. त्यामुळेच नादुरुस्त झालेली किंवा वापरात नसलेली इलेक्ट्रॉनिक उपकरणे फेकून दिली जातात किंवा कवडीमोलाने भंगारवाल्याच्या हवाली केली जातात. अर्थात, या उपकरणांकडे कचरा म्हणून पाहिले जात असले, तरी त्याची योग्य किंमत ओळखली तर त्यावर पुनर्प्रक्रिया करून दुर्मिळ धातूंसारखी मौल्यवान संसाधने वेगळी करता येत असल्याने, या संकटात दडलेले आर्थिक संधींचे दरवाजे शोधण्याची गरजही जाणकारांकडून व्यक्त केली जाते. म्हणजे, खाणी खोदण्याऐवजी जुन्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंमधून मौल्यवान धातू पुनर्प्राप्त करण्याची यंत्रणा मजबूत केली तर भारतासाठी ही मोठी रोजगारनिर्मिती आणि संसाधन बचतीची संधी ठरू शकते.

भारतातील भंगार व्यवसायाने गेल्या काही दशकांत अनेक टप्पे पार केले आहेत. सुरुवातीला हा व्यवसाय केवळ लोखंड, तांबे, पितळ आणि रद्दी पेपरपुरता मर्यादित होता. १९९० च्या दशकात जुन्या सायकली आणि २००० च्या सुरुवातीला दुचाकी भंगारात घेण्याचे प्रमाण वाढले. या काळात अनेक भंगार विक्रेत्यांनी अनधिकृतपणे जुन्या गाड्या विकत घेण्यास सुरुवात केली. दुचाकी विक्रीसाठी आरटीओकडे नोंदणी करणे आणि मालकी हस्तांतरण करणे अनिवार्य असतानाही, अनेक नागरिक केवळ तत्काळ मिळणाऱ्या पैशांच्या आमिषाने आपले वाहन भंगारवाल्याला देऊन टाकत असत. अशाप्रकारे भंगारात गेलेल्या अनेक दुचाकींचा वापर गुन्हेगारी टोळ्यांकडून अमली पदार्थांच्या तस्करीसाठी किंवा चोरीच्या मालाची वाहतूक करण्यासाठी केला गेला आहे. जेव्हा या गाड्या पोलिसांच्या हाती लागतात, तेव्हा तपासाचे चक्र मूळ मालकापर्यंत पोहोचते, कारण सरकारी दप्तरी आजही त्याचेच नाव नोंदवलेले असते. आरटीओच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, जुनी गाडी विकताना किंवा भंगारात काढताना तिचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करणे आणि स्क्रॅपिंग सर्टिफिकेट मिळविणे आवश्यक आहे, परंतु अनौपचारिक क्षेत्रात या नियमांची पायमल्ली केली जाते.

सरकारने दुचाकींच्या स्क्रॅपिंगवर कडक निर्बंध लादले आणि आरटीओ नियमांची अंमलबजावणी वाढवली, तेव्हा या भंगार माफियांनी आपला मोर्चा इलेक्ट्रॉनिक उपकरणांकडे वळवला. मोबाईल फोन आणि लॅपटॉप हे दुचाकींपेक्षा अधिक फायदेशीर ठरत आहेत. कारण त्यातून केवळ मौल्यवान धातूच मिळत नाहीत, तर मौल्यवान 'डेटा'देखील मिळतो. ई कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची अधिकृत यंत्रणा पुरेशी सक्षम नसल्याने आणि त्यासंदर्भात पुरेशी जनजागृती झालेली नसल्यामुळे, दारोदार फिरणारे भंगार विक्रेते ग्राहकांसाठी सर्वात सोपा पर्याय बनले आहेत. जुन्या मोबाईल किंवा लॅपटॉपचे मूल्य केवळ त्यातील साहित्याच्या वजनावर ठरवले जात नाही. त्या उपकरणाच्या आत असलेला 'मदरबोर्ड' आणि 'मेमरी चिप' हे जुन्या उपकरणांच्या बाजारात खऱ्या अर्थाने सोन्याचे अंडे देणारी कोंबडी ठरतात. जुन्या मोबाईल किंवा लॅपटॉपमधील डेटा मिळवून फ्रॉड करण्याची प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची आणि नियोजित असते. अनेक वापरकर्ते आपला फोन भंगारात देण्यापूर्वी तो 'फॅक्टरी रिसेट' करतात. मात्र, मेमरी चिपमधील डेटा तसाच राहतो. डेटा रिकव्हरी सॉफ्टवेअरच्या मदतीने, रिसेट केलेल्या फोनमधून जुने फोटो, व्हिडीओ, मेसेजेस आणि बँकिंग व्यवहारांशी संबंधित माहिती सहजपणे पुन्हा मिळविली जाऊ शकते. भंगार विक्रेत्यांनी घरोघरी फिरून जमा केलेली अशी उपकरणे हस्ते-परहस्ते करोल बाग (दिल्ली) किंवा सीलमपूरसारख्या भागातील मोठ्या प्रक्रिया केंद्रांमध्ये पोहोचतात. तेथे तज्ज्ञ गुन्हेगार त्यांच्यातील डेटा चोरतात. ओळख चोरी आर्थिक फसवणूक यासारख्या गुन्ह्यांसाठी ही माहिती वापरली जाते. काही वेळा अशी वैयक्तिक माहिती डार्क वेबवर विकली जाते. एका संशोधनानुसार, भंगार क्षेत्रातील केवळ २१ टक्के कर्मचाऱ्यांना ई-कचऱ्याच्या सुरक्षित विल्हेवाटीबद्दल माहिती आहे, तर उर्वरित ७९ टक्के लोक केवळ फायद्यासाठी जुनी उपकरणे घेतात. त्यामुळे डेटा चोरीचा धोका अधिक बळावतो.

नवी जोडणी करून तयार केलेले मोबाईल फोन नवे दिसतात, पण केवळ जुन्या आणि चोरीच्या फोनच्या वेगवेगळ्या भागांची जोडणी करून त्यांची निर्मिती होते. जेव्हा अशाप्रकारे क्लोन केलेले किंवा टॅम्पर केलेले फोन गुन्हेगारी किंवा दहशतवादी कृत्यांसाठी वापरले जातात, तेव्हा मूळ मालकासाठी गंभीर समस्या निर्माण होते. त्यामुळे भंगार विक्रेत्यांकडून होणारी इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे व्यवहार ही सर्वात मोठी 'सुरक्षा पोकळी' आहे. दहशतवादी संघटनांना संवाद साधण्यासाठी सुरक्षा यंत्रणांच्या रडारखाली येणार नाहीत अशा उपकरणांची गरज असते. एखादा जुना भंगारात दिलेला फोन अशा गुन्हेगारांच्या हाती लागतो तेव्हा ते त्यातील आयएमईआय क्रमांकाची फेरफार करून तो 'अनट्रेसेबल' केला जात असल्याचेही उघडकीस आल्याचे सांगण्यात येते. काही प्रकरणांमध्ये, लॅपटॉप्समधील डेटा चोरी करून त्यातील गोपनीय माहितीचा वापर करून देशाच्या संवेदनशील पायाभूत सुविधांवर हल्ला करण्याचाही प्रयत्न झाल्याचे सांगण्यात येते.

ई-कचऱ्यामध्ये शिसे, पारा, कॅडमियम, लिथियम, क्रोमियम यांसारखे विषारी घटक असतात. हे पदार्थ माती, पाणी आणि हवेत मिसळले की दीर्घकालीन पर्यावरणीय हानी होते. अनधिकृत क्षेत्रात अनेक ठिकाणी वायर जाळून त्यातील तांबे काढले जाते, आम्ल वापरून धातू वेगळे केले जातात. या प्रक्रियेमुळे विषारी धूर आणि रसायने निर्माण होतात. दिल्लीतील सीलमपूर, मोरादाबाद, मुंबई, चेन्नई, बेंगळुरू अशा भागांत ई-वेस्ट प्रक्रिया करणाऱ्या अनौपचारिक बाजारांचे जाळे आहे. अनेक ठिकाणी बालमजुरी आणि असंघटित मजूर अत्यल्प सुरक्षेसह काम करत असल्याचे वारंवार निदर्शनास आले आहे. त्यामुळे डिजिटल भारताची वाटचाल जितकी वेगाने सुरू आहे, तितक्याच जबाबदारीने डिजिटल कचऱ्याचे व्यवस्थापन करावे लागेल. अन्यथा आजचा इलेक्ट्रॉनिक कचरा उद्याचा पर्यावरणीय आणि सायबर सुरक्षेचा स्फोटक प्रश्न ठरू शकतो. ▮

dineshgune@gmail.com



# पाणी टंचाईचे भीषण वास्तव

मे महिन्याच्या सुरुवातीपासूनच खरे तर एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासूनच महाराष्ट्राच्या विविध भागात पाणी टंचाईच्या झळा सुरू झाल्या आहेत. काही अपवाद वगळता ग्रामीण भागापासून तर विकसित शहरापर्यंत कोणाचीही या टंचाईतून सुटका होण्याची शक्यता दिसत नाही. मुंबई-कोल्हापूर शहरामध्ये आत्ताच पाणी टंचाईचा निर्णय घेण्यात आला आहे. एकंदरीत दरवर्षी प्रमाणेच यंदाही पाचवीला पुजल्याप्रमाणे महाराष्ट्रातील जनता गंभीर दुष्काळाने होरपळत आहे. पिण्याच्या पाण्याचा थेंब नाही, पिण्यासाठी लोक गाव सोडताहेत. जे गावात आहे तेच जंगलात आहे. माणसे-जनावरे पाण्या-चाऱ्यावाचून तडफडत आहेत.

मध्यंतरी प्रसार माध्यमातून एक बातमी वाचावयास मिळाली. 'माकडाच्या पिलाची तहानेतून तडफड; तांब्यात अडकले डोके' या बातमीनुसार एक माकडीण पिलाला घेऊन जवळच्या वस्तीत घुसली आणि तांब्यात पाण्याचा थेंब दिसताच त्या पिलाने तांब्यात तोंड घातले. पिलाचे तोंड तांब्यात अडकले. पिल्लू सैरवैर फिरत राहिले. माकडिणीने पिलाला वाचविण्याचा प्रयत्न केला. शेवटी नागरिकांच्या व वन विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नाने पिलाचा जीव वाचला. ही एका माकडिणीची किंवा पिलाची गोष्ट नसून ही महाराष्ट्राच्या जनतेची गोष्ट आहे. स्पष्टच सांगायचे तर महाराष्ट्राच्या जनतेचेच माकड झाले आहे. आपण निवडून दिलेल्या राज्यकर्त्यांनी आपले माकड केले आहे. यंदाचा दुष्काळ किती भयानक आहे. हे या दुष्काळात होरपळून निघणारी जनता अनुभवत आहे.

एकंदरीत सालाबादाप्रमाणे यंदाही महाराष्ट्र होरपळत आहे. महिला जीव धोक्यात घालून विहिरीत उतरत राहतील. शेतकरी करपलेल्या पिकाकडे बघत राहतील. यावर्षी तरी चांगला पाऊस यावा असे ईश्वराकडे साकडे घालतील मे-जून महिना संपेल. पाऊस पडला की जुन्या यातना विसरायच्या व परत दुष्काळ पडला तर तडफडत बसायचे या चक्रात किती वर्षे अडकून राहायचे? या दुष्काळात तडफडून गेला नाही तर पुढच्या दुष्काळात हमखास मरण आहेच, ही परिस्थिती बदलणे काळाची गरज आहे.

गेल्या वर्षी महाराष्ट्रात बंधारे फुटेपर्यंत पाऊस झाला. तेथे काही महिन्यातच या टंचाईची सर्वाधिक भीषणता जाणवावी, यासारखा दैवविलास नाही. ज्या राज्याच्या बहुसंख्य भागात अतिवृष्टी झाल्यानंतरही पाण्यासाठी वणवण फिरण्याची वेळ नागरिकांवर का यावी हा प्रश्नच आहे. सध्याच्या आणिबाणीच्या अवस्थेत राज्यकर्त्यांनी जनतेला विश्वासात घेणे फार गरजेचे आहे. शासन आपल्या पाठीशी आहे हा विश?वास जनतेमध्ये निर्माण होण्याकरिता शासनाने काही कठोर निर्णय घेणे अपरिहार्य आहे.

चेन्नईमध्ये काही वर्षांपूर्वी भीषण पाणी टंचाई निर्माण झाली होती व पाण्याकरिता तेथील जनता त्रस्त होती. प्रशासनाद्वारे त्यावर तातडीची उपाययोजना करीत सर्व इमारतीवर 'रेन वाटर हार्वेस्टिंग'ची कडक अंमलबजावणी करण्यात आली होती. महाराष्ट्र शासनाच्या वतीने या संदर्भात जोरदार मोहीम राबविण्यात येऊन त्याची कडक अंमलबजावणी करण्यात आल्यास इमारतीवर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याची शहरातील पाणी टंचाईच्या समस्येवर मात करण्यासाठी मोठी मदत होणार आहे. महाराष्ट्रात दरवर्षी जितका पाऊस पडतो त्याच्या केवळ १० टक्के पाऊस इस्रायलमध्ये हिरवीगार शेती फुलत आहे. इस्रायलच्या शेतीचे हे वैभव पाहण्याकरिता आपले अनेक बडे राजकीय नेते, मंत्री, प्रगतिशील शेतकरी, उद्योगपती अभ्यास दौऱ्याच्या गोंडस नावाखाली जातात. परंतु त्यांच्या या अभ्यासाचा (न केलेल्या) आपल्याकडे कवडीचाही फायदा दिसून येत नाही. करिता या सरकारी अभ्यास दौऱ्याचे थेर थांबविण्यात येऊन पाणी संवर्धनासाठी कठोर व काटेकोर उपाययोजना राबविण्यात याव्यात. पाणी टंचाई दुष्काळाची चाहूल लागल्या नंतरच सरकाराला जाग येते आणि पाऊस संपल्यावर सर्व घोषणा हवेत विरतात. ही मानसिकता बदलली नाही तर दुष्काळ मुक्तीच्या घोषणाही भाषणापुरतीच राहतील.

सध्याच्या भीषण दुष्काळाच्या पृष्ठभूमीवर फडणवीस सरकारची कसोटीची वेळ असून महत्प्रयासाने जनतेच्या आशीर्वादाने मिळालेल्या सत्तेचा उपयोग राज्याला परत एकवार सुजलाम् सुफलाम् करण्याकरिता व राज्यातील समस्त जनतेला खऱ्या अर्थाने अच्छे दिन दाखवण्याकरिता सार्थकी लावावयाचा आहे. ▮

**डॉ. प्रकाश घवघवे**/९८८१७२३३६३

# तामिळी हिंदूंनो, जागे व्हा!

यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

आता पुन्हा एकदा तामिळनाडूच्या राजकारणातून एक हास्यास्पद आणि तितकाच गंभीर विषय ऐरणीवर आला आहे. तामिळनाडूचे माजी उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांनी विधानसभेत उभे राहून, 'लोकांना विभाजित करणाऱ्या सनातन धर्माला निश्चितपणे संपवले पाहिजे' असे विधान केले. हे ऐकून खरंच आश्नर्य वाटतं की, काही लोक इतिहासातून काहीच शिकत नाहीत की काय? की, त्यांना इतिहासाची पाने चाळण्याची सवयच नसते? कारण सनातन धर्म संपवण्याची भाषा करणारे अनेक आले आणि काळाच्या ओघात ते स्वतःच संपले; पण सनातन आजही तितक्याच तेजाने तळपत आहे. उदयनिधी स्टॅलिन यांची ही पहिलीच वेळ नाही, तर त्यांनी यापूर्वीही २०२३ मध्ये सनातनाला डेंग्यू, मलेरिया म्हटले होते. यानंतर सर्वोच्च न्यायालयाने मार्च २०२४ मध्ये त्यांना फटकारले होते. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले होते की, स्टॅलिन हा सामान्य माणूस नाही; त्यांनी अधिकारांचा गैरवापर केला आहे आणि विधानाच्या परिणामांचा विचार करायला हवा होता. पण तरीही, पुन्हा त्याच आविर्भावात सनातनला संपवण्याची भाषा करणे, हे केवळ त्यांच्या बौद्धिक दिवाळखोरीचे लक्षण नसून हिंदू धर्माला संपवण्याच्या आंतरराष्ट्रीय कटाचा एक भाग आहे.



इतिहास साक्षी आहे की, ज्यांनी ज्यांनी सनातन धर्माला संपवण्याचा प्रयत्न केला, ते स्वतःच इतिहासाच्या पानांमधून पुसले गेले. सनातन धर्म हा केवळ एक धर्म नाही, तर ती एक व्यापक संस्कृती आहे. अनेक विचारांचे, महापुरुषांचे, देवी-देवतांचे तत्त्व यामध्ये आहे, जे हजारो वर्षांपासून अखंडपणे प्रवाहित आहे. अनेक आक्रमक आले, अनेक राज्यकर्ते आले, ज्यांनी आपल्या सत्तेच्या जोरावर सनातनला संपवण्याचा विडा उचलला, पण त्यांचे प्रयत्न धुळीला मिळाले. ११ व्या शतकात महमूद गझनीने भारतावर अनेकदा आक्रमण केले. त्याचे मुख्य उद्दिष्ट होते हिंदू सस्कृतीचा समूळ नायनाट करणे, त्यासाठी त्याने भारतातील मंदिरांचा विध्वंस केला आणि संपत्ती लुटली. त्याने सोमनाथ मंदिरावर अनेकदा हल्ले केले, ते उद्‌ध्वस्त केले. त्याला वाटले की, मंदिरांचा नाश केल्याने सनातन धर्म संपेल. पण काय झाले? गझनी आणि त्याचे साम्राज्य काळाच्या पडद्याआड गेले, पण सोमनाथ मंदिर आजही दिमाखात उभे आहे आणि कोट्यवधी हिंदूंचे श्रद्धास्थान आहे. पुढे मुघल सम्राट औरंगजेब हा कट्टर धार्मिक होता.

त्याने हिंदू मंदिरांचा विध्वंस केला, हिंदूंवर जिझिया कर लादला आणि अनेकांचे धर्मांतर केले. त्याला वाटले की, आपल्या क्रूर धोरणांनी तो सनातनला नेस्तनाबूत करेल; पण त्याचे काय झाले? त्याचे साम्राज्य त्याच्या मृत्यूनंतर कोसळले आणि धर्मरक्षक छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्य या हिंदू शक्तीने औरंग्याची कबर महाराष्ट्रात खोदली. औरंगजेबाचे नाव क्रूरतेचे, जिहादचे प्रतीक म्हणून घेतले जाते, पण सनातन आजही कोट्यवधी लोकांच्या हृदयात जिवंत आहे. ब्रिटिशांनी भारतावर सुमारे १५० वर्षे राज्य केले. त्यांनी भारतीयांना विभाजित करण्यासाठी अनेक कायदे केले, शिक्षण पद्धतीत बदल केले, आणि ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. त्यांना वाटले की, यामुळे भारतीय संस्कृती आणि सनातन धर्म कमकुवत होईल; पण काय झाले? ब्रिटिशांना भारत सोडून जावे लागले आणि भारत आजही एक धर्मवीर राष्ट्र म्हणून उभे आहे.

इतिहासातील या क्रूर नावांसह आधुनिक काळातही अनेक नेते आणि स्वयंघोषित विचारवंत आले, ज्यांनी सनातन धर्मावर टीका केली, हिंदू धर्माला कालबाह्य ठरवण्याचा अट्टाहास केला, आमचा धर्म संपवण्याची भाषा केली. पण त्यांचे काय झाले? ते स्वतःच राजकीय पटलावरून अदृश्य झाले. कारण सनातन धर्म हा केवळ पुस्तकांमध्ये बंद असलेला धर्म नाही, तर तो लोकांच्या मनात, त्यांच्या संस्कृतीत, त्यांच्या परंपरेत खोलवर रुजलेला आहे. पण, पण असे असले, तरी सनातन धर्म टिकला तो छत्रपती शिवरायांसारख्या महायोद्ध्यांमुळे हे लक्षात ठेवावे लागणार आहे. 'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' या न्यायाने धर्माचे रक्षण होत नाही. आपला देव आपल्याला कर्म करायला सांगतो, बसून राहायला सांगत नाही, हे आपन हिंदूंनी लक्षात घेतलं पाहिजे. जर आपल्याकडे महायोद्धे, नीडर क्रांतिकारक, संत-माहात्म्ये जन्माला आले नसते तर हा हिंदू धर्मही नेस्तनाबूत झाला असता. म्हणून आता उदयनिधीची बकवास ऐकत बसण्यात अर्थ नाही. तामिळी हिंदूंनो, आता वेळ आली आहे की तुम्ही जागे व्हा. तुमच्या श्रद्धेवर, तुमच्या परंपरेवर, तुमच्या संस्कृतीवर होणारे हे हल्ले सहन करू नका. शांत राहून तुम्ही केवळ या लोकांना प्रोत्साहन देत आहात. सर्वोच्च न्यायालयाने फटकारल्यानंतरही जर कोणी पुन्हा त्याच चुका करत असेल, तर त्याला त्याची जागा दाखवून देणे हे तुमचे कर्तव्य आहे. आता सरकार बदलले आहे, जोसेफ विजय मुख्यमंत्री झालेत. जरी त्यांचा अजेंडा आता स्पष्ट नसला किंवा ते नवखे असले किंवा ते मित्र स्टॅलिनच्या दबावात काम करतील की नाही हे जरी आता माहीत नसलं तरी सरकार बदललं आहे. ही बदलाची नांदी आहे. हीच वेळ आहे धर्मासाठी लढा उभारण्याची. कारण जो समाज अत्याचार सहन करतो तो काळाच्या पडद्याआड जातो. स्टॅलिन मुख्यमंत्री असताना जनतेवर प्रचंड दबाव होता. अर्थात आजही त्यांची इकोसिस्टिम काम करत असणार. ही इकोसिस्टिम मोडायला वेळ लागणार. पण सुरुवात तर करायला हवी. तामिळ संस्कृतीने अनेक महान हिंदू साम्राज्ये दिली आहेत. चोळ साम्राज्य हे सर्वात शक्तिशाली तामिळ हिंदू साम्राज्य मानले जाते. चोळ यांचे नौदल अत्यंत बलवान होते. त्यांनी श्रीलंका, मलेशिया, इंडोनेशिया भागांपर्यंत प्रभाव निर्माण केला. पांड्य राजवंश हा अत्यंत प्राचीन तामिळ हिंदू राजवंश होता. चेर राजवंशाचा प्रभाव आजच्या केरळ आणि पश्चिम तामिळनाडू भागात होता. या सर्व साम्राज्याने हिंदुत्वासाठी कार्य केले आहे. विशेष म्हणजे हिंदू साम्राज्य याच नावाने त्यांचा गौरव आजही केला जातो. तुम्ही या महान परंपरेचे वंशज आहात.

तुमच्या एकजुटीची आणि तुमच्या सामर्थ्याची जाणीव स्टॅलिनसारख्या परकीय नावाने बारसं करणाऱ?या हिंदुद्रोह्यांना करुन द्या. सनातन धर्म हा कोणाच्याही तीर्थरुपांची जहागीर नाही की कोणीही उठून त्याला संपवण्याची भाषा करेल. सनातन धर्म हा अनंत आहे, अनादी आहे, अवध्य आहे आणि तो नेहमीच तसाच राहील. संपतील ते, जे त्याला संपवण्याची भाषा करणारे. पण असे केव्हा होईल? जेव्हा आपण आपल्यातलं शिवतत्त्व जागृत ठेवलं तर. शिवतत्त्व म्हणजे छत्रपती शिवरायांचं तत्त्व. तामिळी हिंदूंनो, आपल्या भाषेचा, प्रांताचा अभिमान बाळगून आता गरज आहे ती फक्त आपल्या हिंदूंनी एकत्र येऊन आपल्या धर्माचे रक्षण करण्याची आणि अशा विधानांना सडेतोड उत्तर देण्याची.

'सेम्मोझी तमिळ वाझ्गा!' (तामीळ भाषा चिरायू होवो)
'हिंदू तर्मम वाझ्गा!' (हिंदू धर्म चिरायू होवो) ▮

writerjayeshmestry@gmail.com

# रविवारची पत्रे

## कॉर्पोरेट जिहादविरुद्ध शंखनाद!

आजच्या आधुनिक युगात युद्धे केवळ सीमेवर शस्त्रांनी लढली जात नाहीत, तर ती वैचारिक आणि आर्थिक स्तरावरही खेळली जात आहेत. पुणे येथे हिंदू जनजागृती समितीने आयोजित केलेल्या 'बेटी सुरक्षित, राष्ट्र सुरक्षित' या देशव्यापी अभियानाच्या शुभारंभप्रसंगी 'कॉर्पोरेट जिहाद'चे भीषण वास्तव समोर आले. आपल्यासमोर उभे असलेले संकट केवळ कॉर्पोरेट क्षेत्रापुरते मर्यादित नाही, तर जिथे संधी मिळेल तिथे भारताचे अस्तित्व पोखरण्याचे आणि देशाचे तुकडे करण्याचे नियोजनबद्ध षडयंत्र सुरू आहे. कॉर्पोरेट जिहादच्या माध्यमातून आपल्या तरुण पिढीच्या विचारधारेवर आणि धर्मावर जे पद्धतशीर आक्रमण होत आहे, ते अत्यंत चिंताजनक आहे. केवळ गुन्हेगारांनाच नव्हे, तर त्यांना छुपी मदत करर्णा?या संपूर्ण व्यवस्थेला कायद्याच्या कक्षेत आणून कठोर शिक्षा होणे आवश्यक आहे.

अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये हिजाब चालतो, पण कुंकू, टिळा आणि हातातील कलावा (दोरा) चालणार नाही, असे असंवैधानिक नियम लादले जात आहेत. हिंदूंनी आपल्या धार्मिक अस्मितेसाठी संघटितपणे आवाज उठवला पाहिजे. जेव्हा समाज एकत्र येतो, तेव्हाच अशा कंपन्यांना आपले नियम मागे घेण्यास भाग पाडले जाऊ शकते. या जिहादी संकटाचा सामना करण्यासाठी हिंदूंमध्ये दोन गोष्टी असणे अनिवार्य आहे. आपल्या धर्माचे आणि संस्कृतीचे श्रेष्ठत्व जाणून घेणे. आपल्याला अदृश्य स्वरूपात लक्ष्य करणाऱ्या शत्रूची ओळख पटवणे.

'बेटी सुरक्षित, राष्ट्र सुरक्षित' हे अभियान केवळ जनजागृतीपुरते मर्यादित नसून, ते राष्ट्ररक्षणाचे पाऊल आहे. मग ते 'लव्ह जिहाद' असो वा 'कॉर्पोरेट जिहाद', हिंदू समाजाला आता जागृत व्हावेच लागेल.

**वर्षा आवदे**/नागपूर

## अधिक मासातील दानाचे महत्त्व

अधिक मास हा हिंदू पंचांगातील एक विशेष आणि आध्यात्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा कालावधी मानला जातो. साधारणपणे दर तीन वर्षांनी येणारा हा अधिक महिना चंद्र आणि सूर्य यांच्या कालगणनेतील तफावत भरून काढण्यासाठी जोडला जातो. अधिक मास हा काळ पुण्य काळ, व्रत वैकल्य आणि विशेष व्रत करण्याचा कालावधी असतो. अधिक मास हा



विष्णू देवतेला समर्पित केला असल्यामुळेच याला पुरुषोत्तम मास असे म्हणतात. प्रत्येक महिन्यात सूर्य हा एकेका राशीत संक्रमण करत असतो. परंतु अधिक मासात सूर्य कोणत्याही राशीमध्ये संक्रमण करत नाही. त्याचा परिणाम हा सूर्य आणि चंद्राच्या गतीवरती होतो त्यामुळेच वातावरणाचाही कायापालट होतो. वातावरणातील या बदलामुळे आरोग्यावर कोणतेही विपरीत परिणाम होऊ नये, यामुळेच या काळात व्रत वैकल्य केले जातात. या काळात दान करण्याचेदेखील सांगितले जाते. त्यापैकी एक म्हणजे दीपदान. या दिवसात जावयाला घरी बोलावून त्याला दीपदान करण्याची पद्धत आहे. चांदी किंवा तांबे असे कोणत्याही धातूच्या दिव्याचे या दिवसात दान केले जाते. शिवाय याच काळात अन्नदानालाही महत्त्व असते. अधिक मासात वस्तू दान केल्याने अधिक पुण्य लाभते असे म्हणतात, देवी लक्ष्मीला चांदी ही अतिशय प्रिय आहे. लक्ष्मीनारायणाचे रूप असलेला जावई आणि मुलगी यांना चांदी देणं अधिक योग्य मानलं जातं.

**शंकर कुळकर्णी**/नागपूर, ९७६४४६५५७०

## माझ्या अपेक्षेतला भारत

भारत हा विविधतेने नटलेला एक महान देश आहे. प्रत्येकाच्या आपल्या देशाबद्दल काही अपेक्षा असतात. माझ्या अपेक्षेतला भारत हा केवळ एक भौगोलिक प्रदेश नसून ती एक आदर्श संकल्पना आहे. जिथे शांतता, समृद्धी आणि बंधुत्वाची भावना असेल व एक अखंड भारत बनून विश्वाचे प्रतिनिधित्व करेल. माझ्या अपेक्षेतील भारतात निरक्षरता नसेल. प्रत्येक बालकाला दर्जेदार शिक्षण मिळेल, ज्यामुळे ते जबाबदार नागरिक बनतील. आर्थिकदृष्ट्या, भारत एक महासत्ता असेल, जिथे गरिबी आणि बेरोजगारी नष्ट झालेली असेल. प्रत्येक हाताला काम असेल आणि 'मेक इन इंडिया' सारख्या उपक्रमांमुळे देश स्वावलंबी बनेल. माझ्या अपेक्षेतील भारत जातीभेद, धर्मभेद आणि लिंगभेदापासून पूर्णपणे मुक्त असेल. महिलांना समाजात पूर्ण आदर आणि सुरक्षितता मिळेल. माझ्या भारत देशात प्रत्येक व्यक्तीला एक मजबूत मूल्य प्रणाली असेल व जिथे सर्व मानव समान असतील. माझा भारत देश असा असावा ज्यामध्ये स्वावलंबी समुदाय असलेले लोक असतील तसेच कायद्याचे राज्य असेल आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासन असेल. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी कमी झालेली असेल. तंत्रज्ञान आणि विज्ञानाच्या क्षेत्रात भारत आघाडीवर असेल. खेड्यापाड्यातही अत्याधुनिक आरोग्य सुविधा आणि पायाभूत सुविधा (रस्ते, वीज, इंटरनेट) उपलब्ध असतील. पर्यावरण रक्षण हे माझे एक मोठे स्वप्न आहे, त्यामुळे भारत स्वच्छ आणि हरित असेल. माझ्या अपेक्षेतला भारत हा अखंड भारत बनुन उदयाला येईल व विश्व राष्ट्रांमध्ये शांतता आणि सद्भावनेचा विजेता म्हणून उदयास येईल. शांततेचा मार्ग हा सामर्थ्य, संयम आणि दूरदृष्टी यांचा संगम आहे आणि हाच मार्ग उज्ज्वल भविष्याकडे नेणारा आहे. वसुधैव कुटुंबकम् या विचाराने प्रेरित होऊन भारताने नेहमीच शांतता, सहकार्य आणि मानवतेचा संदेश दिला आहे. विश्वातील सर्व देश माझ्या भारत देशाकडे अपेक्षेने पाहतील आणि नेतृत्वाचा झेंडा त्याच्या हाती देतील, तो डौलाने फडकत राहिलं. ▮

**संजय करगुटकर**/नागपूर, ९८९०७५९००५

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



सोलापूर : सोलापूर शहरात शनि अमावस्येनिमित्त भाविकांनी शनी मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली होती.
(छाया : केवल तिवारी)



### अकलुजमधील मल्लिकार्जुन मंदिरात शनि जयंती विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरी

अकलुज : दि. १६ मे-

वीरशैव लिंगायत समाज अकलूज यांच्यावतीने आज मल्लिकार्जुन मंदिरामध्ये शनी जयंतीचा कार्यक्रम झाला. आजची महापूजा रविशंकर गुळवे यांच्या हस्ते झाली. तत्पूर्वी वीरशैव लिंगायत समाज महिला भजनी मंडळाच्या वतीने भजन व नाम जपाचे कार्यक्रम झाले. दुपारी बारा वाजता फुलांचा कार्यक्रम होऊन नवग्रह मंदिरातील शनि महाराजांचे पूजन व अभिषेक करण्यात आला. समाजातील दहावी-बारावीच्या परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समाजाच्या वतीने करण्यात आला. नंतर समाजाच्या वतीने महाप्रसाद वाटप करण्यात आले. नीरा नदीकाठी असलेल्या शनि मंदिरातही शनि महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. यशवंतनगर येथील हनुमान मंदिरातही भाविकांनी शनि जयंतीनिमित्त गर्दी केली होती.

### शक्तिपीठ महामार्गाविरोधात आज अरण येथे रास्ता रोको आंदोलन

**मोडनिंब, दि. १६ मे-**

प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार असल्याच्या निषेधार्थ रविवार दि. १७ मे रोजी अरण येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन होणार आहे. तालुक्यातील सर्व शक्तिपीठ महामार्ग बाधित शेतकऱ्यांनी सकाळी ११ वाजता मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा या प्रमुख मागणीसाठी शेतकरी एकवटणार आहेत. तालुक्यातील सर्व बाधित शेतकऱ्यांच्या वतीने आंदोलनाचे आयोजन केले असून ''चलो अरण'' अशी हाक दिली आहे.

# वळसंगच्या चौडेश्वरी यात्रेत भक्तांचा महापूर

## बाळबट्टल मिरवणूक पाहण्यासाठी परराज्यातीलही भाविकांची हजेरी

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. १६ मे-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग येथील श्री रामलिंग-चौडेश्वरी यात्रेला ऐतिहासिक परंपरा आहे. यात्रेतील मुख्य आकर्षण असलेले बाळबट्टल पाहण्यासाठी राज्यासह परराज्यातील भाविकांचा महापूर लोटला होता. रात्री १२ वाजता सुरु झालेली मिरवणूक सकाळी साडेसातपर्यंत चालली.

श्री मद्विरशैव देवसाली हटगार कोष्टी समाजाचे श्री रामलिंग चौडेश्वरी देवस्थान ट्रस्टच्या संपूर्ण जबाबदारीखाली यात्रेतील सर्व मानकऱ्यांना मान देण्यात आले. सर्व जातीधर्मांना यात्रेमध्ये सहभागी करून घेऊन वैभवशाली यात्रा करण्याची परंपरा कायम राखण्यात आली.

३०० वर्षापूर्वी कर्नाटकातील माशाळ येथील चांदीची वाटी पळवून आणलेल्या इरण्णा यांच्या समाधीला नैवेद्य देऊन



बाळबट्टलचा प्रारंभ करण्यात आला. वाम नायक, नरसिंह, बाळबडूल कुंभ, पालखी मिरवणूक, रथपूजा तसेच बाळबडूल सांभाळण्यासाठी सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेण्याची प्रथा आहे.

या बाळबट्टल सुरक्षाकरिता वळसंग पोलीस ठाण्याचा मोठा बंदोबस्त होता. यंदाच्या प्रभारी अधिकारी सपोनि राहूल डोंगरे यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांना मान देण्यात आला.

यात्रा यशस्वी होण्यासाठी देवी भक्ताकडून व स्थानिक नागरिकांकडून सहकार्य मिळाल्याची माहिती ट्रस्टी अध्यक्ष चनबसप्पा खैराटे यांनी सांगितले.

### सर्व समाजाचे प्रतिनिधी मानकरी

वळसंगच्या रामलिंग-चौडेश्वरी यात्रेला ऐतिहासिक आणि शार्याची परंपरा आहे. यात भक्तीची भर पडली असून, ब्रिटिश काळापासून ही यात्रा चालते. या यात्रेत वळसंगमध्ये अस्तित्वात असलेल्या सर्व समाजाला मान आहे. त्या त्या समाजाचे प्रतिनिधी आणि कुटुंब प्रमुख यात्रेत सहभागी होऊन यात्रेतील विधी पार पाडतात.

### पोलिस अधिकाऱ्यांना असतो मानाचा विडा

बाळबडूलच्या सुरुवातीला वळसंग पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि अनिल सनगल्ले यांना यात्रेला सुरक्षा देण्यासाठी विडा देण्यात आला. त्यानंतर देवस्थानचे पदाधिकारी, ग्रामस्थ व मानकऱ्यांनी मशाल लावून वाजत गाजत मंदिराकडे देण्यात आले. मंदिरात ते पोहचल्यानंतर त्यांचे स्वागत करण्यात आले. सगळे विधी पार पडल्यानंतर बाळबट्टल मिरवणुकीला सुरुवात झाली. या यात्रेत वळसंग पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना मान असून, तो मान पूर्वीपासूनच आहे. याला पण इतिहास आहे. हा मान यंदा प्रभारी अधिकारी राहुल डोंगरे यांना मिळाला.

# टेंभुर्णीत वाहनांच्या कर्कश सायलेन्सरवर हातोडा

## ३७ बुलेटवर कारवाई; ८३१ प्रकरणांत ७.५० लाखांचा दंड

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १६ मे -**

टेंभुर्णी शहरात कर्कश आवाज करणाऱ्या बुलेटवर पोलिसांनी जोरदार कारवाई केली आहे. विशेष कारवाईत ३७ बुलेटवर कारवाई केली असून वाहतूक नियमभंगांबाबत ८३१ प्रकरणांत ७ लाख ५० हजार ३०० रुपयांचा दंड वसूल केला आहे.



शहरातील विविध भागांत बुलेटला मोठ्या आवाजाचे सायलेन्सर बसवून वाहनचालकांकडून कर्कश आवाज केला जात असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत होत्या. याची गांभीर्याने दखल घेत सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल आत्राम यांनी तातडीने कारवाईचे आदेश दिले. यानुसार अकलूज चौक, करमाळा चौक, कुर्डूवाडी चौक तसेच शहरातील प्रमुख रस्त्यांवर पोलिसांनी नाकाबंदी व विशेष तपासणी मोहीम राबवली. तपासणीदरम्यान कंपनीचे सायलेन्सर नसलेल्या बुलेट मोटारसायकली आढळून आल्याने त्या पोलीस ठाण्यात जमा करण्यात आल्या. त्यानंतर फिटरमार्फत संबंधित सायलेन्सर काढून रोलरच्या साहाय्याने नष्ट केले. एकूण ३७ बुलेटवर कारवाई करत ११ सायलेन्सर नष्ट केले. संबंधित चालकांवर १८ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावला आहे. काळी फिल्म लावलेल्या चारचाकी वाहनांवरही कारवाई केली. यात 'थार'सह काही वाहनांचा समावेश असून संबंधित चालकांवर दंडात्मक कारवाई केली.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधातही मोहीम राबवली. रहदारीस अडथळा (४३ प्रकरणे), मालवाहू वाहनांतून प्रवासी वाहतूक (७), परवाना जवळ नसणे (८१), फॅन्सी नंबर प्लेट (५), रिफ्लेक्टर नसणे (५२), ओपन फाळका (१८), सीट बेल्टचा वापर न करणे (१७५), नंबर प्लेट नसणे (१९), काळी काच (९), वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे (३२), विना परवाना वाहन चालवणे (८), ट्रिपल सीट (७८), विना हेल्मेट (८१) पोलीस इशारा न पाळणे व इतर (१९३) अशा एकूण ८३१ प्रकरणांचा समावेश आहे.

प्रभारी अधिकारी राहुल आत्राम यांनी वाहतुकीचे नियम मोडल्यास दंडात्मक व कायदेशीर कारवाईलाही सामोरे जावे लागेल, असा इशारा दिला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. अंमलदार हनुमंत झिंजे, संजय पांडेकर, मगबुल तांबोळी, विशाल शिंदे, रशीद मुलानी, रहमान मुलानी, सोमनाथ गायकवाड, सतीश कापरे, ज्ञानदेव सरडे, संदीप साखरे, दत्तात्रय वाघमारे, प्रसाद अनभुले तसेच होमगार्ड ब्रह्मदेव मुंडे यांनी सहभाग नोंदवला.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर येथील तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-**

डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रिक्ट सोलापूर, शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील पेठ बुधवार पेठ येथील मिळकत यांसी नगर भूमापन क्र. ८९२७/अ/२/३३/३७ यामधील फायनल प्लॉट नं. ३४६ यापैकी सब प्लॉट नं. ३३, ३७ याचे एकूण क्षेत्र ५०५.९० चौ.मी. यांसी चतुःसिमा :-

पूर्वेस :- फायनल प्लॉट नं. ३४७ | दक्षिणेस :- रस्ता
पश्चिमेस :- रस्ता | उत्तरेस :- रस्ता

येणे प्रमाणे प्लॉटजागा त्यातील सर्व तदंगभूत हक्कासह.

वर वर्णन केलेली प्लॉट जागा ही जयसिंह स्वामीराव चव्हाण यांचे मालकी व कब्जेवहीवाटीची असून त्यांनी वर नमूद मिळकत ही आमचे अशिल श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदीर सार्वजनीक ट्रस्ट यानां देणगी/ दानपत्राद्वारे सदरचे हक्क व अधिकार तबदील करून देणेविषयी मान्य व कबुल केले आहे.

तथापि सदर प्लॉटजागेवर कोणाचा, गहाण, दान, लिज, बक्षीस, पोटगी, वहिवाट, कुलमुखत्यार अगर तत्सम कोणताही कसलाही इतर हक्क हितसंबंध असल्यास तो ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आंत आमचे खालील नमूद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यासह हरकत नोंदवावी.

वरील मुदती नंतर कोणाचीही कोणतीही हरकत अथवा तक्रार आमचे अशिलांवर अथवा वर नमूद मिळकतींवर बंधनकारक राहणार नाही.

ही जाहीर नोटीस दिली. ता. १६/०५/२०२६

सही/-
ॲड. आर.व्ही. नारायणकर
प्लॉट नं. ३०१, किसान नगर,
अक्कलकोट रोड, सोलापूर ४१३००६
मो.नं. ८९७५८१८१८३
अशिलातर्फे ॲड.

नगर परिषद कार्यालय तेल्हारा जि. अकोला

ई-निविदा सूचना क्र. १/२०२६-२७

याद्वारे सर्व इच्छुक संस्था, ठेकेदार व इतर यांना कळविण्यात येते की, नगर परिषद तेल्हारा मार्फत वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत १ कामाकरिता दोन लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. सदरील ई-निविदेच्या अटी व शर्ती तसेच सर्व शुद्धीपत्रके महाराष्ट्र शासनाच्या **https://mahatenders.gov.in/** या संकेतस्थळावर उपलब्ध राहतील. सदर निविदा शक्य झाल्यास **दिनांक २५/०५/२०२६ रोजी दुपारी ०५:१० वा.** उघडण्यात येतील, तरी सर्व निविदाधारक यांनी नगर परिषद कार्यालय येथे उपस्थित राहावे.

**Tender ID 2026_DMA_1303704_1**

स्वा/- (एस. एन. गावंडे)
मुख्याधिकारी,
नगर परिषद तेल्हारा

क्र.नपते/साप्रवि/बांध/७३०/२०२६
दिनांक १६/०५/२०२६

# ट्रान्सजेंडर व एमएसएम समुदायासाठी शिबीर

## 'ओरल प्रेप' या विषयावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मे-**

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, सोलापूर आणि निरामय आरोग्यधाम, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जेंडर अँड एम्पॉवरमेंट कार्यक्रमांतर्गत नवी पेठ येथील निरामय आरोग्यधाम कार्यालयात एम.एस.एम. व ट्रान्सजेंडर समुदायासाठी ओरल प्रेप या विषयावर प्रबोधन व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते.

शिबिरात फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक यांनी ओरल झीएझ - प्री-एक्स्पोजर प्रोफिलॅक्सिस विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात सोलापूर शहरातील ३५ एम.एस.एम. व ट्रान्सजेंडर व्यक्तींनी सहभाग नोंदविला. सहभागींची वैद्यकीय तपासणी डॉ. क्षितिज भडंगे यांनी केली. एचआयव्ही, व्ही.डी. आर.एल, हिमोग्लोबिन व शुगर




तपासणी व्यंकटेश कंची व प्रीती चौधरी यांनी केली. समुपदेशनाचे काम कल्पना गडगडे व संगीता जाधव यांनी पाहिले. परिचारिका नेहा जटला यांनी औषधांचे वितरण केले, तर जिया शेख, रमा गायकवाड व सुनीता पाटील यांनी नोंदणीची जबाबदारी पार पाडली. यावेळी निरामय आरोग्यधामचे प्रकल्प समन्वयक शिवाजी शिंदे, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे ब्रँच मॅनेजर सुगतरत्न गायकवाड, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी व फिल्ड को-ऑर्डिनेटर आकाश गायकवाड आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी फॅमिली प्लॅनिंगच्या निशा जगदीश, डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. एन. बी. तेली, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्राचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा सकट व निरामय आरोग्यधामच्या प्रकल्प प्रमुख सीमा किणीकर, डॉ. भालचंद्र किणीकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# 'प्रिसिजन'तर्फे कासेगाव येथे सिमेंट नाला बांधचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मे-**

प्रिसिजन फाउंडेशन व सेवावर्धिनी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या समृद्धी ग्रामविकास प्रकल्प अंतर्गत कासेगाव येथे सिमेंट नाला बांध क्रमांक ३ चे भूमिपूजन झाले.



कार्यक्रमासाठी प्रिसिजन फाउंडेशनच्या वतीने नितीन फलटणकर, माधव देशपांडे, वैशाली बनसोडे, सेवावर्धिनीचे प्रकल्प व्यवस्थापक चन्नवीर बंकुर, कासेगावचे उपसरपंच शहाजहान शेख, कृषी सहाय्यक विशाल सूर्यवंशी, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर रोकडे, संभाजी चौगुले, प्रकल्प समन्वयक शिरीष तेरखेडकर, प्रदीप माने, रेश्मा कदम तसेच शेतकरी चंद्रकांत चव्हाण, बाबुराव माने, इंद्रजीत देवमाने, लक्ष्मण जाधव, पाणलोट व्यवस्थापन समिती सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात भूमि पूजन करून करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते नारळ फोडून तसेच कुदळ मारून सिमेंट नाला बांध क्रमांक ३ च्या कामास प्रारंभ झाला. ग्रामस्थांनी जलसंधारणाच्या कामांबाबत समाधान व्यक्त केले.

समृद्धी ग्रामविकास प्रकल्पांतर्गत यापूर्वी गावामध्ये दोन सिमेंट नाला बांध, एक शेततळे तसेच दोनची कामे पूर्ण केली आहेत. याशिवाय आणखी दोन शेततळ्यांची कामे प्रस्तावित असून लवकरच त्यांची अंमलबजावणी करणार आहे. गावामध्ये अजून काही सिमेंट नाला बांध टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहेत. कामाबद्दल शेतकरी व ग्रामस्थांनी प्रिसिजन फाउंडेशन आणि सेवावर्धिनी संस्थेचे आभार मानले.

जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की डि. सोलापूर सब डि. व तालुका बार्शी पैकी बार्शी म्यु. पल हद्दीतील जागा सि. स. नं. ४२७४ या पैकी उत्तर बाजूचे क्षेत्र १४.२ चौ. मी. म्हणजे १५३.00 चौरस फूट आहे. यांसी चतु:सीमा पूर्वेस धनंजय गाडेकर, दक्षिणेस संजय गाडेकर, पश्चिमेस रस्ता व उत्तरेस बार्शी जनरल स्टोअर्सची जागा वर्णनाची श्री. संतोष सुभाष शिंदे यांच्या मालकीची व प्रत्यक्ष कब्जेदारवहिवाटीची आहे.

सदर मिळकत श्री. संतोष सुभाष शिंदे यांनी इक्विटास स्मॉल फायनान्स बँक बार्शी ता. बार्शी शाखा यांचेकडे कर्ज मागणी करून त्या कर्जापोटी वरील मिळकत तारण देण्याचे मान्य केले आहे. परंतु सदर मिळकतीच्या पूर्व हक्कदारांचे व आमचे पक्षकारांच्या ताब्यात असलेले मालकी हक्काबाबतचे मुळ खरेदीखत खरेदीदस्त क्रमांक ६५५/२०१६ दिनांक ११/०२/२०१६ व त्यासोबत त्याची नोंदणीची पावती व इंडेक्स नं. २ ची प्रत हे आमचे पक्षकार श्री. संतोष सुभाष शिंदे यांच्याकडून प्रवासा दरम्यान गहाळ झालेले आहे. सदरची कागदपत्रे कोणास आढळल्यास ती त्वरित आमचे कंपनीमध्ये जमा करावीत.

तसेच सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, अधिकार असल्यास अथवा गहाणखतास हरकत असल्यास त्यांनी सादर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसाचे आत आमच्याशी संपर्क साधावा व तशी लेखी हरकत नोंदवावी. याप्रमाणे कोणाचीही लेखी हरकत न आल्यास श्री. संतोष सुभाष शिंदे यांचे व्यतिरिक्त कोणाचाही कसलाही हक्क अधिकार नाही असे समजून सदर मिळकतीचे गहाणखत आमचे अशील कंपनीच्या हक्कात नोंदविले जाईल. त्यानंतर कोणाचीही कसलेही हरकत तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

कळावे हि जाहीर नोटीस दिली. ता. १६/०५/२०२६

सही/-
जाहीर नोटीस देणार
ॲड. प्रवीण करंजकर
''रघु - वंश'' पाटील प्लॉट्स, बार्शी ४१३४११
मो. नं. ९८२२०६५६६१

# वेतन तात्काळ न केल्यास सफाई कामगार काम बंद आंदोलन करणार

## महापालिका कामगार संघटना कृती समितीचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ मे-**

सोलापूर : महापालिका सफाई कामगारांच्या वेतनाला उशीर झाला आहे. तेव्हा तात्काळ वेतन अदा करावी अन्यथा सफाई कर्मचारी काम बंद आंदोलन करतील, असा इशारा महापालिका कामगार संघटना कृती समितीने दिला आहे. समितीचे अध्यक्ष अशोक जानराव यांच्या नेतृत्वाखाली याबाबत महापौर विनायक कोंड्याल व आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना निवेदन देण्यात आले.

त्यात म्हटले आहे की, महापालिकेच्या अनेक विभागांमधील कामगार व कर्मचाऱ्यांचे एप्रिल पेड इन मे २०२६चा मासिक पगार अर्धा महिना उलटून गेला तरी अद्याप वाटप केलेला नाही. त्यामुळे कामगार व कर्मचाऱ्यांचे हाल होत आहेत. विशेष करून सफाई कामगारांना त्यांच्या



पगारावरच कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागतो. त्यांचा मासिक पगार नेहमीच उशीरा केला जात आहे. ही फारच गंभीर बाब आहे सर्वच कामगार-कर्मचाऱ्यांचा मासिक पगार आदा करावा अन्यथा दि. २० मे रोजी महापालिकेत तीव्र आंदोलन करावे लागेल याची नोंद घ्यावी.

वेळेत काम केले नाही म्हणून कामगार कर्मचाऱ्यांना १ हजार, पाचशे व तीनशे असा दंड केला जात आहे. मग उशीरा पगारास जबाबदार असलेल्या प्रशासनातील प्रमुखावर कोण दंडात्मक कारवाई करणार? असा सवाल संघटनेने या निवेदनात उपस्थित केला आहे.

सफाई कामगारांच्या दैनंदिन कामकाजासाठी दररोज परिपत्रके काढली जात आहेत. त्यामुळे अनेकवेळा कामगारांमध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली असून त्यांच्या रजेची प्रकरणे प्रलंबित पडत आहेत. त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. सफाई कामगारांना वेठबिगारी समजू नये. त्यांचा पगार त्वरित अदा करावा अन्यथा सफाई कामगार काम बंद आंदोलन करतील असे या निवेदनात नमूद आहे. निवेदन देतेवेळी शेषराव सिरसट, अनिल जगझाप, सहदेव सोनवणे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

Classifieds

**Vacancy**


Vacancy available for Sales Engineer / Marketing Executive. Swaraj Pneumatics mobile: 8380050483

**पाहिजेत**

जुनी मील कंपाऊंड परिसरात बंगल्यात घरगुती काम करण्यासाठी २५ ते ३५ वयोगटातील महिला पाहिजे. संपर्क: ९४२३५९००३६/ ९४२०८८५६०७

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

रविवार दि. ७ जून सायं. ७ वा. हुतात्मा स्मृती मंदिरात
एक भन्नाट पण तरीही अर्थपूर्ण नाटक • भरत जाधव आणि महेश मांजरेकर यांच्या उत्कृष्ट अभिनयाची जुगलबंदी




लेखक विराजस कुलकर्णी दिग्दर्शक सुरज पारसनीस
शिवानी रांगोळे, भरत जाधव, महेश मांजरेकर
फोन बुकींग व प्रयोगासाठी संपर्क शिवाजी उपरे 9623004299
ऑनलाईन तिकीट विक्री ticketalay ॲप वर सुरु आहे.

तरुण भारत






# अॅलन, रघुवंशी, ग्रीनचा झंझावात

## केकेआर २ बाद २४७

◆ **कोलकाता, १६ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शनिवारी ईडन गार्डन्सवर गुजरात टायटन्सविरुद्ध खेळताना कोलकाता नाईट रायडर्सच्या फलंदाजांनी जोरदार फलंदाजी केली. फिन अॅलन (९३), अंगकृश रघुवंशी (नाबाद ८२) आणि कॅमेरॉन ग्रीनच्या (नाबाद ५२) यांच्या दमदार फलंदाजीच्या बळावर कोलकाता नाईट रायडर्सने २० षटकांत २ बाद २४७ धावा उभारल्या आणि गुजरात टायटन्ससमोर विजयासाठी २४८ धावांचे लक्ष्य ठेवले.

गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिलने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. आपल्या घरच्या मैदानावर प्रथम फलंदाजी करताना केकेआरचा कर्णधार अजिंक्य रहाणे व फिन अॅलनने ४४ धावांची सलामी भागीदारी केली असताना मोहम्मद सिराजने केकेआरला पहिला हादरा दिला.

सिराजने रहाणेचा (१४) त्रिफळा उडविला, परंतु त्यानंतर फिन अॅलन व अंगकृश रघुवंशीने गुजरातच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत आपल्या संघाचा डाव सावरला.







### साईने अॅलनचा झंझावात रोखला

गुजरातचे गोलंदाज अॅलनला बाद करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत होते आणि अखेरीस साई किशोरने डावखुरा गोलंदाजी करत लेग स्टंपच्या बाहेर चेंडू टाकून त्याला बाद केले. फिन अॅलनने डीप मिडविकेटवर रशीद खानकडे झेल सोपविला. फिन अॅलनने ३५ चेंडूंमध्ये ४ चौकार व तब्बल १० षट्कारांच्या मदतीने अविश्वसनीय ९३ धावा केल्या. त्याचे सात धावांनी शतक हुकले. अॅलनने रघुवंशीसोबत दुसऱ्या गड्यासाठी ९५ धावांची भागीदारी केली आणि संघाला ११.२ षटकांत २ बाद १३९ धावांचा टप्पा गाठून दिला.

### रघुवंशी, ग्रीनची जोरदार फटकेबाजी

त्यानंतरही रघुवंशीची कॅमेरॉन ग्रीनच्या साथीने जोरदार फटकेबाजी सुरूच होती आणि प्रत्येक षटकागणिक धावसंख्या वाढतच होती. त्यामुळे केकेआर २४० धावांचा टप्पा ओलांडेल असा अंदाज होता आणि तो खराही ठरला. या दोघांनी नाबाद खेळी करत केकेआरला २० षटकांत २ बाद २४७ धावा रचून दिल्या. अंगकृश रघुवंशीने अवघ्या चेंडूंत ४ चौकार व ७ षट्कारांसह नाबाद ८२ धावांची, तर कॅमेरॉन ग्रीनने २८ चेंडूंत ३ चौकार व ४ षट्कारांसह नाबाद ५२ धावांची दिमाखदार खेळी केली. या दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी नाबाद १०८ धावांची भागीदारी केली.

(वृत्तसंस्था)

# सात्त्विक-चिराग अंतिम फेरीत

## थायलंड ओपन बॅडमिंटन

◆ **पातुमवान, १६ मे**

दोन वेळा विजेते ठरलेले सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी आणि चिराग शेट्टीने पुन्हा एकदा थायलंड ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. शनिवारी थायलंडमधील निमिबुत्र स्टेडियमवर झालेल्या सामन्यात भारतीय जोडीने मलेशियाच्या गो झे फेई व नूर इझुद्दीन या जोडीचा १९-२१, २२-२०, २१-१६ अशा गुणांनी पराभव केला. सात्विक-चिराग गत वर्षीच्या स्पर्धेला मुकले होते.

पहिल्या गेमची सुरुवात मलेशियाच्या जोडीसाठी अधिक चांगली ठरली; ७-७ अशा बरोबरीनंतर त्यांनी सामन्यावर ताबा मिळविला व १५-९ अशी सहा गुणांची आघाडी घेतली. सात्त्विक व चिरागने गेमच्या उत्तरार्धात गुणांमधील ही तफावत कमी करण्याचा प्रयत्न केला असला, तरी मलेशियाच्या जोडीने आपला दबदबा कायम राखत हा गेम २१-१९ ने जिंकला.

दुसरा गेम अत्यंत चुरशीचा ठरला. दोन्ही जोड्यांनी गुणांसाठी कडवी झुंज दिली; अखेर भारतीय जोडी २०-१८ अशा स्थितीत गेम पॉईंटवर पोहोचली. हार मानण्यास नकार देत, गो आणि नूर या जोडीने दोन गेम पॉईंट्स वाचवले आणि गुणसंख्या पुन्हा बरोबरीत आणली; मात्र त्यानंतर भारतीय खेळाडूंनी मुसंडी मारत हा गेम २२-२० ने जिंकला आणि सामन्याचा निकाल तिसऱ्या (निर्णायक) गेमवर नेला. २०१९ आणि २०२४ मध्ये विजेते ठरलेल्या सात्त्विक व चिरागने त्यानंतर तिसऱ्या गेमवर पूर्णपणे वर्चस्व गाजवले. त्यांनी २१-१६ अशा सहज विजयासह अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. या विजयासह, त्यांनी या हंगामातील आपल्या पहिल्याच अंतिम फेरीतील प्रवेशाची नोंद केली.

(वृत्तसंस्था)




विजयाचा आनंद साजरा करताना सात्त्विक साईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी

# धाराशिवचा मुंतजीर ठरला मुंबई महापौर केसरी गदेचा मानकरी

## ३२ वी मुंबई महापौर केसरी कुस्ती स्पर्धा

**मुंबई, दि. १६ मे-**

आपला चेला मुंबई महापौर केसरी कुस्ती स्पर्धेत बाजी मारणारच हा त्याच्या वस्तादाना आत्मविश्वास होताच. मग काय आपल्या वस्तादांचा विश्वास सार्थ ठरवताना धाराशिवच्या मुंतजीर सरनौबतने इम्रान मुजावरला चितपट करत ३२ व्या मुंबई महापौर केसरी कुस्ती स्पर्धेच्या गदेवर आपल्या नावाची मोहर उमटवली. या यशाबद्दल मुंतजीरला एक लाख रुपयांचे बक्षीस देऊन गौरवण्यात आले.

बृहन्मुंबई महानगरपालिका आणि मुंबई शहर तालीम संघाने ३२ व्या मुंबई महापौर केसरी कुस्ती स्पर्धेची घोषणा केल्यावर माटुंग्याला लालबहादुर शास्त्री शाळेचे शिवछत्रपती पुरस्कार विजेते वस्ताद नामदेव बडरे यांनी मोठ्या आत्म विश्वासाने मुंताजीरची प्रवेशिका दिली होती. मुंतजीरनेही आपल्या वस्तादांचा विश्वास सार्थ ठरवताना अवघ्या दिड मिनिटात इम्रान मुजावरला चितपट करत मुंबई महापौर केसरी किताब आपल्या नावे केला. मुंताजिर आणि इम्रान यांच्यातली कुस्ती तुल्यबळ होईल अशी अपेक्षा होती. दोघांनीही आक्रम क सुरुवात केली होती. यंदाच्या राष्ट्रीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत ७४ किलो वजनी गटात सुवर्णपदक विजेता असलेल्या मुंताजीरने संधी मिळताच झाली डाव इम्रानला चितपट केले.



कुमार केसरीच्या अंतिम लढतीत कोल्हापूरच्या हर्षवर्धन जाधवने ठाण्याच्या जय भोईरला १०-४ अशा गुणफरकाने पराभूत केले. एकतर्फी ठरलेल्या लढतीत हर्षवर्धनने दुहेरीपट, बगालडूख आणि भारंदाज डाव टाकत जयच्या प्रतिकारातील हवाच काढून टाकली होती. अन्य लढतीत ६२ किलो गटात जयदीप बडरेने लकी खरातवर अंतिम विजय मिळवला. ७२ किलो गटात यश ढाकणेने प्रकाश माळीला पराभूत केले. विजेत्यांना मुंबई शहर तालीम संघाचे अध्यक्ष संजय शेटे, उपाध्यक्ष विठ्ठल भोसले, शशिकांत देशमुख, सचिव प्रकाश तानवडे आणि इतर मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

## पीसीबीचे अध्यक्ष मोहसिन नक्वी भारतात येणार

**नवी दिल्ली, १६ मे -**


भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावपूर्ण संबंधांच्या पृष्ठभूमीवर एक महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांना आयसीसीची बोर्ड बैठक आणि आयपीएल २०२६ अंतिम सामन्यासाठी भारतात येण्याचे निमंत्रण देण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आयसीसीची महत्त्वाची बोर्ड बैठक आणि इंडियन प्रीमियर लीगचा अंतिम सामना, या दोन्ही कार्यक्रमांचे आयोजन अहमदाबाद, गुजरातमधील नरेंद्र मोदी स्टेडियम येथे होणार आहे. आयपीएलचा अंतिम सामना ३१ मे रोजी खेळविला जाणार आहे. आयसीसीच्या बैठकींचेही आयोजन करण्यात आले आहे. आयसीसीच्या मुख्य कार्यकारी समितीची बैठक २१ मे रोजी आभासी माध्यमातून होणार आहे.

# एन.जी. क्रिकेट अॅकॅडमीचे शिंदकर, शेख जिल्हा क्रिकेट संघात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मे-**

सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित १५ वर्षांखालील मुलींच्या जिल्हा संघ निवड चाचणीत, निलेश गायकवाड क्रिकेट अॅकॅडमीच्या शांभवी शिंदकर आणि आसिन शेख या दोन अष्टपैलू खेळाडूंची निवड झाली आहे. आगामी आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेसाठी हा संघ सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.





पार्क मैदान येथे ही निवड चाचणी पार पडली. या चाचणीसाठी सोलापूर शहर व जिल्ह्यातून तब्बल १०० हून अधिक मुली उपस्थित होत्या. यामधून उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर २० खेळाडूंचा सोलापूर जिल्हा संघ निश्चित करण्यात आला. यात शांभवी आणि आसिन यांनी आपल्या अष्टपैलू कौशल्याने निवडकर्त्यांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या यशाबद्दल मुख्य प्रशिक्षक निलेश गायकवाड, प्रशिक्षक विष्णू गायकवाड, प्रशिक्षक विनोद पाटील आणि प्रशिक्षक दीपक सुरवसे यांनी शांभवी आणि आसिनचे विशेष अभिनंदन केले.

# क्रीडा गुणांच्या प्रस्तावातील त्रुटी पूर्ततेसाठी १९ मे पर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मे-**

इयत्ता १० वी आणि १२ वीच्या परीक्षेस प्रविष्ट झालेल्या ज्या खेळाडू विद्यार्थ्यांच्या क्रीडा गुण सवलत प्रस्तावांमध्ये त्रुटी राहिल्या आहेत, अशा प्रस्तावांमधील त्रुटींची पूर्तता करून सुधारित प्रस्ताव सादर करण्यासाठी आता १९ मे २०२६ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी ही माहिती दिली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील क्रीडा गुण सवलतीचे प्रस्ताव शासनाच्या 'आपले सरकार' पोर्टलद्वारे ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यात आले होते. मात्र, काही खेळाडू विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन प्रस्तावांमध्ये त्रुटी राहिल्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांना या क्रीडा गुणांच्या सवलतीचा लाभ मिळालेला नाही.

त्या अनुषंगाने ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी प्रस्तावांमध्ये त्रुटी राहिलेल्या आहेत किंवा प्रस्ताव सादर करूनही गुण मिळालेले नाहीत, अशा सर्व विद्यार्थ्यांनी आवश्यक त्रुटींची पूर्तता करून दोन प्रतींमध्ये आपले प्रस्ताव कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात सादर करावेत.

या प्रस्तावासोबत शाळा किंवा कनिष्ठ म हाविद्यालयाचे पत्र, आपले सरकार पोर्टलवरील ऑनलाईन आपलिकेशन फॉर्म, पेमेंट स्लिप, परीक्षेचे हॉल तिकीट, क्रीडा प्रमाणपत्र, प्रपत्र १ व २, चालू वर्षातील सहभागाचा पुरावा आणि चालू वर्षाचे गुणपत्रक ही कागदपत्रे जोडणे आवश्यक राहील. संबंधित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये आणि विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत म्हणजेच १९ मे २०२६ पूर्वी हे प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन श्री. हरनाळे यांनी केले आहे.

# मार्कंडेय जलतरण तलावाच्या दुरावस्था; खा. शिंदेंकडून पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मे-**

सोलापूर शहरातील श्री मार्कंडेय जलतरण तलावाच्या दुरावस्थेबाबत जलतरणपटू, त्यांचे पालक व सभासदांनी सोलापूर लोकसभा म तदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांची भेट घेऊन विविध अडचणी मांडल्या. या तक्रारींची तात्काळ दखल घेत खासदार प्रणिती शिंदे यांनी श्री मार्कंडेय जलतरण तलाव येथे भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली.

यावेळी त्यांनी जलतरणपटू, प्रशिक्षक, पालक, सभासद आणि संबंधित नागरिकांशी संवाद साधून तलावातील समस्या जाणून घेतल्या. जलतरणपटूंनी स्वच्छतागृहांची दुरावस्था, चेंजिंग रूमची खराब अवस्था, रंगरंगोटीची आवश्यकता, काही बाथरूमला दरवाजे नसणे, फुटलेल्या टाईल्स, सोलर सिस्टीमची गरज, पार्किंग परिसराचे काँक्रिटीकरण, प्रेक्षक गॅलरीसाठी शेड उभारणे आदी सम स्या मांडल्या.



तसेच जलतरण तलावातील वाढीव दर रद्द करून पूर्वीप्रमाणे वार्षिक, पंचवार्षिक आणि दशवार्षिक पास योजना सुरू करण्यात याव्यात, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. लवकरच राज्यस्तरीय स्पर्धा होणार असून उन्हाळी सुट्टीमुळे अनेक शिकाऊ विद्यार्थी जलतरण तलावात येत असल्याने खेळाडूंना सराव करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही पालकांनी सांगितले. यावेळी खासदार प्रणिती शिंदे यांनी सोलापूर शहरातील होतकरू जलतरणपटूंना अधिक चांगल्या सुविधा, दर्जेदार प्रशिक्षण आणि प्रोत्साहन मिळावे यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली. श्री मार्कंडेय जलतरण तलावातील दुरावस्था दूर करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. युवकांना राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी उपलब्ध करून देण्यासाठी शहरात आधुनिक क्रीडा सुविधा उभारण्यावर भर देणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# नागपूरचे चारही संघ उपांत्य फेरीत

## छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**बदलापूर, दि. १६ मे-**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत १८ व २१ वर्षाखालील मुले व मुली अशा चारही गटात नागपूरने विजयी हॅटट्रिकसह उपांत्य फेरीत मजल मारली आहे.

बदलापूर जिमखाना मैदानावर सुरू असलेल्या राज्य व्हॉलीबॉल स्पर्धेला तिसऱ्या दिवशीही मोठा प्रतिसाद लाभला. विदयुत प्रकाशझोतात रंगलेल्या स्पर्धेत २१ वर्षांखालील मुलीच्या गटात मुंबईने सलग तिसरा विजय संपादन केला. शेवटच्या साखळी लढतीत मुंबईने लातूर विभागाचा २५-१४, २५-११ गुणांनी पराभव करीत आपले वर्चस्व प्रस्थापित केले. उपांत्य फेरीत गटात अव्वल ठरलेल्या मुंबईची नागपूरशी लढत रंगणार आहे. या गटातील दुसरी उपांत्य लढत नाशिक विरूध्द पुणे विभागात होईल. गतविजेत्या नाशिक संघानेही ३ सामने जिंकून विजेतेपदाचे दावेदार असल्याचे दाखवून दिले आहे.

२१ वर्षांखालील मुलाच्या गटात गतविजेत्या लातूरने अपेक्षेप्रमाणे मुसंडी म ारली आहे. कोल्हापूर, संभाजीनगर पाठोपाठ अमरावतीला लोळवून लातूर गटात अव्वल ठरला. अटीतटीच्या तिसऱ्या साखळी साम न्यात लातूरने अमरावतीला २५-२०, २५-२१ गुणांनी पराभव करीत आव्हाप संपुष्टात आणले. लातूरकडून शेहराज शेख, आफताब कुरेशी, निर्भय देशमुख यांनी आक्रमक खेळ करीत मैदान गाजवले. लातूरची उपांत्य फेरीत नागपूर विरूध्द आमनासामना होईल.

मुलांच्या १८ वर्षांखालील गटात नागपूरने मुंबईला तिसऱ्या सेटपर्यंत रंगलेल्या लढतीत बाजी मारली. तिसऱ्या साखळी लढतीत पहिला सेट नागपूरने गमवला होता. दुसऱ्या सेटमध्ये तुफानी खेळ करीत विजय खेचून आणला. २४-२५, २५-२१, १५-१० गुणांनी नागपूरने मुंबईचे उपांत्य फेरीतील स्वप्न धुळीस मि ळवले. वत्सल्य किरटकर, कृष्णा तडसे यांच्या स्मॅशेसच्या जोरावर नागपूरने विजयी हॅटट्रिकचा पल्ला सर केला. उपांत्य फेरीत नागपूरची पुणे विरूध्द झुंज होईल.

मुलीच्या १८ वर्षांखालील गटात पुणे संघाने गटात अव्वल स्थान प्राप्त केले. तिसऱ्या साखळी लढतीत नागपूरचा २५-११, २५-७ गुणांनी धुव्वा उडवित उपांत्य फ ेरीत धडक मारली आहे. पुणे संघातील साक्षी साळुंखे, वैष्णवी अडलिंगे हीने लक्षवेधी खेळ करीत नागपूरला पराभूत केले. गतविजेत्या लातूर संघाने १८ वर्षांखालील मुलींच्या गटात पराभवानंतर तिसरा साखळी सामना जिंकत उपांत्य फेरीचा पल्ला पार केला. उपांत्य फेरीत पुणे विरूध्द लातूर ही एक चुरशीची लढत रंगणार आहे.




### अंतिम लढतीसाठी २३ लाखांची रोख बक्षिसे

छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेच्या अंतिम थरारासाठी बदलापूर नगरी सज्ज झाली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते बक्षीस समारंभ रविवारी संध्याकाळी होणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना २३ लाख ३५ हजारांची रोख बक्षिसे व करंडक, पदके देणार येणार आहे. साखळी स्पर्धेतील प्रत्येक सामन्यातील विजयी व पराभूत संघ, उपांत्य फेरीतील प्रत्येक विजयी व पराभूत संघ, अंतिम फेरीतील विजयी संघ व अंतिम फेरीतील उपविजयी संघाला रोख बक्षिसे दिली जाणार आहे.

### अशा होणार उपांत्य लढती

**२१ वर्षांखालील मुले** : लातूर विरुद्ध नागपूर , मुंबई विरुद्ध कोल्हापूर. मुली : नाशिक विरुद्ध पुणे,. मुंबई विरुद्ध नागपूर.

**१८ वर्षांखालील मुले** : लातूर विरुद्ध कोल्हापूर , नागपुर विरुद्ध पुणे. मुली : पुणे विरुद्ध लातूर, कोल्हापूर विरुद्ध नागपूर.

## महत्त्वाचे

### जम्मू-काश्मीरचा मुष्टियोद्धा मो. यासरने घडविला इतिहास

**श्रीनगर** : उझबेकिस्तानची राजधानी ताश्कंद येथे पार पडलेल्या आशियाई १५ वर्षांखालील मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत राजौरी, जम्मू-काश्मीरच्या १४ वर्षीय मुष्टियोद्धा मोहम्मद यासरने सुवर्णपदक जिंकून इतिहास घडविला आहे. आशियाई अजिंक्यपद स्पर्धेतील सुवर्णपदकाबद्दल मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी त्याचे अभिनंदन केले आहे. या युवा मुष्टियोध्याच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे जम्मू-काश्मीर तसेच संपूर्ण देशाची मान अभिमानाने उंचावली आहे आणि देशाला गौरव प्राप्त झाला आहे, असे अब्दुल्ला यांनी आपल्या अभिनंदनाच्या संदेशात म्हटले आहे. राजौरी येथील खेलो इंडिया केंद्रात प्रशिक्षण घेणारा मोहम्मद यासर आशियाई १५ वर्षांखालील मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारा जम्मू-काश्मीरचा पहिलाच मुष्टियुद्ध खेळाडू होऊन इतिहास रचला आहे. ५८ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावताना त्याने ताजिकिस्तान, कझाकस्तान, इराण आणि यजमान उझबेकिस्तान येथील मुष्टीयोध्यांचा पराभव केला.




### शानदार विजयानंतरही लखनौच्या पंतला दंड

**लखनौ** : चेन्नई सुपर किंग्जविरुद्धच्या आयपीएल सामन्यादरम्यान, आपल्या संघाने संथ गतीने षटके टाकल्याबद्दल लखनो सुपर जायंट्सचा कर्णधार ऋषभ पंतला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. या हंगामातील त्याच्या संघाची ही पहिलीच चूक असल्याने, ऋषभ पंतला १२ लाख रुपयांचा दंड करण्यात आला, असे आयपीएलच्या एका प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### अदिती अशोक कटमध्ये स्थान मिळवू शकली नाही

**क्वीन सिटी** : भारतीय गोल्फपटू अदिती अशोकने दुसऱ्या फेरीत १-ओव्हर ७१ चा स्कोअर नोंदविल्यानंतर क्रोगर क्वीन सिटी गोल्फ स्पर्धेत कट चुकवला. पहिल्या दिवशीच्या अदितीच्या २-ओव्हरच्या स्कोअरसोबतच, दुसऱ्या फेरीनंतर तिचा एकूण स्कोअर ३-ओव्हर पार होता, तर कट २-ओव्हर पारवर निश्चित करण्यात आला होता. अमांडा डोहेर्टी आणि जिन यंग को दुसऱ्या फेरीच्या अखेरीस संयुक्तपणे आघाडीवर होत्या. अमांडा आणि जिन यंग को या दोघींनी दुसऱ्या दिवशी ४-अंडर ६६ चा स्कोअर नोंदवून संयुक्तपणे आघाडी घेतली. आठवड्या अखेरीस प्रवेश करताना आघाडीच्या खेळाडूंचा एकूण स्कोअर ७-अंडर पार आहे. या हंगामात केवळ तिसऱ्यांदा अदिती कट चुकवली आहे. तिचा शेवटचा निकाल ब्लू बे एलपीजीए स्पर्धेत टी-३ (संयुक्त तिसरे स्थान) होता.

### आशियाई भारोत्तोलनात संजनाला कांस्यपदक

**गांधीनगर** : येथे आयोजित आशियाई भारोत्तोलन स्पर्धेत भारतीय भारोत्तोलक संजनाने कांस्यपदकाची कमाई केली असून, या स्पर्धेतील भारताच्या पदकांच्या संख्येत तिने आणखी एका पदकाची भर घातली आहे. आशियाई भारोत्तोलन स्पर्धेतील महिलांच्या ७७ किलो वजनी गटात संजनाने कांस्यपदक पटकावले. संजनाने एकूण २२० किलो वजन उचलले; ज्यामध्ये स्नॅच प्रकारात ९६ किलो आणि क्लीन अँड जर्क प्रकारात १२४ किलो वजनाचा समावेश होता. याच गटात चीनच्या गुइफांग लियाओने सुवर्णपदक, तर उत्तर कोरियाच्या क्यॉन्ग यॉंग किमने रौप्यपदक मिळवले.महिलांच्या ८६ किलो वजनी गटात वंशिका वर्मा एकूण २२० किलो वजन उचलून चौथ्या स्थानावर राहिली. संजनाने भारताच्या पदकतालिकेत चौथ्या पदकाची भर घातली. संजनाने कोमल कोहर (४८ किलो), ज्ञानेश्वरी यादव (५३ किलो) आणि अजित नारायणा (७१ किलो) यांच्या पंक्तीत स्थान मिळवले; या सर्वांनीच सध्या सुरू असलेल्या खंडीय अजिंक्यपद स्पर्धेत भारतासाठी कांस्य पदके जिंकली आहेत.



### महिला टी-२० विश्वचषकासाठी सना पाकिस्तान संघाची कर्णधार

**लाहोर** : पुढील महिन्यात इंग्लंड आणि वेल्समध्ये होणाऱ्या महिला टी-२० विश्वचषकासाठी निवड समितीने शनिवारी पाकिस्तानचा १५ सदस्यीय महिला संघ जाहीर केला असून फातिमा सना संघाचे नेतृत्व करणार आहे. या संघात पाच नवीन खेळाडूंचा समावेश करण्यात आला असून त्या विश्वचषक स्पर्धेत पहिल्यांदाच पदार्पण करणार आहेत. टी-२० विश्वचषकापूर्वी आयर्लंडमध्ये होणाऱ्या तिरंगी टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतही हा संघ सहभागी होणार आहे. या तिरंगी मालिकेत वेस्ट इंडीज हा तिसरा संघ असेल. ऐमन फातिमा, नतालिया परवेझ, रमीन शमीम, सायरा जबीन आणि तस्मिया रुबाब या खेळाडू टी-२० विश्वचषकात आपले पहिले पदार्पण करण्यासाठी सज्ज आहेत.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### शहाजी फुरडे-पाटील यांना भागवत धर्म प्रसारक पुरस्कार जाहीर



**बार्शी, दि.१६ मे-**

पालखी सोहळा पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष शहाजी फुरडे-पाटील यांना २०२६ साठी प्रतिष्ठेचा भागवत धर्म प्रसारक पुरस्कार जाहीर झाला आहे. संस्थानचे अध्यक्ष ॲड. रवींद्र पाटील यांनी ही माहिती दिली. पंढरपूर व जळगाव येथील श्री संत मुक्ताबाई संस्थान, मुक्ताईनगर यांच्यावतीने दरवर्षी पालखी सोहळ्यातील कार्य तसेच भागवत धर्म प्रसारासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या पत्रकारांचा संस्थेचे माजी अध्यक्ष भाऊसाहेब पाटील यांच्या स्मरणार्थ भागवत धर्म प्रसारक पुरस्काराने गौरव करण्यात येतो. या पुरस्काराचे स्वरुप श्री विठ्ठलाची मूर्ती, मानाचा वारकरी फेटा, शाल, श्रीफळ व संत मुक्ताबाई चरित्र ग्रंथ असे आहे. बार्शी तालुक्यातील कांदलगाव येथील फुरडे-पाटील यांनी कुटुंबीयांची वारकरी परंपरा भक्तिभावाने जपली आहे. माध्यम क्षेत्रात कार्य करताना त्यांनी १८ वर्षांपासून पालखी मार्गावरील वारीचे सातत्यपूर्ण वार्तांकन करुन भागवत धर्माचा विचार, प्रचार केला आहे. वारीतील ज्येष्ठ पत्रकार सूर्यकांत भिसे, शंकर टेमघरे, विलास काटे, राजेंद्रकृष्ण कापसे, राजाभाऊ चोपदार व पुंडलिक मोरे महाराज यांचे त्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल पत्रकार, वारकरी व विविध क्षेत्रांतून शहाजी फुरडे-पाटील यांचे अभिनंदन होत आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, दि.२५ जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्त श्री क्षेत्र पंढरपूर येथील श्री संत मुक्ताबाई मठात होणार आहे.

### माझ्या पत्नीसोबत का बोलतोस, असे म्हणत मित्राने केली मित्राची हत्या

**अकलूज, दि. १६ मे-**

तु माझ्या पत्नीसोबत का बोलतोस? तुझे तिच्याशी अफेअर आहे का? असे म्हणत एकाने आपल्या ५० वर्षीय मित्राची दगडाने ठेचून निर्घृण हत्या केल्याची घटना माळशिरस तालुक्यातील अकलूज येथे घडली. याबाबतचे वृत्त असे की, यातील मयत अशोक मुजमुले (वय-५०, रा.संगम नगर, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर) आणि आरोपी वैभव खैरमोडे हे एकमेकांचे मित्र-ओळखीचे होते. सोमवार, ११ मे रोजी रात्री ९:४५ च्या सुमारास वैभव खैरमोडे याने आपल्यामधील जुने भांडण मिटवूया, आपण एकत्र बसून बोलू, असे सांगून अशोक मुजमुले यांना फोन करुन भेटायला बोलावले. यावरुन अशोक मुजमुले हे अकलूज येथील औदुंबरनगर रोडवरील ट्रेंड मॉलजवळ आरोपींना भेटण्यासाठी गेले. अशोक मुजमुले घटनास्थळी पोहोचताच आरोपींनी त्यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. तू माझ्या पत्नीसोबत का बोलतोस? तुझे तिच्याशी अफेअर आहे, असे म्हणत अशोक यांच्या चारित्र्यावर संशय व्यक्त केला. हा वाद इतका विकोपाला गेला की, आरोपींनी अशोक यांना शिवीगाळ करत बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी आरोपी वैभव खैरमोडे याने संतापाच्या भरात जवळच असलेला एक मोठा दगड अशोक यांच्या डोक्यात घातला. डोक्याला वर्मी घाव बसल्याने आणि अतिरक्तस्रावामुळे अशोक मुजमुले यांचा जागीच तडफडून मृत्यू झाला. हत्येनंतर आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला. दरम्यान, अकलूज पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आला असून आरोपींच्या अटकेसाठी पोलिसांनी पथके रवाना केली आहेत.

**गुन्हेगारीच्या घटनांनी डोके काढले वर**

जुन्या वादातून आणि संशयातून झालेल्या या हत्याकांडाने माळशिरस तालुक्यात पुन्हा एकदा गुन्हेगारीच्या घटनांनी डोके वर काढल्याचे चित्र दिसत आहे.

### एस.के. कुलकर्णी यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी उद्या सभा

**सोलापूर, दि. १६ मे-**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे सोलापूरचे माजी अध्यक्ष, एस.के. तथा सुधाकर केशव कुलकर्णी यांचे निधन झाले. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शोकसभा आयोजित करण्यात आली आहे. ही शोकसभा सोमवार, दि. १८ मे रोजी सायंकाळी ६ वाजता शिवस्मारक सभागृहात होणार आहे.

## निधन वृत्त...

### निर्मला लवटे



**सोलापूर, दि. १६ मे-**

निर्मला गौरीशंकर लवटे (वय ७४ रा. नीलमोहोर कॉम्प्लेक्स, अंत्रोळीकर नगर) यांचे बुधवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी, सून आणि नातू असा परिवार आहे. सांगली येथील प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता यशवंत लवटे यांच्या त्या मातोश्री होत. मोदी स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले.

### अतुल मेळकुंदे



**अक्कलकोट, दि. १६ मे-**

अक्कलकोट (ता. दुधनी) रहिवाशी दुधनी नगरपरिषदचे भारती जनता पार्टीचे माजी नगरसेवक अतुल वसंतराव मेळकुंदे याचे वडील कै. वसंतराव दिगंबर मेळकुंदे (वय ८४) आकस्मिक निधन झाले आहे. त्यांच्या पार्थीवावर दि. १५ मे रोजी बारामती येथे अंतिमसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी व नातू असा परिवार आहे. ते दुधनी नगरपरिषदचे सेवा निवृत्त कर निरीक्षक होत.

### विठ्ठलराव देशमुख



**सोलापूर, दि. १६ मे-**

मोहन नगर येथील श्रीराम बेकरी दक्षिण सदर बाजार संस्थापक विठ्ठलराव कृष्णात देशमुख (वय वर्ष ९०) यांचे वृद्धापकाळाने शुक्रवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुन, जावई नातवंडे, परतुंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. ते सोलापूर येथील सिटीसर्वे ऑफिसमधून निवृत्त झाले होते. मराठा समाजाचे नेते दत्तप्रसाद देशमुख यांचे वडील होत.

# अकलूज परिसरात उन्हाळी वृक्षांना बहर

## गुलमोहर, नीलमोहोर, बहाव्याच्या रंगाने उन्हाळ्यातही नजर सुखावतेय!



**तभा वृत्तसेवा । चंद्रकांत कुंभार**
**अकलूज, दि.१६ मे-**

अकलूज माळीनगर ग्रीन फिंगर स्कूल क्रीडा संकुल स्मृती भवन या परिसरात गुलमोहर आणि बहावा हे दोन्ही वृक्ष फुलांनी लकडलेले दिसत आहेत. याच बरोबर नीलमोहर वृक्ष ही आपल्या जांभळ्या रंगाने आकर्षण करीत आहे. परिणामी उन्हाळ्यातील रणरणत्या आसमंतातही नजरेस सुखाची अनुभूती येत आहे.

गुलमोहोर, नीलमोहोर व बहावा हे वृक्ष उन्हाळ्यात बहरतात. रस्त्याच्या कडेने दिसणारी ही सुंदर झाडे आहेत. पण प्रत्येकाचा रंग, आकार आणि वैशिष्ट्य वेगळं आहे. रखरखत्या उन्हाळ्यात या वृक्षामुळे काहीसा दिलासा वाटतो. त्याचप्रमाणे सध्या करंज, देशी चिंच यांनाही मोहर आल्याने एक वेगळाच सुगंध हवेत जाणवतो.

**१. गुलमोहर (डेलोनिक्स रेजिया) :** याला फ्लेम ऑफ द फॉरेस्ट, रॉयल पॉइन्सियाना, मे फ्लॉवर ट्री असंही म्हणतात.

**वैशिष्ट्ये:**

* **उगम:** मूळचा मादागास्करचा, पण आता भारतात सर्वत्र रस्त्याच्या कडेने दिसतो.
* **फुले:** एप्रिल-मे महिन्यात पूर्ण झाड तांबड्या-नारिंगी ज्वाळांसारख्या फुलांनी बहरून जातं. पाच पाकळ्यांपैकी एका पाकळीवर पांढरे-पिवळे डाग असतात.
* **झाड:** १०-१५ मीटर उंच, फांद्या पसरट आणि छत्रीसारखी सावली देणारी.
* **फळे:** फुलांनंतर १ ते १.५ फूट लांब, तलवारीसारख्या तपकिरी शेंगा

**२. बहावा** (कॅशिया फिस्सुला) : याला अमलताश, गोल्डन शॉवर ट्री असंही म्हणतात.

**वैशिष्ट्ये:**

* **फुले :** मार्च ते मे मध्ये झाड पिवळ्याधमक, लोंबणाऱ्या गुच्छांनी बहरतं. फुलांचा रंग सोनेरी पिवळा
* **पावसाचा संकेत:** लोकमान्यता आहे की बहावा फुलल्यानंतर साधारण ४५-५० दिवसांनी पाऊस पडतो, म्हणून याला नेचर इंडिकेटर म्हणतात.
* **औषधी गुण:** आयुर्वेदात बहाव्याच्या शेंगांचा उपयोग अनेक औषधांमध्ये होतो. पोट साफ होण्यासाठी, त्वचा विकारावर वापर
* **झाड:** मध्यम उंची, पानझडी वृक्ष. फांद्यांवरून लांब-लांब पिवळ्या फुलांचे झुंबर लोंबतात.





# तब्बल ४२ वर्षांनी रंगला मैत्रीचा स्नेहसोहळा

## इंग्लिश स्कूल वेळापूरच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १६ मे-**

वेळापूर (ता.माळशिरस) येथील इंग्लिश स्कूलच्या १९८३-८४ च्या दहावी बॅचमधील माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी तब्बल ४२ वर्षांनंतर पुन्हा एकत्र आले. आठवणींना उजाळा देणारा भावनिक स्नेहमेळावा उत्साहात पार पडला.

इंग्लिश स्कूल, वेळापूर येथे हा स्नेहमेळावा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हनुमंत मेलगे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. भारत गायकवाड उपस्थित होते. यावेळी त्या काळातील शिक्षक एस. एम. माने, पी. एम. काळे, यादव, रामचंद्र पाचपुंड, प्रताप पाटील तसेच प्राचार्य आर. बी. पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात दलित मित्र कदम गुरुजी व सरस्वती देवी यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली.

यावेळी मेजर भागवत आडत, मेजर शहाजी शिंदे आणि मेजर महादेव देवकते यांचा सत्कार झाला. यानंतर यशवंतराव माने-देशमुख, तानाजी ननवरे, काशीद, दादा कुलकर्णी, राजेंद्र बावळे, सुजाता बनसोडे यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला.

अध्यक्षीय भाषणात हनुमंत मेलगे यांनी केले. प्रा. भारत गायकवाड यांनी दलित मित्र कदम गुरुजी यांनी वेळापूरमध्ये शिक्षणाची ज्योत प्रज्वलित केली म्हणून हजारो विद्यार्थ्यांचे आयुष्य उजळले. प्राचार्य आर. बी. पवार म्हणाले, इंग्लिश स्कूल वेळापूरमध्ये सुमारे दोन हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. काळे यांनी वेळापूरमध्ये खो-खो चे रोपटे लावले आणि संस्थेने त्याचे मोठ्या वृक्षात रूपांतर केले. अशा स्नेहमेळाव्यांमुळे जुन्या मित्रांच्या भेटीगाठी होतात, विचारांची देवाणघेवाण होते, अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या. सूत्रसंचालन उरणे यांनी केले.

# शासकीय जमिनीवरील अतिक्रमणांना नियमितीकरणाची संधी

## मंद्रूप अप्पर तहसीलदार विष्णु बुटे यांच्याकडून मोहिम सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १६ मे -**

गायरान वगळून अन्य शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणांच्या प्रश्नाला दिलासा देत मंद्रूप अप्पर तहसील प्रशासनाने निर्णायक पाऊल उचलले आहे. शासन निर्णयानूसार अतिक्रमण नियमितीकरण मोहिमेला वेग दिला आहे. पात्र नागरिकांना कायदेशीर हक्क मिळवून देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. व प्रांताधिकारी सुमित शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार विष्णु बुटे यांनी मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली आहे. मोहिमेत १ जानेवारी २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे ठराविक अटींवर नियमित करणार आहेत. अर्ज सादरीकरण, कागदपत्रांची पडताळणी, हरकतींची सुनावणी आणि भूमिअभिलेख विभागामार्फत मोजणी अशा टप्प्यांतून अंतिम निर्णय घेणार आहे. संपूर्ण प्रक्रिया पात्र नागरिकांना भोगवटादार वर्ग-२ दर्जा प्रदान करणार आहे. संबंधित जमिनीच्या हस्तांतरणावर पाच वर्षांची बंदी राहणार आहे. ५०० चौ. फुटांपर्यंत अतिक्रमण विनामूल्य नियमित होईल. १५०० चौ. फुटांपर्यंतच्या अतिरिक्त क्षेत्रावर शासकीय दरानुसार शुल्क आकारणार आहे.

दरम्यान गायरान, नदीपात्र, पूररेषा, सीआरझेड तसेच सार्वजनिक उपयोगाच्या जागांवरील अतिक्रमणे नियमितीकरणासाठी अपात्र ठरणार आहेत. अशा प्रकरणांमध्ये नियमानुसार नोटीस देऊन निष्कासनाची कारवाई करणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. अर्ज सादरीकरणासाठी ३१ डिसेंबर २०२६ ही अंतिम मुदत आहे. पात्र नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह विहित मुदतीत अर्ज सादर करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बुटे यांनी केले आहे.

**पात्रतेसाठी महत्त्वाचे निकष...**

- जानेवारी २०११ पूर्वीची अतिक्रमणेच पात्र
- ५०० चौरस फुटापर्यंत अतिक्रमण विनामूल्य
- १५०० चौरस फुटांपर्यंत अतिरिक्त क्षेत्रावर शुल्क
- भोगवटादार वर्ग-२ दर्जा प्रदान
- ५ वर्षे विक्री/हस्तांतरणास बंदी
- अपात्र अतिक्रमणांवर थेट निष्कासन
- गायरान जमिनीवरील अतिक्रमणे नियमितीकरणाच्या कक्षेबाहेर



# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी अधिकारी होण्याचे ध्येय ठेवावे

## पोलिस उपनिरीक्षक राजकुमार डांगे; मंद्रूपमध्ये गुणवंतांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि. १६ मे-**

ग्रामीण भागातील मुलींनी स्पर्धा परीक्षांद्वारे अधिकारी होण्याचे ध्येय ठेवावे, असे आवाहन मंद्रूप पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक राजकुमार डांगे यांनी केले.

डी. एस. कमळे गुरुजी कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट, मंद्रूप आणि अक्षर ज्युनिअर कॉलेज, कंदलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व करिअर मार्गदर्शन मेळावा मातोश्री सभागृह, मंद्रूप येथे उत्साहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

प्रमुख पाहुणे मळसिद्ध मुगळे यांनी विद्यार्थ्यांनी जिद्द, मेहनत आणि वैचारिक श्रीमंतीच्या जोरावर यश मिळवावे, असे सांगितले. प्राचार्य अशोक कोळेकर यांनी अक्षर ज्युनिअर कॉलेजचा २०१३ ते २०२६ पर्यंत बारावीचा सलग १०० टक्के निकाल कायम असल्याचे सांगितले.

तसेच क्लासेस, पोलीस भरती प्रशिक्षण, व सुविधा उपलब्ध असल्याची माहिती दिली. कार्यक्रमाला सरपंच अनिता कोरे, मंद्रूप पोलीस स्टेशनचे राजकुमार डांगे, पंचायत समिती सदस्य मळसिद्ध मुगळे, संचालक अभिजीत जवळकोटे, उपसंचालक अविनाश जवळकोटे, तपस्वी कॉम्प्युटर निंबर्गीचे आदित्य जवळकोटे, अक्षर ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य अशोक कोळेकर, प्रा. नीता वाघचवरे, प्रा. बाबासाहेब कोकरे, प्रा. महासिद्ध वाले, प्रा. महेश रेवातगांवकर उपस्थित होते. तसेच डी. एस. कमळे गुरुजी कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट, मंद्रूप येथे प्रशिक्षण घेणारे २५० पेक्षा जास्त विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते.

# भारतीय जनता युवा मोर्चातर्फे युवाशक्ती जागर यात्रा

## प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांची उपस्थिती : भाजयुमोच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मे-**

भारतीय जनता युवा मोर्चा तर्फे रविवारी सकाळी ११ वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात युवाशक्ती जागर यात्रा अंतर्गत युवक मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती भारतीय जनता युवा मोर्चाचे शहराध्यक्ष विजय कुलथे यांनी दिली. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा मेळावा होणार आहे.

कार्यक्रमास भारतीय जनता युवा मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कृष्णराज महाडिक यांचे प्रमुख मार्गदर्शन होणार आहे. तसेच महापौर विनायक कोंड्याल, आमदार सुभाष देशमुख, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, भारतीय जनता पार्टीच्या शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. भारतीय जनता युवा मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष झाल्यानंतर कृष्णराज महाडिक यांचा सोलापूरचा पहिलाच दौरा आहे. या दौऱ्यात ते भाजयुमोच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. भारतीय जनता पक्षाची ध्येयधोरणे युवक वर्गापर्यंत पोहचविण्यासाठी भाजयुमोच्या कार्यकर्त्यांनी करण्याच्या कामांबाबत भाजपचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक संवाद साधणार आहेत. या युवक मेळाव्यास कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपचे शहर अध्यक्ष विजय कुलथे यांनी केले आहे.

# पंढरपूर तालुक्यातील पावणे बारा हजार नागरिकांचे समाधान

## पंढरपूर मंडळात 3 हजार २८८; नगरपालिकेमार्फत ६० दाखले, सेवांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ मे-**

पंढरपूर महसूल विभागाशी संबंधित नागरिकांची प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी महसूल विभागाकडून तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान दि. ७ मे ते १५ मे या कालावधीत राबविण्यात आले. अभियानांतर्गत तालुक्यातील ११ हजार ७८७ ग्रामस्थांना विविध योजनांचा थेट लाभ मिळाल्याची माहिती तहसीलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

येथील श्रीयश पॅलेस येथे नगरपालिका स्तरावर १५ मे रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर झाले. या मंडळात ३ हजार २८८ तर नगरपालिके मार्फत ६० विविध सेवा व दाखले देण्यात आले.





अभियानांतर्गत पंढरपूर येथील शिबिरात निकाली काढेले फेरफार ५३६, सातबारामधील दुरुस्ती १३, डिजिटल सातबारा ७६१, ८ अ उतारे ५४२, प्रमाणपत्रे १ हजार २२, एकखिडकी व्यवस्थेअंतर्गत निकालात काढलेले अर्ज १३, अकृषक परवानगीचे दप्तर अद्यावत करणे-२, अद्यावत अभिलेख ८ वर्ग, दोन जमिनवर्ग एक करण्याबाबत कार्यवाही २, तुकडे बंदी कायद्यानुसार खरेदी विक्रीचे व्यवहार नियमानुसार करुन देणे ४२, सामाजिक योजना ५७, शिधापत्रिका १०१, कृषी यांत्रिकीकरण, फलोत्पादन व कृषी सिंचन योजना ०५, आभाकार्ड एच.बी, तपासणी व औषधोपचार १७९, ई- मोजणी फेरफार नकाशा ०५ आदी सेवा व दाखले देण्यात आले. तसेच नगरपालिका स्तरावर घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू उपलब्ध करुन देणे १३, प्रधानमंत्री आवास योजना बांधकाम परवाना प्रमाणपत्र वाटप १३, पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी १४, न.पा. क्षेत्रातील लाभार्थी जन्म मृत्यू दाखले १०, वाळू नोंदणी लाभार्थी १० अशा एकूण ६० लाभार्थ्यांना नगरपालिका प्रशासनाकडून लाभ दिल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

यावेळी आमदार समाधान आवताडे, नगराध्यक्षा प्रणिती भालके, उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, पंचायत समिती सभापती शुभम आगवणे, उपसभापती प्रमोद देशमुख, प्रांताधिकारी सचिन इथापे, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, दीपक शिंदे उपस्थित होते.

## पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्था
## रौप्य महोत्सव

# जलसंधारणाची यशस्वी 25 वर्षे



— मार्गदर्शक —
**मा. श्री. नितीनजी गडकरी**
मंत्री, रस्ते वाहतूक व महामार्ग, भारत सरकार

" धावणाऱ्या पाण्याला चालायला लावा,
चालणाऱ्या पाण्याला थांबायला लावा,
थांबणाऱ्या पाण्याला जमिनीत जिरवा,
गावातील पाणी गावात, घरातील पाणी घरात,
शेतीतील पाणी शेतीत... "
ना. श्री. नितीन गडकरी

## रविवार 17 मे 2026 — नागपूर जलसंवाद 2026

वेळ : दुपारी 4:00 वाजता
स्थळ : स्व. वसंतराव देशपांडे सभागृह, सिव्हिल लाईन्स, नागपूर

**विषय : शेतकरी आत्महत्या-मुक्त विदर्भासाठी जलसंवर्धन एक प्रभावी उपाय**

### विशेष अतिथिः

**मा. श्री. अनिल प्रकाश जोशी**
(पद्मभूषण व पद्मश्री प्राप्त)
डेहराडून, उत्तराखंड

**मा. श्री. उमाशंकरजी पांडे**
(पद्मश्री प्राप्त जलयोद्धा)
चित्रकूट, उत्तर प्रदेश

**मा. श्री. सेठपाल सिंग**
(पद्मश्री पुरस्कार प्राप्त)
सहारनपूर, उत्तर प्रदेश

**मा. श्री. संजय कश्यप**
मुख्य कार्यकारी संचालक,
सेंटर फॉर वॉटर पीस, नवी दिल्ली

**मा. श्रीमती स्वेडेविनो नात्सो**
जल आणि पर्यावरण तज्ज्ञ
कोहिमा, नागालेंड

### विशेष उपस्थितिः

**मा. ॲड. आशिष जयस्वाल**
राज्यमंत्री, महाराष्ट्र शासन

**मा. डॉ. पंकज भोयर**
राज्यमंत्री, महाराष्ट्र शासन

**विशेष आकर्षण**
'जलपर्व', 'जलक्रांती', 'कृषी कल्याण' आणि 'कॉरिडॉर्स ऑफ वॉटर सिक्युरिटी' पुस्तकांचा प्रकाशन सोहळा

## सोमवार 18 मे 2026 — जलक्रांती परिषद

वेळ : सकाळी 10.00 वाजता
स्थळ : कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग, नागपूर

### विशेष आकर्षण



**मा. श्री नाना पाटेकर**
सुप्रसिद्ध अभिनेते
अध्यक्ष, नाम फाउंडेशन



**मा. श्री आमिर खान**
सुप्रसिद्ध अभिनेते
संस्थापक, पाणी फाउंडेशन



**मा. श्री मकरंद अनासपुरे**
सुप्रसिद्ध अभिनेते
सचिव, नाम फाउंडेशन

### प्रमुख पाहुणे

**मा. श्री संजय राठोड़**
मंत्री, मृदा व जलसंधारण
महाराष्ट्र शासन

**मा. डॉ. शरद गडाख**
कुलगुरू, डॉ. पंजाबराव देशमुख
कृषी विद्यापीठ, अकोला

**मा. डॉ. प्रशांत बोकारे**
कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली

## पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थे अंतर्गत
# 60+ गावे,
## लाखो नागरिक, हजारो शेतकरी कुटुंबांना थेट लाभ
# 'तामसवाडा पॅटर्न'

भूजल संरचना अभ्यासावर आधारित शास्त्रीय व लोकसहभागी उपक्रमांमधून जलसंधारणाची प्रभावी चळवळ उभी करण्यात यश.







नाले पुनरुज्जीवन, भूजल पुनर्भरण आणि पाणलोट विकासाच्या माध्यमातून →
हजारो हेक्टर शेती सिंचनाखाली | कोरडवाहू भागात जलसमृद्धी | शाश्वत शेतीला नवी दिशा | जलसंधारणातून ग्रामसमृद्धी

**शेती आणि शेतकऱ्यांच्या कल्याणाचा ध्यास, जलसंधारणातून ग्रामसमृद्धीचा प्रवास**

विनीत : श्री प्रफुल्लदत्त जामदार, अध्यक्ष | श्री माधव कोटस्थाने, सचिव | सर्व पदाधिकारी व सदस्य, पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्था

शुभेच्छुक | ASHMI ASHMI ROAD CARRIERS PVT. LTD. | vishvaraj® Responsible Revolutions | SMS LTD | KCC KHALATKAR CONSTRUCTION INFRA PVT. LTD. – GROUP – | M/s. D. C. GURBAXANI ENGINEERS & CONTRACTORS

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



# केवळ गटनेता पदासाठी नव्हे, राजकीय समीकरणांवर पकड मजबूत करण्यासाठी चढाओढ

## 'राष्ट्रवादी'त तापला राजकीय संघर्ष



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ मे-**

सोलापूर जिल्हा परिषदेतील आपल्या पक्षाचा गटनेता निवडीवरुन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी संघर्ष तापले आहे. गटनेता निवडीवरुन सुरु असलेली रस्सीखेच केवळ पदासाठी नसून, जिल्हा परिषदेतील राजकीय समीकरणांवर पकड मजबूत करण्याची चढाओढ मानली जात आहे. दरम्यान, स्वीकृत सदस्यांच्या विषयावरुन खलबते सुरु असून यानिमित्ताने दोन गट आमनेसामने आल्याचे दिसून येत आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादीचे ११ सदस्य विजयी झाले आहेत. त्यामध्ये चार सदस्य आमदार अभिजित पाटील यांच्या नेतृत्वाखाली, तर चार सदस्य माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली निवडून आले आहेत. मोहोळचे विजयराज डोंगरे, सांगोल्याचे अतुल पवार आणि माळशिरसच्या सुषमा नारनवर यांनी स्वतंत्र ताकदीवर विजय मिळविला आहे.

गटनोंदणी प्रक्रियेदरम्यान दोन वेगवेगळी पत्रे जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल झाल्याने पक्षातील अंतर्गत मतभेद पुन्हा उघड झाले आहेत. एका पत्रात विजयराज डोंगरे यांची गटनेतेपदी निवड झाल्याचा दावा करण्यात आला, तर दुसऱ्या पत्राद्वारे अतुल पवार यांचे नाव पुढे करण्यात आले. विशेष म्हणजे, जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात आलेल्या पत्रात अतुल पवार हेच अधिकृत गटनेते असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, दहा सदस्यांमागे एका स्वीकृत सदस्याची नियुक्ती करण्यासंदर्भातील शासनाचे राजपत्र प्रसिद्ध झाल्याने या निवडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. स्वीकृत सदस्याच्या निवडीसाठी गटनेत्याची भूमिका निर्णायक ठरणार असल्यानेच राष्ट्रवादीतील दोन्ही गट सक्रिय झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.गटनोंदणीची मुदत संपल्यानंतर आता अंतिम निर्णय जिल्हाधिकारी घेणार की पक्षाचे प्रदेश नेतृत्व हस्तक्षेप करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे राष्ट्रवादीतील अंतर्गत संघर्ष आगामी काळात आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.




### गटनेता निवडीचा फैसला करणार कोण?

जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांच्या निवासस्थानी शनिवार, दि.९ मे रोजी राष्ट्रवादीच्या १० सदस्यांची बैठक झाली. तीत अतुल पवार यांची गटनेता पदी निवड झाल्याचे सांगण्यात आले. याबाबत पत्रव्यवहारही करण्यात आला.गटनोंदणीसाठी दिलेली मुदतही संपली आहे. ही बाब लक्षात घेता, गटनेता निवडीचा फैसला कोण करणार? याबद्दल कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे.

## नीट पेपरफुटीप्रश्नी आंदोलन

# कार्यकर्ते, पोलिसांत झाली धक्काबुक्की

- 'डीवायएफआय'ने केले ना.धर्मेंद्र प्रधान यांच्या प्रतिमेचे दहन
- सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मे-**

नीट पेपरफुटीप्रश्नी मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीप्रणित 'डीवायएफआय'च्या वतीने शनिवार, दि.१६ मे २०२६ रोजी सोलापुरात आंदोलन करण्यात आले. या आंदोलन दरम्यान पोलिसांनी हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला असता कार्यकर्ते आणि पोलिस यांच्यात काही काळ धक्काबुक्की व गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

'डीवायएफआय'चे जिल्हाध्यक्ष विक्रम कलबुर्गी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या आंदोलनप्रसंगी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या प्रतिमेचे दहन करण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. त्यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप केले असता आंदोलक आणखीन संतापत घोषणाबाजीने परिसर दणाणून सोडले होते.

ॲड.अनिल वासम याप्रसंगी बोलताना म्हणाले, 'एनटीए'च्या



निष्काळजीपणा आणि भ्रष्ट कारभारामुळे नीट परीक्षेचा पेपर फुटल्याने विद्यार्थ्यांचे मानसिक, शैक्षणिक आणि आर्थिक नुकसान झाले आहे. या धक्क्यातून काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. याबाबत सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावी.

या आंदोलनात बाळकृष्ण मल्याळ, विजय हरसुरे, बालाजी गुंडे, राहुल बुघले, सुनील आमाटी, अप्पाशा चांगले, किशोर झेंडेकर, योगेश अकीम, दिनेश बडगू, छंटी बिटला, विजय साबळे, शाम आडम, गोपाल बंडी, पुष्पा गुरुपनवरु, प्रदीप मरेड्डी, नरेश गुल्लापल्ली, मल्लेशम कारमपुरी, नानी माकम, कुमार यलगेटी, अभिजीत निकंबे, गुंडप्पा डक्का, सय्यद शहापूरे, सद्दाम बागवान आदी सामील झाले होते.

## नवीन मिळकतींचा शोध घेऊन कर आकारणीत हलगर्जीपणा

### महापालिकेच्या १९ कर निरीक्षकांवर दंडात्मक कारवाई

### एकूण ३५ हजार ५०० रुपये दंड वसूल होणार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ मे-**

नवीन मिळकतींचा शोध घेऊन मालमत्ता कर आकारणी करण्याच्या उद्दिष्टपूर्तीत हलगर्जीपणा केल्याप्रकरणी सोलापूर महापालिकेच्या मालमत्ता कर विभागातील १९ कर निरीक्षकांवर आर्थिक दंडाची कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याकडून एकूण ३५ हजार ५०० रुपये दंड वसूल करण्यात येणार आहे. महापालिका उपायुक्त सोनाली यादव यांनी यासंदर्भातील कार्यालयीन आदेश काढले आहेत.

महापालिका प्रशासनाने ८ एप्रिल २०२६ रोजीच्या आदेशानुसार संबंधित कर्मचाऱ्यांना नवीन मिळकतींचा शोध घेणे, अपार्टमेंटमधील शिल्लक फ्लॅट व गाळ्यांची दररोज किमान पाच मिळकतींची आकारणी करण्याचे उद्दिष्ट दिले होते. निष्काळजीपणाबाबत संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.

तरीही समाधानकारक कामगिरी न झाल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६(२)(ड) अंतर्गत आर्थिक दंडाची कारवाई करण्यात आली आहे. पाच कर निरीक्षकांना प्रत्येकी १ हजार ५०० रुपयांचा दंड आला आहे तर १४ करनिरीक्षकांना प्रत्येकी दोन हजार रुपये दंड आकारण्यात आला आहे.

### मे २०२६ च्या वेतनातून दंडाची रक्कम वसूल

दि.१३ मेपर्यंतच्या सर्वेक्षण व आकारणी अहवालाचा आढावा घेतल्यानंतर काही कर्मचाऱ्यांनी दिलेले उद्दिष्ट पूर्ण केले नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. दंडाची रक्कम मे २०२६ च्या वेतनातून जून महिन्यात एकरकमी वसूल करण्यात येणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, प्रशासनाने कठोर भूमिका घेत कारवाई केल्याने कर्मचाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

# ३५ नगरसेविकांनी अनुभवले 'महालक्ष्मी सरस २०२६'

### असं प्रदर्शन महाराष्ट्रात पहिल्यांदाच.!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ मे-**

बीकेसी येथे सुरू असलेले 'महालक्ष्मी सरस २०२६' हे प्रदर्शन आता केवळ मुंबईपुरते मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी ठरत आहे. ग्रामीण महिलांच्या उद्योगांना मिळालेलं भव्य व्यासपीठ, आधुनिक उभारणी आणि जागतिक दर्जाचं नियोजन पाहण्यासाठी विविध जिल्ह्यांमधून नागरिक आणि प्रतिनिधी आवर्जून भेट देत आहेत. याच पार्श्वभूमीवर १२ मे २०२६ रोजी सोलापूर जिल्ह्यातील तब्बल ३५ नगरसेविका, शहर पदाधिकारी आणि महिला प्रतिनिधींनी 'महालक्ष्मी सरस २०२६'ला सदिच्छा भेट दिली.

वंदे मातरम ट्रेनने पहाटे मुंबईत दाखल झालेल्या या प्रतिनिधी मंडळामध्ये उपमहापौर ज्ञानेश्वरी दवेकर, भाजप जिल्हाध्यक्ष रोहिणी तळवळकर, भाजप जिल्हा सरचिटणीस अली मरेरे, शहर उपाध्यक्ष ड. साधना सांगवे यांच्यासह अनेक महिला नगरसेविकांचा समावेश होता. या विशेष भेटीचे आयोजन ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या माध्यमातून करण्यात आले होते.

प्रदर्शनाला भेट दिल्यानंतर महिला प्रतिनिधींनी 'महालक्ष्मी सरस २०२६'चे विशेष कौतुक केले. शहर उपाध्यक्ष ॲड. साधना सांगवे यांनी सांगितले की, हे केवळ प्रदर्शन नाही,



तर महिलांच्या उद्योगविश्वाचा प्रत्यक्ष अभ्यास करण्याचं मोठं व्यासपीठ आहे. गावपातळीवर महिला किती वेगवेगळ्या प्रकारचे व्यवसाय करू शकतात, त्यांच्या हातामध्ये किती अफाट कला दडलेली आहे आणि त्या कल्पकतेच्या जोरावर किती मोठं काम उभं करू शकतात, हे येथे आल्यावर प्रत्यक्ष अनुभवता आलं.

नदीतील दगडांपासून घड्याळ तयार करण्यासारखी कल्पक कलाकुसर, विविध प्रकारचे पापड, लोणची, घरगुती पदार्थ, अगरबत्ती उद्योग, हस्तकला, सेंद्रिय उत्पादने आणि डिजिटल तसेच ऑफलाईन व्यवसायाच्या संकल्पना पाहून महिला प्रतिनिधींनी आश्चर्य व्यक्त केले. आपण कधी कल्पनाही केली नव्हती असे अनेक व्यवसाय येथे पाहायला मिळाले. या प्रदर्शनामुळे महिलांना उद्योगाची नवी दिशा मिळू शकते, असेही त्यांनी सांगितले.

उपमहापौर ज्ञानेश्वरी दवेकर यांनीही 'महालक्ष्मी सरस २०२६'चे कौतुक करत हे प्रदर्शन महिलांसाठी अत्यंत प्रेरणादायी असल्याचे सांगितले. इथे अनेक महिला कमी शिक्षण असूनही आपल्या कल्पकतेच्या, मेहनतीच्या आणि हाताच्या कलेच्या जोरावर मोठे व्यवसाय उभे करत आहेत. त्यांच्या उत्पादनांना आता उमेद मार्टसारख्या माध्यमांतून जागतिक बाजारपेठ मिळत आहे. महिलांसाठी अशी शाश्वत बाजारपेठ निर्माण होणं ही अत्यंत अभिमानाची बाब आहे, असे त्यांनी नमूद केले.

यंदाच्या प्रदर्शनातील विशेष थीम, कंटेनरच्या माध्यमातून साकारलेली आकर्षक मांडणी, व्यापारी वर्ग आणि ग्रामीण उत्पादनांमधील नातं दर्शवणारी संकल्पना, तसेच प्रवेशद्वाराजवळ उभारण्यात आलेल्या महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य प्रतिकृतींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.




## सक्षम परिचारिका वाचवतात जीव : डॉ. गौरी कहाते


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मे-**

आजच्या बदलत्या आरोग्य व्यवस्थेत परिचारिकांची भूमिका केवळ रुग्णसेवेपुरती मर्यादित नसून आरोग्य शिक्षण, जनजागृती, आपत्कालीन सेवा, मानसिक आधार आणि आरोग्य व्यवस्थापन यामध्येही त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन डॉ. गौरी कहाते यांनी केले.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा, इंडियन रेड क्रॉस सोसायटी शाखा सोलापूर व गीतगंगा सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक परिचारिका दिनाच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे सचिव जयेश पटेल हे होते. यावेळी एफपीएआय सोलापूर शाखेच्या व्हाईस चेअरपर्सन प्रा.डॉ. आयेशा रंगरेज, सदस्य आण्णासाहेब कोतली, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, गीतगंगा फाउंडेशनचे अध्यक्ष व्यंकटेश कंची, खजिनदार वेणूगोपाल उत्तूर, सल्लागार चन्नेश इंडी, डॉ.कविता चंडक उपस्थित होते.

या कार्यक्रमांतर्गत परिचारिकांसाठी होम मिनिस्टर व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. दीपाली वानखेडे ही होम मिनिस्टरची मानकरी ठरली. शीतल मागाडे व रेखा आंधळकर या संगीत खुर्चीच्या विजेत्या तर निलोफर शेख व स्नेहा जटला या इतर खेळातील विजेत्या ठरल्या. विजेत्यांना आकर्षक भेटवस्तू, साडी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

स्वागत कल्पना गडगडे यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले. आभार व्यंकटेश कंची यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आकाश गायकवाड, श्रुती कोल्हापूरे, सुनीता पाटील, प्रीती चौधरी, बबिता दुपारगुडे, रमा गायकवाड, जिया शेख यांनी परिश्रम घेतले.




# जांबमुनी मोची समाज सेवा मंडळाच्या सोहळ्यात २२ जोडपी विवाहबध्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मे-**

श्री जांबमुनी मोची समाज सेवा मंडळ यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या सामुदायिक विवाह सोहळ्यांतर्गत समाजातील २२ जोडपी विवाहबध्द झाली. बापूजी नगर येथील पटांगणामध्ये सुमारे सहा हजार वऱ्हाडींच्या उपस्थितीत विवाह सोहळा झाला.

माणिक नारायणपेठकर बंधू यांच्या हस्ते जांबमुनी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सर्व वधू-वरास रवि शिंगे यांच्याकडून संसारोपयोगी साहित्य कुकर भेट देण्यात आले. यावेळी श्रीनिवास जंगम, व्यंकटेश हणमापागोलु, दत्तू आसादे, परशुराम वाघमारे, बाबू विटे, शिवलिंग म्हेत्रे, अशोक करमोळु, सिध्दप्पा वाकीटोळू, सुरेशद करमोळु, नागनाथ देशम यांच्याकडून विवाह सोहळ्यातील जेवणाची व्यवस्था करण्यात आली.

## २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे होणार नियमित

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ मे-**

राज्यशासनाच्या निर्णयानुसार १ जानेवारी २०११ पूर्वी सरकारी जमिनीवर झालेली निवासी अतिक्रमणे नियमितकरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. पंढरपूर शहरातील पात्र नागरिकांनी कागदपत्रांसह तातडीने अर्ज दाखल करावेत, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.


गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न निकाली लागल्याने येथील अतिक्रमितधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे. पाचशे चौरस फुटांपर्यंतचे अतिक्रमण विनामूल्य कायम करणार आहे. ५०० ते १५०० चौरस फुटांपर्यंतच्या अतिरिक्त क्षेत्रासाठी बाजारमूल्याच्या दहा टक्के शुल्क आकारण्यात येणार आहे. अर्जासोबत मतदार यादीतील नाव, वीज बिल, मालमत्ताकर पावती, नगरपालिका हद्दीतील रहिवासाचे पुरावे सादर करणे आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले.

# महामार्ग सुरक्षा व ट्रॉमा केअर हॉस्पिटलसाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ मे-**

शहरातील प्रख्यात गॅस्ट्रोलॉजिस्ट व सामाजिक बांधिलकी जपणारे वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. सूर्यप्रकाश राजेश कोठे यांनी महामार्गांवरील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन आरोग्य सुविधांचा गंभीर प्रश्न केंद्रीय स्तरावर मांडत महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला. इंडियन मेडिकल असोसिएशन (खच) चे अध्यक्ष डॉ. संजयकुमार मंटाळे यांच्यासमवेत त्यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची सदिच्छा भेट घेऊन राष्ट्रीय महामार्ग सुरक्षा, ट्रॉमा केअर हॉस्पिटल उभारणी आणि आपत्कालीन वैद्यकीय व्यवस्थेबाबत सविस्तर निवेदन सादर केले.

राष्ट्रीय महामार्गांवर अत्याधुनिक ट्रॉमा केअर सेंटरची उभारणी, प्रत्येक ५० ते १०० किलोमीटर अंतरावर हायवे इमर्जन्सी मेडिकल युनिट सुरू करणे, त्र्ऋझड यंत्रणेसह सुसज्ज म्बुलन्स नेटवर्क निर्माण करणे, खासगी व शासकीय रुग्णालयांचा महामार्ग प्राधिकरणाशी समन्वय वाढवणे, अपघातप्रवण क्षेत्रांमध्ये तातडीच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे तसेच रस्ते सुरक्षा जनजागृती मोहिमेला अधिक बळ देणे या मागण्यांचा समावेश होता.



यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी निवेदनातील विषय गांभीर्याने ऐकून घेत सकारात्मक प्रतिसाद दिला. निवेदनामध्ये मांडलेले विषय मी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय आरोग्य मंत्र्यांपर्यंत पोहोचवून ते लवकरात लवकर मार्गी लागावेत यासाठी प्रयत्न करणार आहे, असे आश्वासन त्यांनी दिल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी -१४४३

**तैसी हे जाण माया । तूं भ्रमत आहासी वायां ।**
**शस्त्रे हाणितलिया छाया । जैसी आंगी न रुपे ।।**

अन्यायाविरुध्द लढा देण्यासाठी रणभूमीवर आलेला अर्जुन मोहग्रस्त होऊन आता मी युध्दच करणार नाही असे म्हणू लागला. त्याचे असे म्हणणे त्याच्या सख्याला पटले नाही. म्हणून हा श्रीकृष्ण सखा अर्जुनाला न्याय, अन्याय, सत्य, असत्य, कर्तव्य याचे स्पष्टीकरण देऊन युध्दासाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करीत आहे. अर्जुनाने सारासार बुध्दीने विचार करुन सत्य, असत्य जाणून घ्यावे अशी श्रीकृष्णांची ईच्छा आहे. जे मिथ्या असते तेच असार असते व जे स्वाभाविकपणे नित्य असते तेच सार असते, म्हणजचे सत्य असते.



आत्मा हा अविनाशी आहे. त्याचा संहार करु म्हटले तरी होणार नाही. पण अर्जुना तु देहाभिमानाने या शरीराकडे वेगळया दृष्टीने पाहून मी या कौरवांना मारणारा आहे व हे कौरव, गुरुजन माझ्या हातून मरणारे आहेत असे म्हणत आहेस. पण ख-या अर्थाने विचार केला तर तू यांना मारणारा नाहीस तसेच हे तुझ्या हातून मरणारे नाहीत, याचा विचार तू करायला पाहिजेस असे श्रीकृष्ण म्हणाले.

भगवंत पुढे म्हणाले, ज्याप्रमाणे जे स्वप्नात पाहावे, ते स्वप्नातच खरे वाटते, परंतु जागे होऊन पाहिले तर त्याचा मागमूस राहात नाही. अगदी याप्रमाणे ही माया आहे हे समजून घे. अर्जुना स्वप्नात खरे वाटल्या प्रमाणे ही माया तुला खरे वाटण्यास भाग पाडीत आहे. तू अकारण भ्रमात वावरतो आहेस. जसे माणसाच्या पडछायेवर वार केला असता माणसास मार लागत नाही किंवा पाण्याने भरलेला कुंड, कुंभ कलंडला तर त्यातील सुर्याचे प्रतिबिंब नाहीसे होते मात्र मुळ सुर्य तसाच राहतो. त्याप्रमाणे शरीर नष्ट झाले तरीही त्यातील आत्मा नष्ट होत नाही. तो अविनाशी असल्याने फक्त या नाशिवंत देहाचा तो संबंध तोडतो. म्हणून तू कोणाला मारण्याची भाषा करीत आहेस, याचा थोडा विचार कर. मोहामुळे खोटया भ्रांतीचा आरोप सत्यस्वरुपावर तू करु नये, अशीही अपेक्षा भगवंत अर्जुनाकडून करीत आहेत. आपणही दैनंदिन जीवनात मोहवश, मायावश, होऊन ब-याच वेळा नकोते करुन जातो. आपले परके असा भेद करण्यात अनेक वेळा एखादयावर आपण अन्याय करुन जातो. मोहामुळे सत्य, असत्य जाणण्याची आपली मानसिकता राहात नाही. संसाररुपी मोहात कळत-नकळत माणूस एवढा अडकला जातो की त्यातून बाहेर पडणे त्याला कठीण होते. कळत नकळत दैनंदिन तो वरचेवर या संसाररुपी मोहात जास्त अडकत जातो. दलदल असलेल्या जागेत अडकल्यासारखे त्याची अवस्था होते. जगावर राज्य करण्याची मनोकामना ठेवणारा माणूस मोहामुळे, मायेमुळे स्वत:वर राज्य करु शकत नाही. म्हणजे ख-या अर्थाने माणूस पहिल्याच पायरीवर हरलेला असतो. अर्जुन युध्दभूमीत अडकला आहे व आपण संसार भूमीत अडकलो आहेत. आपल्या व अर्जुनाच्या मोह भूमी जरी वेगळया असल्या तरी यातून बाहेर पडणे हे अर्जुनाचे व आपले ध्येय्य असल्याने आपणही या ओव्यांच्या माध्यमातून भगवंतासोबत राहू या. म्हणजे अर्जुनाप्रमाणे आपणालाही मोहाच्या, मायेच्या जाळयातून बाहेर पडता येईल व हे संसाररुपी मोहाचे युध्द सहज जिंकता येईल.


**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : रविवार,**
**दि. १७ मे २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - अधिक, शु. प्रतिपदा**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- कृतिका (१४.३२)**
**योग - शौभन (०६.१५)**
**करण - किंस्तुघ्न (११.३६)**

**राहू काल : रविवार**
**दु. ४.३० ते ६.००**
**दिनविशेष : * जागतिक दूरसंचार आणि माहिती समाज दिन.**
**१९१०: ख्यातनाम मराठी साहित्यिक आणि 'केसरी'कार 'गोपाळ गणेश आगरकर' यांचे निधन.**
**१९६१: भारतीय क्रिकेटपटू आणि समालोचक 'रवी शास्त्री' यांचा जन्म.**



## डब्ल्यूआयटीच्या १५० किलोवॅट हायड्रॉलिक टेस्ट स्टँडमुळे संशोधनाला चालना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मे-**

वालचंद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (डब्ल्यूआयटी), सोलापूर येथे १५० किलोवॅट क्षमतेच्या अत्याधुनिक हायड्रॉलिक टेस्ट स्टँडच्या स्थापनेमुळे संशोधन व प्रायोगिक शिक्षणाला मोठी चालना मिळणार आहे. डॅनफॉस इंडस्ट्रीज, पुणे यांच्या सहकार्याने उभारण्यात आलेली ही सुविधा विद्यार्थ्यांना उद्योगमानक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव देणार असून, अभियांत्रिकी शिक्षणात नव्या संधी निर्माण करणार आहे.

ही सुविधा केवळ पारंपरिक प्रयोगशाळा नसून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव देणारे आधुनिक प्रशिक्षण केंद्र आहे. उच्च क्षम तेच्या हायड्रॉलिक पंप्स आणि मोटर्सची अचूक चाचणी करण्यासाठी सज्ज असलेली ही यंत्रणा सोलापूर व परिसरात एकमेव मानली जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाचा थेट अनुभव घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. प्रकल्पाच्या उभारणीत डॅनफॉस इंडस्ट्रीजमधील तज्ज्ञांचे मोलाचे योगदान लाभले. राहुल वळे, मनोज घोडमारे, भाग्येश जगताप, सचिन कामाटी आणि राजेश जाधव यांच्या तांत्रिक मार्गदर्शनामुळे ही सुविधा यशस्वीरीत्या साकार झाली आहे. महाविद्यालयातील मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. भाग्येश देशमुख यांच्या नेतृत्वाखाली ही सुविधा कार्यरत राहणार असून, या प्रकल्पासाठी वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त वैभव गांधी, भूषण शहा, पराग शहा तसेच प्राचार्य सचिन गेंगजे यांच्या दूरदृष्टीमुळे महाविद्यालयात आधुनिक तंत्रज्ञानाधारित प्रयोगशाळा उभारणीला गती मिळाली आहे.

# 'नीट'मुळे टीईटीची परीक्षा आता २८ जूनला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मे-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून घेण्यात येणाऱ्या शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात महा टिईटी परीक्षेची तारीख बदलण्यात आली असून, आता ही परीक्षा रविवार, दि. २१ जूनऐवजी दि. २८ जून रोजी घेतली जाणार आहे. नीट पुनर्परीक्षा आणि काही प्रशासकीय कारणांमुळे हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती परिषदेकडून देण्यात आली आहे. राज्यभरातील सहा लाखांहून अधिक उमेदवार या परीक्षेला सामोरे जाणार असल्याने यंदाची टिईटी राज्यातील सर्वांत मोठ्या स्पर्धात्मक परीक्षांपैकी एक ठरणार आहे.

यंदा डी.एड., बी.एड. धारकांसह कार्यरत शिक्षकांनीही मोठ्या प्रमाणावर अर्ज केल्याने परीक्षार्थींची संख्या लक्षणीय वाढली आहे. दरम्यान, परीक्षा पुढे ढकलण्याच्या निर्णयाचे स्वागत होत असतानाच, परीक्षेच्या स्वरूपाबाबत आणि उत्तीर्णतेच्या प्रमाणाबाबतही चर्चा सुरू झाली आहे. स्पर्धा परीक्षा विद्यार्थी तथा डी.एड., बी.एड. स्टुडंट असोचे राज्य उपाध्यक्ष प्रशांत शिरगुर यांनी याबाबत प्रतिक्रिया देताना सांगितले की, टीईटी परीक्षा जूनमध्ये होत असल्याचे स्वागत आहे. मात्र गेल्या काही वर्षांचा निकाल पाहता उत्तीर्णतेची टक्केवारी अत्यल्प दिसून येते.

विद्यमान शिक्षकांच्या पदोन्नतीसाठी आणि भावी शिक्षकांना नोकरीच्या संधी उपलब्ध होण्यासाठी पेपरची कठीणता मर्यादित ठेवणे आवश्यक आहे. राज्य शासन आणि महाराष्ट्र परीक्षा परिषदेला वर्षातून किमान दोन वेळा टीईटी परीक्षा घेण्याची मागणीही केली. वाढती उमेदवारसंख्या आणि शिक्षक भरतीची प्रतीक्षा पाहता, टीईटी आता केवळ पात्रता परीक्षा न राहता हजारो युवकांच्या रोजगाराच्या आशेचा केंद्रबिंदू बनली आहे.

**पेपर क्रमांक १ आणि २**
**हे दोन्ही पेपर एकाच दिवशी**

राज्यभरात पेपर-१ साठी २ लाख ८७ हजारांहून अधिक, तर पेपर-२ साठी २ लाख ९६ हजारांपेक्षा जास्त उमेदवारांनी नोंदणी केली आहे.

**सोलापूर शहर जिल्ह्यातून २८ हजाराहून अधिक उमेदवार देणार टीईटी परीक्षा**

टीईटी परीक्षेसाठी सोलापूर जिल्ह्यातूनही यंदा विक्रमी प्रतिसाद मिळाला असून, तब्बल २८ हजारांहून अधिक उमेदवार परीक्षा देणार आहेत. त्यामध्ये पेपर क्रमांक १ साठी १२ हजार ३७५, तर पेपर क्रमांक २ साठी १६ हजार १५८ उमेदवारांचा समावेश आहे. त्यामुळे जिल्ह्यात परीक्षा केंद्रांचे नियोजन, वाहतूक, मनुष्यबळ आणि तांत्रिक व्यवस्थापनाची मोठी जबाबदारी प्रशासनावर येणार आहे.

## हरि ओम संस्थेच्या अध्यक्षपदी बालाजी जंगम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मे-**



हरी ओम विणकरबाग बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्षपदी बालाजी जंगम व उपाध्यक्ष इराण्णा चांशेट्टी यांची एक मताने निवड सदर सभा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणनात संपन्न झाले. जंगम आपल्या मनोगत व्यक्त करताना सांगितले.

संस्थेचे या वर्षीचे पहिले कार्य जुलै महिन्यात येणाऱ्या श्री शेगाव गजानन महाराज पालखी चे स्वागत करणे व व वारकऱ्यांना महाप्रसादाची व्यवस्था करणे, तसेच सामाजिक धार्मिक शैक्षणिक कार्य आती घेणे सभेला लक्ष्मीकांत दंडी, अंबादास दिकोंडा, संजीव नादरगी, हिरालाल धुळम, गिरीश शंकू, प्रकाश पुल्ली उपस्थित होते



## छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त ३६९ वृक्षांचे वाटप

**संभाजी ब्रिगेडने दिला पर्यावरण रक्षणाचा संदेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मे-**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६९व्या जयंतीनिमित्त संभाजी ब्रिगेडच्या वतीने अनावश्यक खर्चाला फाटा देऊन छत्रपती संभाजी महाराज चौकात एक वृक्ष शंभुराजे साठी या संकल्पनेवर ३६९ रोपवाटप करण्यात येऊन पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला.

शौर्य आणि पर्यावरणाचा जागर करून शंभूराजांच्या विचारांचा वारसा जपत, 'पर्यावरण रक्षण' हाच खरा राजधर्म मानून छत्रपती संभाजी महाराज जयंती अनोख्या पद्धतीने साजरी करण्यात आली. शहरातील वाढत्या तापमानामुळे नागरिकांना उकाडा असह्य होत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी व वाढत्या उष्णतेवर मात करण्यासाठी संभाजी ब्रिगेडने हा उपक्रम राबविला आला.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, महिला जिल्हाध्यक्ष मीनल दास, वकील आघाडीचे अध्यक्ष गणेश कदम, उपाध्यक्ष मनीषा कोळी, कार्याध्यक्ष सोनाली सगर सचिव माधुरी चव्हाण, रुचिरा चव्हाण, उत्तर तालुकाध्यक्ष विक्रम वानकर, कार्याध्यक्ष विशाल साळुंखे सचिव राजेंद्र माने आकाश भोसले आधी उपस्थित होते.

## सोलापुरात शुक्रवारपासून त्रीनाट्य महोत्सव

**रंगकर्मी नामदेव वठारे स्मृतीनिमित्त आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मे-**



रेल्वेतील तिकीट तपासनीसाची जबाबदारी सांभाळत असतानाच रंगभूमीची अखंड सेवा करणारे, नेपथ्यकार व कुशल संघटक म्हणून ओळख असलेले दिवंगत रंगकर्मी नामदेव वठारे यांच्या २५व्या स्मृतिवर्षानिमित्त २२ ते २४ मे दरम्यान दररोज सायंकाळी ७ वाजता हुतात्मा स्मृती मंदिर येथे प्रायोगिक, हौशी आणि व्यावसायिक अशा त्रीनाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

ललित कला मंदिर या संस्थेच्या माध्यमातून अनेक कलावंतांना घडविणाऱ्या नामदेव वठारे यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी २२ मे रोजी महाराष्ट्र कल्चरल निर्मित 'ये जो पब्लिक है..' हे नाटक सादर होणार आहे. या नाटकाचे लेखन व दिग्दर्शन विवेक बेळे यांनी केले असून कलाकारांमध्ये गायत्री देशपांडे, निकेतन नंदुरबरे, आनंद इंगळे आणि शैलेश दातार यांचा समावेश आहे. दि. २३ मे रोजी सोलापुरातील झुंजार प्रतिष्ठान निर्मित व मल्हार अकॅडमी प्रस्तुत 'विक्रमाचा घातांक क्ष' हे राज्य नाट्य स्पर्धेत पारितोषिक प्राप्त नाटक रंगणार आहे. प्रा. रवीशंकर झिंगरे लिखित या नाटकाचे दिग्दर्शन व नेपथ्य प्रा. अमोल देशमुख यांनी केले असून प्रकाशयोजना उमेश बटाणे यांची आहे. महोत्सवाच्या अखेरच्या दिवशी दि. २४ मे रोजी ज्येष्ठ लेखक शिरीष देखणे लिखित पहिले व्यावसायिक नाटक 'सुभेदार गेस्ट हाऊस' सादर होणार आहे. विजय केकरे यांच्या दिग्दर्शनाखाली सौरभ गोखले, शंतनू मोघे, विनिता दाते यांच्यासह अन्य कलाकार भूमिका साकारणार आहेत. महोत्सवाचे उद्घाटन २२ मे रोजी महाराष्ट्र कल्चरल सेंटर, पुणेच्या सर्वेसर्वा शुभांगी दामले यांच्या हस्ते होणार आहे. तर समारोपप्रसंगी ज्येष्ठ नाट्य व चित्रपट अभिनेत्री कमलप्रभा हावळे यांच्या हस्ते शिरीष देखणे यांचा सत्कार करण्यात येणार आहे. तसेच 'विक्रमाचा घातांक क्ष' या नाटकातील कलाकारांचा सत्कार ॲड. आनंद देशपांडे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती संयोजक चंद्रशेखर वठारे यांनी दिली.

## तक्रार प्रलंबित ठेवल्या प्रकरणी ३२ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मे-**

आपली तक्रार पोर्टल / माय सोलापूर नागरीकांच्या तक्रारीच्या पवरील तसेच लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत नागरिकांच्या अर्जाचे निराकरण मुदतीत न करणे, केलेल्या कार्यवाहीची माहिती अद्ययावत न करणे या कामकाजातील निष्काळजीपणाच्या गैरवर्तनासाठी महापालिकेच्या एकूण ३२ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर १६ हजार ३०० रुपये दंड आकारण्यात आला आहे.

महापालिका अतिरिक्त आयुक्त तथा सामान्य प्रशासन विभागाच्या नियंत्रण अधिकारी वीणा पवार यांनी कारवाईचे आदेश काढले आहेत. नागरिकांनी नोंदवलेल्या अधिसूचित सेवा वेळेत न निकाली काढणाऱ्या आणि तक्रारी प्रलंबित ठेवणाऱ्या महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. सोलापूर महानगरपालिकेने एकूण ३२ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर आर्थिक दंड आकारण्यात आला असून १६ हजार ३०० रुपयांचा दंड वसूल करण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्त तथा सामान्य प्रशासन विभागाच्या नियंत्रण अधिकारी वीणा पवार यांनी दिले आहेत. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत प्राप्त अर्जावरून विविध विभागातील १३ कर्मचाऱ्यांना एकूण १३ हजार ८५० रुपये दंड आकारला आहे. आपली तक्रार/ माय सोलापूर प वरील अर्जाचा निपरा वेळेत न केल्याने विविध विभागातील १९ कर्मचाऱ्यांना २ हजार ४५० रुपये दंड आकारण्यात आला आहे. महापालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभाग, बांधकाम परवाना, विविध झोन कार्यालय, सार्वजनिक आरोग्य अभियंता विभाग, नगर रचना, भूमी मालमत्ता, कर आकारणी, मलेरिया तसेच इतर संबंधित विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विविध सेवा विहित कालावधीत न दिल्याचे निदर्शनास आले होते. या प्रकरणात नागरिकांच्या तक्रारी अद्याप प्रलंबित असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार विविध विभागातील ३२ कर्मचाऱ्यांवर ही कारवाई करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांना १६ हजार ३०० रुपये दंड आकारण्यात आला आहे.हा दंड त्यांच्या मे २०२६ पेड इन जूनच्या वेतनातून वसूल केला जाणार आहे.



## विद्यापीठात सलग तिसऱ्या दिवशी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे काळ्या फिती लावून आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मे-**

शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या मागण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात सलग तिसऱ्या दिवशी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून आंदोलन केले.

विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्ती कृती समिती यांनी अकृषि विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणे, विद्यापीठातील उर्वरित शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, सातवा वेतन आयोगानुसार रजा रोखीकरण अदा करणे व अन्य न्यायिक प्रलंबित मागण्यासाठी हे आंदोलन सुरू आहे. या मागण्याबाबत तात्काळ व ठोस निर्णय न झाल्यास टप्याटप्याने आंदोलन छेडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील कर्मचारी १४ मे २०२६ पासून काळ्या फिती लावून काम करीत आहेत. या आंदोलनात संघटनेचे अध्यक्ष सुनिल थोरात, रवी शिंदे, प्रशांत चोरमले, वसंत सपताळे, महासंघ उपाध्यक्ष सोमनाथ सोनकांबळे, रवी हुक्कीरे, कांचन आघाव हे पदाधिकारी सर्व सभासद कर्मचारी सहभागी झाले आहेत.

## आयत्या विषयांचा खेळ; साधणार का विकासाचा मेळ?

**झेडपीच्या सभेत ढीगभर प्रश्नांचा धुराळा ; निर्णयांचा तुटवडा मात्र विकासाच्या अपेक्षांचा गोंधळ कायम !**

सोलापूर जिल्हा परिषदेची पहिली सर्वसाधारण सभा पार पडली आणि त्यानंतर जिल्ह्याच्या राजकीय व प्रशासकीय वर्तुळात एकच चर्चा रंगली - सभेत बोलणं जास्त आणि ठोस निर्णय कमी! नवीन सदस्य, नव्या अपेक्षा आणि पहिल्याच सभेत प्रशासनाला धारेवर धरण्याची तयारी अशा वातावरणात ही सभा झाली. पण या सभेने ग्रामीण विकास, प्रशासनाची तयारी, लोकप्रतिनिधींची भूमिका आणि जिल्हा परिषदांच्या बदलत्या कार्यपद्धतीबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले.

सभेतील सर्वात गाजलेला विषय म्हणजे आषाढी वारीसाठी मंजूर झालेली ११ कोटी रुपयांची औषध खरेदी. विशेष म्हणजे हा विषय मूळ अजेंड्यावर नव्हता. ऐनवेळी तो आयत्या वेळेचा विषय म्हणून सभेत आणण्यात आला आणि एकमताने मंजूरही झाला. यामुळे दोन गोष्टी स्पष्ट झाल्या - एक म्हणजे वारीसारख्या मोठ्या धार्मिक सोहळ्याच्या तयारीत प्रशासन उशिरा जागे झाले होते आणि दुसरे म्हणजे अशा महत्त्वाच्या विषयांवर नियोजनाऐवजी तातडीचा मार्ग निवडला जात आहे. वारी ही केवळ धार्मिक परंपरा नाही, तर लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याशी संबंधित जबाबदारी आहे. अशा वेळी औषध खरेदीसारखा विषय आधीच नियोजनात असायला हवा होता. पण तो शेवटच्या क्षणी सभेत आणावा लागला, ही बाब प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरली.या सभेतील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे सदस्यांनी उपस्थित केलेले स्थानिक आणि लोकजीवनाशी निगडित प्रश्न. रिक्त पदे, शिक्षकांची कमतरता, शाळांमध्ये शिपाई नसणे, प्रत्येक तालुक्यात रुग्णवाहिका नसणे, बंद वसतिगृह, अंगणवाडीतील समस्या, ग्रामीण स्वच्छता - हे सर्व मुद्दे प्रत्यक्ष ग्रामीण भागातील वास्तव दाखवणारे होते.

यावरून स्पष्ट होते की, जिल्हा परिषद अजूनही ग्रामीण जनतेच्या मूलभूत गरजांशी थेट जोडलेली संस्था आहे.विशेषतः शाळांमधील शिपायांची कमतरता आणि शिक्षकांवर वाढलेला अतिरिक्त भार हा गंभीर मुद्दा आहे. शिक्षकांकडून अध्यापनासोबत इतर कामे करून घेतली जात असल्याने शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे. त्याचप्रमाणे अनेक शाळांमध्ये शिक्षक नसल्याची बाबही चिंताजनक आहे. शिक्षण हा ग्रामीण विकासाचा पाया असताना अशा मूलभूत गोष्टींकडे दुर्लक्ष होणे धोकादायक आहे.

सभेत पंढरपूर येथील बंद वसतिगृह पुन्हा सुरू करण्याची मागणी झाली. ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह ही केवळ निवासाची सुविधा नसून शिक्षणाची संधी असते. प्रवेशसंख्या कमी असल्याचे कारण देऊन अशी वसतिगृहे बंद करणे म्हणजे अप्रत्यक्षपणे ग्रामीण विद्यार्थ्यांचे शिक्षण कठीण करणे होय.या सभेतील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींमधील सम न्वयाचा अभाव. अनेक सदस्यांनी वरिष्ठ अधिकारी सभेला उपस्थित राहत नसल्याची नाराजी व्यक्त केली. अधिकारी स्वतः न येता प्रतिनिधींना पाठवत असल्याने प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याची तक्रार करण्यात आली. ही बाब केवळ औपचारिकतेपुरती सभा होत असल्याची भावना निर्माण करणारी आहे. लोकशाही व्यवस्थेत सभा म्हणजे केवळ चर्चा करण्याचे व्यासपीठ नसते; तर निर्णय घेण्याची आणि प्रशासनाला जबाबदार धरण्याची प्रक्रिया असते. पण




जर अधिकारी गंभीर नसतील आणि सदस्यांच्या प्रश्नांना स्पष्ट उत्तरे मिळत नसतील, तर अशा सभांचा उद्देशच हरवतो. सभेतील एक वेगळे चित्र म्हणजे सोशल मीडियाचा वाढता प्रभाव. अनेक सदस्य सभागृहात फोटो, सेल्फी आणि रील काढण्यात व्यस्त असल्याचे दिसले. आजच्या काळात प्रसिद्धी महत्त्वाची असली तरी लोकप्रतिनिधींकडून अपेक्षा कामाची असते, केवळ सोशल मीडिया उपस्थितीची नाही. लोकशाही संस्थांचे गांभीर्य टिकवणे हे लोकप्रतिनिधींचेही कर्तव्य आहे.

तथापि, या सभेत काही सकारात्मक बाबीही दिसल्या. पशुसंवर्धन, कुक्कुट विकास, दिव्यांगांसाठी योजना, अंगणवाडी सक्षमीकरण, ग्रामीण रस्ते व पूल विकास यांसारख्या योजनांना मंजुरी देण्यात आली. ग्रामीण विकासासाठी या योजना महत्त्वाच्या ठरू शकतात.विशेषतः दिव्यांगांसाठी शेळीगट आणि ई-बाईक योजना या स्वावलंबनाकडे नेणाऱ्या उपक्रम म्हणून पाहता येतील. सभेत जिल्हा परिषदेचे उत्पन्न वाढवण्यावरही चर्चा झाली. व्यापारी संकुल उभारणे, जागा भाड्याने देणे यांसारखे प्रस्ताव मांडण्यात आले. आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वतःचे उत्पन्न वाढवणे आवश्यक आहे. केवळ शासनाच्या निधीवर अवलंबून राहून विकास शक्य नाही, हे वास्तव आता मान्य करावे लागेल.

एकूणच, जिल्हा परिषदेची ही पहिली सभा अनेक अर्थांनी महत्त्वाची ठरली. सदस्यांनी प्रश्न मांडले, प्रशासनावर दबाव आणला, काही योजना मंजूर झाल्या; पण ठोस आणि दीर्घकालीन निर्णयांचा अभावही प्रकर्षाने जाणवला. लोकप्रतिनिधींनी केवळ प्रश्न उपस्थित करून थांबता कामा नये, तर त्याच्या पाठपुराव्यासाठीही आक्रमक भूमिका घ्यावी लागेल. त्याचप्रमाणे प्रशासनानेही शेवटच्या क्षणी निर्णय घेण्याऐवजी नियोजनबद्ध काम करण्याची गरज आहे.

कारण शेवटी जिल्हा परिषद ही ग्रामीण जनतेच्या आशा-अपेक्षांची सर्वात जवळची संस्था आहे. आणि त्या अपेक्षांना केवळ चर्चेने नव्हे, तर ठोस कृतीने उत्तर द्यावे लागणार आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### जोधपुरी मस्जिदतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**अकलूज, दि. १६ मे-**

हाजी हाफिज फतेह मोहम्मद जोधपुरी मस्जिद राऊतनगर अकलूज यांच्यावतीने दहावी व बारावीतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक प्रा. शेरखान पठाण यांनी केले. मस्जिदचे सचिव युन्नूस तांबोळी यांनी जो विद्यार्थी आत्मपरीक्षण करून अभ्यास करतो. तो नक्कीच यशस्वी ठरतो. जीवनात यशस्वी होण्यास होण्यासाठी परिश्रमाची गरज आहे, असे सांगितले. कार्यक्रमासाठी मस्जिदचे माजी अध्यक्ष दस्तगीर शेख, शागीर सय्यद, सलीम सय्यद, अलीमखान पठाण, सलीमखान पठाण, ॲड.शब्बीर जमादार, जुहूर सय्यद, आसिफ शेख, मोहसीन मुजावर, फारूक बागवान, अकबर शेख, मुसा शेख, शब्बीर शेख, सनी शेख, हुसेन मुल्ला,बाबूलाल तिकोटे आदींनी परिश्रम घेतले. यावेळी अल-फतहा मस्जिदचे अध्यक्ष हमीद मुलाणी, सामाजिक कार्यकर्ते हसन बागवान, समीर बागवान, अलीम तांबोळी, सरफराज सय्यद, सलीम मुलाणी, मोहम्मद शेख, अतीक शेख, समीर तांबोळी, प्रा. शानुरखान पठाण, रहीम सय्यद व पालक वर्ग उपस्थित होता. माळशिरस तालुक्यातील जवळजवळ ४० गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मस्जिदच्या वतीने करण्यात आला. सूत्रसंचालन व आभार मौलाना अब्दुलवाहीद पठाण यांनी मानले.



### ओन्ली संस्थेच्या शिबिरात २०१ लोकांचे रक्तदान

**बार्शी, दि.१६ मे-**

छत्रपती संभाजी महाराज व महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त गुरुवार दि. १४ मे रोजी सकाळी ७ ते ५ या वेळात ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था, बार्शी आयोजित श्रीराम निवास, वाणी प्लॉट, बार्शी येथे रक्तदान शिबीर संपन्न झाले. या शिबिराचे उदघाटन छत्रपती संभाजी महाराज व महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन बार्शी तालुका पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक महेश माने, युवा उद्योजक श्री. विशाल वाणी, अमोल डिसले, वैभव पाटील (प्रदेशाध्यक्ष जनसेवा युवक संघटना) आणि पत्रकार भ. के. गव्हाणे व माजी नगरसेवक बापूसाहेब वाणी यांच्या हस्ते संपन्न झाले. शिबिरामध्ये २०१ रक्तदात्यांनी ऐच्छिक रक्तदान केले. शिबीर यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी, उपाध्यक्ष संतोष शेळगांवकर, सचिव अजय तिवारी, सहसचिव नागनाथ सोनवणे, खजिनदार माणकोजी ताकभाते यांनी परिश्रम घेतले. प्रस्ताविक आणि आभार प्रा. डॉ.चंद्रकांत उलभगत यांनी मानले.

### माळशिरस येथे संगीतमय श्री रामायण कथा सप्ताहाचे आयोजन

**माळशिरस, दि. १६ मे-**

माळशिरस येथील ग्रामदैवत श्री रामदेव व श्री मारुती देव देवस्थान च्या वतीने श्री रामदेव व मारुती देव मंदिरात संगीतमय श्री रामायण कथा सप्ताहाचे सोमवार दिनांक १८ मे ते सोमवार दिनांक २५ मे पर्यंत आयोजन करण्यात आले असून या सप्ताहाचे कथा प्रवक्ते हभप गुरुवर्य कैवल्य महाराज चातुर्मास्ये सदगुरु दादा महाराज संस्थान अनवा व पंढरपूर हे करणार

असून कथेची वेळ रोज दुपारी चार ते सात वाजेपर्यंत असल्याचे मंदिर समितीचे चेअरमन ॲड. मिलिंद कुलकर्णी यांनी सांगितले. या संगीतमय रामायण कथा सप्ताहमध्ये रोज रामायण कथा बरोबरच मंगळवार दिनांक १९ मे रोजी श्री राम जन्म कथा व उत्सव बुधवार दिनांक बुधवार दिनांक २० मे रोजी श्रीराम जानकी विवाह सोहळा व महाप्रसाद रविवार दि. २४ मे रोजी ग्रंथासह नगर प्रदक्षिणा सायंकाळी सहा वाजता सोमवार दि. २५ मे रोजी काल्याचे कीर्तन सकाळी दहा ते बारा व दुपारी एक वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

# समितीच्या अध्यक्षांसह इतर सर्व सदस्य ई-रिक्षाने करणार प्रवास

## गहिनीनाथ महाराज ओसेकर यांची माहिती; इंधन बचतीसाठी विठ्ठल मंदिर समितीचा निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१५ मे -**

जागतिक युद्धाची परिस्थिती आणि त्यामुळे उद्भवू शकणारी संभाव्य इंधन टंचाई लक्षात घेता, पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहनाला येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने अनोखा प्रतिसाद दिला आहे.



शासनाचा पुढील आदेश येईपर्यंत पंढरपूरात मंदिर समितीच्या सहअध्यक्षांसह इतर सर्व सदस्य आता शासकीय किंवा खासगी चारचाकी वाहनांचा त्याग करून केवळ ई-रिक्षा वापरणार आहेत. या महत्त्वाच्या निर्णयाची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

देशातील इंधन साठ्याचा विचार करता भविष्यातील टंचाई टाळण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारने जनतेला इंधन बचतीचे आवाहन केले आहे.

या मोहिमेत स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेत, इंधन बचतीचा संदेश देण्यासाठी मंत्रालयात मोटारसायकलवरून जाऊन एक नवा आदर्श घालून दिला आहे. याच कृतीतून प्रेरणा घेऊन मंदिर समितीने देखील आपल्या कार्यपद्धतीत बदल करण्याचा धाडसी निर्णय घेतला.

दरम्यान नेहमीच व्हीआयपी गाड्यांच्या ताफ्यात वावरणाऱ्या मंदिरे समिती सदस्यांनी पंढरपूर शहरात सामान्य ई-रिक्षाचा पर्याय स्वीकारल्याने प्रशासकीय वर्तुळात देखील याची चर्चा आहे. राष्ट्राची संपत्ती मानून तिचा अपव्यय टाळण्यासाठी हा निर्णय इतर संस्थांसाठीही दिशादर्शक ठरणारा असा आहे.

**सहअध्यक्ष आले पायी चालत**

येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज ओसेकर यांचा प्रदक्षिणा रोडच्या आतील बाजूस चंद्रभागा नदीच्या उध्दव मंदिराच्या बाजूला ओसेकर मठ आहे. सहअध्यक्ष पंढरपूरात आले की त्या ठिकाणी वास्तव्यास असतात. एरव्ही मंदिर समितीच्या बैठकीस किंवा विठ्ठल मंदिरात जाताना ते स्वत:ची किंवा मंदिर समितीच्या चारचाकी गाडीचा वापर करतात. मात्र देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून चारचाकीक गाडी सोडून चक्क ते विठ्ठल मंदिरा पर्यंत पायी चालत दाखल झाले. या पुढे देखील पुढील शासन आदेश येईपर्यंत पंढरपूरात वास्तव्यास असताना आपण मंदिर समितीच्या ई रिक्षाचा वापर करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## घरगणना प्रक्रियेत अचूक माहिती द्यावी : डॉ. गवळी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १६ मे-**

भारत सरकारच्या वतीने संपूर्ण देशामध्ये जनगणना २०२७ या राष्ट्रीय मोहिमेचा शुभारंभ दि. १६ मे पासून होत आहे. मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात दि. १६ मे पासून घरयादी व घर गणना करण्यात येणार आहे. या राष्ट्रीय कार्यात सांगोला शहरातील सर्व नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून प्रगणकांना अचूक माहिती द्यावी असे आवाहन जनगणना चार्ज अधिकारी तथा मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी केले आहे.



सांगोला शहरातील सर्व नागरिकांनी आपल्या कुटुंबाची, घराची आणि सुविधांची माहिती अचूक व पूर्णतः सत्य द्यावी. तसेच आपल्या घरी येणाऱ्या प्रगणकांनी विचारलेल्या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे देऊन सहकार्य करावे. प्रगणक हे शासकीय ओळखपत्र धारण केलेले असतील. जनगणना करण्यासाठी दिलेली माहिती ही पूर्णतः गोपनीय ठेवली जाते व तिचा वापर सांख्यिकीय हेतूसाठी केला जातो. प्रगणकाकडून विचारल्या जाणाऱ्या ३४ प्रश्नांची उत्तरे देणे नागरिकांवर बंधनकारक आहे. ज्यांनी स्वगणना केलेली आहे. अशा नागरिकांनी त्यांना प्राप्त झालेला एस ई आयडी क्रमांक आपल्या घरी आलेल्या प्रगणकांना देण्याचेही अवाहन डॉ. सुधीर गवळी यांनी केले आहे.

**खोटी उत्तरे, माहितीस नकार; अदखलपात्र गुन्हा**

जनगणना कायदा १९४८ नुसार प्रत्येक नागरिकांनी अचूक माहिती देणे हे कायदेशीर बंधन आहे. यात कसूर केल्यास दंडात्मक आणि कायदेशीर कारवाईची तरतूद केली आहे.

**– डॉ.सुधीर गवळी,**
जनगणना चार्ज अधिकारी

## वेळापुरात १०९ जणांचे रक्तदान

### धर्मवीर संभाजी महाराज व गौतम बुद्ध जयंतीनिमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.१६ मे-**

वेळापूर येथील पालखी चौक परिसरात तथागत भगवान गौतम बुद्ध तथा धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन वेळापूरचे सरपंच रजनीश बनसोडे यांच्या वतीने करण्यात आले. यावेळी १०९ जणांनी रक्तदान केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज व गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिबिराचे उद्धाटन आमदार उत्तमराव जानकर, जि.प. सदस्या मीनाक्षी सरतापे, पं.स. सदस्या विमल जानकर, सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासो मुंगूसकर, रिपाई आठवले तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, जीवन जानकर तसेच माजी उपसरपंच जावेद मुलाणी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी सरपंच



माणिक चव्हाण, माजी उपसरपंच शंकरराव काकुळे, अमृतराव माने-देशमुख, डॉ. शिवाजी पनासे, मदनसिंह माने देशमुख, विजय बनसोडे, धनाजी धांडोरे, दिलीप बनसोडे, विठ्ठल पिंगळे, डॉ. अमित गायकवाड, युवराज मंडले, रणजीत सरवदे, प्रदीप सरवदे, राजू जाधव, अजीत साठे, नागेश क्षिरसागर, स्वप्निल सरवदे, अमेय काकुळे उपस्थित होते. शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठी सिद्धेश्वर ब्लड बँक, सोलापूर यांचे सहकार्य लाभले.

## पाण्याच्या टँकर चालकाची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ मे-**

बार्शी शहरातील गाडेगाव रोड परिसरातील रहिवासी असलेल्या एका पाण्याच्या टँकर चालकाने गळफास घेऊन आत्म हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना परंडा रोडवरील कब्रस्तान परिसरात, ए-वन फर्निचरसमोरील झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत शुक्रवारी पहाटे निदर्शनास आली.



बाबासाहेब शिवाजी बारकुल (वय ४३, रा. गाडेगाव रोड, बार्शी) हे पाण्याच्या टँकरवर चालक म्हणून काम करुन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. गुरुवार दि. १४ मे रोजी ते पाण्याची खेप आल्याने कामासाठी घरातून बाहेर पडले होते. मात्र रात्री उशिरापर्यंत ते घरी न परतल्याने त्यांच्या मुलाने मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, संबंधित मोबाईलवर पोलिसांनी फोन उचलून मुलाला परंडा रोडवरील कब्रस्तानाजवळ बोलावले. तेथे पोहोचल्यानंतर बाबासाहेब बारकुल यांनी झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची माहिती कुटुंबीयांना देण्यात आली. यानंतर कुटुंबीयांनी घटनास्थळी धाव घेतली. या प्रकरणी पत्नी मीरा बाबासाहेब बारकुल यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात खबर दिली असून, त्यानुसार आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोहेकॉ मनोज जाधव यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी व तीन मुले असा परिवार आहे.घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## वैरागमध्ये समाधान शिबिरात १६०० पेक्षा जास्त प्रकरणांचा निपटारा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १६ मे-**

बार्शी तहसील कार्यालयातर्फे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबीर वैराग येथे आज पार पडले. शहाजीराव सांस्कृतिक भवन येथे झालेल्या शिबिराला नागरिकांचा विक्रमी प्रतिसाद लाभला.

नागरिकांना दाखले, प्रमाणपत्रे आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी या शिबिराचे सूक्ष्म नियोजन केले होते. कार्यक्रमास बार्शीचे तहसीलदार एफ.आर. शेख, पंचायत समिती उपसभापती संतोष निंबाळकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती बाबा गायकवाड, वैराग नगरपंचायत उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यासोबतच नायब तहसीलदार रवींद्र सानप, मुख्याधिकारी विद्या पाटील, मंडल अधिकारी आण्णासाहेब लांडगे, पुरवठा निरीक्षण अधिकारी निलेश आठवले, उपाधीक्षक भूमी अभिलेख रेश्मा तांबारे, दुय्यम निबंधक संगीता विटकर उपस्थित होते.



एकाच दिवसात दाखले वितरण (सेतू +संजय गांधी योजना) ६४०, आरोग्य तपासणी (मोफत शिबिर)१८३, डिजिटल ७/१२ उतारा वितरण १६९, डिजिटल ८-अ उतारा वितरण १४७, आयुष्मान भारत कार्ड १२०, रेशन कार्ड दुरुस्ती (प्रकरणे/अर्ज)१०९, महिला व बाल विकास (बेबी किट, प्रमाणपत्रे) ७१, नगरपंचायत दाखले ४३, आधार अद्ययावतीकरण व नवीन आधार ३८, भूमी अभिलेख (उतारा वाटप)२५, कृषी विभाग (दाखले/प्रमाणपत्रे)२०, फेरफार निकाल (निकाली काढलेले)१७, पंचायत समिती (वाळू वाटप पावती/इतर)१०, लाभ कार्ड १०, स्वीकारलेले नवीन अर्ज २७ अशी एकूण १६३१ इतकी प्रकरणे निकाली काढण्यात आली.

**लोकहितकारी कामांवर आमचा भर**


मार्च महिन्यापासून सुरू असलेल्या या अभियानाचा वैराग येथील टप्पा अत्यंत यशस्वी ठरला असून, यापुढेही अशाच लोकहितकारी कामांवर आमचा भर राहील.

**एफ.आर.शेख,** तहसीलदार, बार्शी.

## टेंभुर्णी-कुर्डुवाडी-बार्शी-लातूर मार्गाच्या चौपदरीकरणाला गती

### गडकरींकडून लवकर मंजुरीचे आश्वासन

### मा. आ. राजाभाऊ राऊत यांच्या पाठपुराव्याला यश



**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१६ मे-**

अक्कलकोट येथे विविध विकास कामांच्या उद्धाटन समारंभात रस्ते वाहतूक व महामार्ग खात्याचे केंद्रीयमंत्री ना. नितीन गडकरी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असताना टेंभुर्णी-कुर्डुवाडी-बार्शी लातूर या महत्त्वाच्या मार्गाच्या चौपदरीकरणाचा विषय पुन्हा एकदा चर्चेत आला. यावेळी माजी आमदार राजाभाऊ राऊत यांनी या रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी डीपीआरला मान्यता देऊन प्रशासकीय मंजुरी तातडीने द्यावी, अशी मागणी केंद्रीय मंत्री गडकरी यांच्याकडे केली.

सोलापूर, धाराशिव आणि लातूर या तीन जिल्ह्यांना जोडणारा टेंभुर्णी- कुर्डुवाडी- बार्शी- लातूर मार्ग हा व्यापारी, औद्योगिक आणि कृषी वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्यावर वाढती वाहतूक, अपघातांचे प्रमाण आणि खराब अवस्थेत वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या मार्गाचे चौपदरीकरण ही परिसरातील नागरिकांची दीर्घकालीन मागणी बनली होती.

मा. आ. राजाभाऊ राऊत यांनी केंद्रीय मंत्री गडकरी यांच्यासमोर या रस्त्याचे महत्त्व विशद करताना सांगितले की, हा मार्ग विकसित झाल्यास औद्योगिक गुंतवणुकीला चालना मिळेल, कृषी उत्पादनांच्या वाहतुकीला गती मिळेल तसेच मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील संपर्क अधिक मजबूत होईल. याशिवाय वाहतूक कोंडी कमी होऊन अपघातांचे प्रमाण घटण्यासही मोठी मदत होणार आहे. या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद देताना केंद्रीय मंत्री गडकरी यांनी संबंधित रस्त्याच्या कामाला लवकरात लवकर प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याचा शब्द दिला. तसेच प्रत्यक्ष कामालाही गती देण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे सोलापूर, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांच्या आर्थिक विकासाला नवे बळ मिळणार असल्याची भावना स्थानिक नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. कार्यक्रमावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार सुभाष देशमुख, आ. विजयकुमार देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, आमदार समाधान आवताडे, मा. आ. रामभाऊ सातपुते, जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, शहाजी पवार तसेच सोलापूर शहराध्यक्षा रोहिणीताई तडवळकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## बार्शीत छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

### महिलांच्या हस्ते दुग्ध व जलाभिषेक; मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. १६ मे-**

बार्शी शहरात गुरुवार दि. १४ मे रोजी छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी झाली. विविध सार्वजनिक मंडळे, सामाजिक संस्था आणि संघटनांच्या वतीने विविध कार्यक्रम पार पडले.

आमदार दिलीप सोपल, माजी आमदार राजेंद्र राऊत, नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, पंचायत समिती सभापती मीनाक्षी रोंगे, माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले, योगेश सोपल, गणेश जाधव, विजय राऊत, रणवीर राऊत, कृष्णराज बारबोले, अभिजीत राऊत, उज्वला सोपल, कविता राऊत, ॲड. राजश्री तलवाड-डमरे यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

छावा प्रतिष्ठानच्यावतीने जयंतीनिमित्त विशेष सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. बार्शी शहरातील विविध क्षेत्रातील महिलांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या मूर्तीला दुग्ध व जलाभिषेक करण्यात आला. तसेच संभाजी महाराज लिखित 'बुधभूषण' ग्रंथाचे पूजन करण्यात आले. स्त्रियांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनांविरोधात जनजागृतीच्या उद्देशाने महिला अत्याचारावर आधारित देखावा सादर केला.

कार्यक्रमासाठी नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, पंचायत समिती सभापती मीनाक्षी रोंगे, कविता राऊत, ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षिका शीतल बोपलकर आदी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सायंकाळी शिवसृष्टीसमोर मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळातर्फे मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके करण्यात आली. यामध्ये मावळ्यांच्या वेशभुषेत मुलांनी व



नऊवारी साडी नेसून मुलींनी तलवारबाजी, भाला-काठ्या, दांडपट्टा इत्यादी शिवकालीन मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके करून दाखवली.

**पारंपारिक वाद्यांसह पदयात्रा**

छावा प्रतिष्ठानच्यावतीने सायंकाळी ६ वाजता शहरातील प्रमुख मार्गांवरुन पारंपरिक वाद्यांच्या गजरात निघालेल्या या पदयात्रेत वारकरी संप्रदायातील लहान मुले–मुली हातात टाळ घेऊन सहभागी झाल्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमासाठी छावा प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**मराठा सेवा संघातर्फे सार्वजनिक वाचनालय**

मराठा सेवा संघ बार्शी शहर व तालुक्याच्यावतीन जयंतीनिमित्त छत्रपती संभाजी महाराज सार्वजनिक वाचनालय सुरु करण्यात आले. याचे उद्घाटन भाजयुमोचे सोलापूर जिल्हाध्यक्ष ॲड. रणवीर राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, सभापती मीनाक्षी रोंगे, डॉ. संजय अंधारे, नारायण जगदाळे, संतोष मोळवणे, जिल्हाध्यक्ष डॉ. गोरख देशमुख, जिजाऊ ब्रिगेड अध्यक्षा उज्वला साळुंखे, किरण गाढवे, रावसाहेब यादव, माधव देशमुख, प्रा. कल्याण घळके, प्रशांत कथले, प्रशांत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

CMYK

आपला
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## धोत्रेजवळ रेल्वेतून पडून इसमाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ मे-**

तालुक्यातील धोत्रे गावच्या हद्दीत रेल्वे मार्गालगत एका इसमाचा मृतदेह आढळून आला. सदर घटना गुरुवारी (दि.१४ मे) उघडकीस आली.

धोत्रे येथील पोलीस पाटील दत्तात्रय जाधवर यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात खबर दिली. गुरुवारी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास बार्शी रेल्वे स्टेशन मास्टर तसेच गावातील काही नागरिकांकडून त्यांना फोनद्वारे माहिती मिळाली की, धोत्रे गावच्या हद्दीत शेत गट क्रमांक ४५२ जवळ रेल्वे ट्रॅकच्या दक्षिण बाजूस एका पुरुष जातीच्या इसमाचा मृतदेह पडलेला आहे.

माहिती मिळताच दत्तात्रय जाधवर यांनी घटनास्थळी धाव घेतली. तेथे मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी जमली होती. खात्री करुन पाहिले असता रेल्वे ट्रॅकच्या पोल क्रमांक ४२१ (१४) ते ४२१ (१५) दरम्यान, ट्रॅकपासून सुमारे सात फूट अंतरावर अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयोगटातील अनोळखी पुरुष मृतावस्थेत आढळून आला.मृत इसमाची ओळख अद्याप पटलेली नसून, बार्शी तालुका पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करुन तपास सुरु केला आहे.



# ‘त्या’ कंत्राटी कर्मचाऱ्याची सेवा समाप्त

## गुन्हा दाखल; मोफत सेवेसाठी घेतले पैसे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ मे-**

भाविकांसाठी मोफत सेवा असताना मंदिर समितीच्या ई रिक्षासाठी भाविकाकडून पैसे घेणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यावर मंदिर समितीकडून कारवाईचा बडगा उगारला आहे. सीसीटिव्हीत हा प्रकार समोर आल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्याची सेवा समाप्त करुन गुन्हा दाखल केल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर मार्फत वयोवृद्ध, दिव्यांग तसेच गरोदर महिला भाविकांसाठी मंदिर परिसरात मोफत ई-रिक्षा सेवा उपलब्ध करून दिली आहे. सदर सेवेसाठी बीव्हीजी इंडिया लिमिटेड, पुणेमार्फत कंत्राटी पद्धतीने वाहन चालक नियुक्त केले आहेत. यामधील कुणाल राजेंद्र घोडके (रा. पंढरपूर ) या कंत्राटी कर्मचाऱ्याने भाविकांकडून पैसे स्वीकारल्याचा प्रकार सीसीटीव्ही चित्रिकरणामध्ये शुक्रवारी (दि.१५) रात्री ८.२५ वाजता श्री संत नामदेव पायरी येथील मुखदर्शन रांगेच्या गेट क्रमांक एक येथे निदर्शनास आला.

सदर प्रकार अत्यंत गंभीर स्वरूपाचा असून संबंधित कर्मचाऱ्याची सेवा तात्काळ कायमस्वरूपी संपुष्टात आणुन त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या बरोबरच बीव्हीजी इंडिया लिमिटेड, पुणे यांनाही कारणे दाखवा नोटीस बजावल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

### मंदिर समितीशी संपर्क साधावा

मंदिर समिती मार्फत उपलब्ध केलेली ई-रिक्षा सेवा पूर्णपणे मोफत आहे. कोणत्याही व्यक्तीकडून शुल्काची मागणी केल्यास तात्काळ मंदिरसमितीकडे तक्रार नोंदवावी. मंदिर समिती अशा घटनांकडे गांभीर्याने पाहत असून संबंधितांवर कठोर कारवाई करील.

**-प्रविणकुमार घम,**
**व्यवस्थापक, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती.**

# टेंभुर्णी-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग होणार चौपदरी

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची घोषणा; खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १६ मे-**





माढा लोकसभा मतदारसंघातील महत्त्वाचा प्रश्न असलेल्या टेंभुर्णी-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ५६१ एच्या चौपदरीकरणाला अखेर गती मिळाली आहे. फलटण ते पंढरपूर पालखी मार्गाच्या पाहणी दौऱ्यावर असताना केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी या महामार्गाच्या चौपदरीकरणाची घोषणा केली.

खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी टेंभुर्णी ते पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. वाढती वाहतूक, वारकऱ्यांची मोठी संख्या, अपघातांचे वाढते प्रमाण आणि वाहतूक कोंडी यामुळे हा मार्ग चौपदरी करण्याची मागणी त्यांनी दिल्ली येथे नितीन गडकरी यांना भेटून केली होती. मागणीची दखल घेत गडकरी यांनी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांना पाठविलेल्या पत्रात टेंभुर्णी-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी डीपीआर (सविस्तर प्रकल्प अहवाल) तयार करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू केल्याचे सांगितले होते. डीपीआर अहवालानुसार पुढील कार्यवाही करणार असल्याचेही नमूद केले होते.

पंढरपूर हे देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रांपैकी एक असून आषाढी व कार्तिकी वारीदरम्यान लाखो भाविक येथे येतात. तसेच हा मार्ग एनएच-६५ आणि एनएच-९६५ यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. अनेक गावं, बाजारपेठा आणि साखर कारखान्यांसाठीही अत्यंत महत्त्वाचा आहे. महामार्गाच्या चौपदरीकरणामुळे वाहतूक सुलभ होऊन अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मोठी मदत होणार आहे. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे या महत्त्वाच्या प्रकल्पाला चालना मिळाल्याने माढा लोकसभा मतदारसंघातील नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

## महत्त्वाचे...



### महाप्रसादालयामुळे पर्यटनाला नवी दिशा

#### राहुल साकोरे-बोर्डीकर यांनी दिली अन्नछत्र मंडळाला भेट

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १६ मे -**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या अत्याधुनिक महाप्रसादालयामुळे श्री क्षेत्र अक्कलकोटच्या विकासाला चालना मिळणार असून पर्यटनाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास पुणे गृहनिर्माण मंडळ (म्हाडा) चे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून आधुनिक पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात येत आहे. या उपक्रमांमुळे भाविकांसाठी सुविधा वाढत असून अक्कलकोटच्या धार्मिक व पर्यटन विकासात महत्त्वाची भर पडत आहे.

राहुल साकोरे-बोर्डीकर हे अन्नछत्र मंडळाला भेट देण्यासाठी आले असता न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी मंडळाच्या कामकाजाचे कौतुक करत महाप्रसादालय प्रकल्पाचे विशेष महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमास म्हाडा सोलापूर व पुणे विभागातील हरिदास देशमुख, सुमित उबाळे ,सुरज अजनाळकर यांच्यासह मनोज निकम, प्रवीण देशमुख, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, मल्लिकार्जुन गवळी, महांतेश स्वामी, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.




### दिलीप पाटील यांनी केला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. १६ मे-**

राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत देशात सर्वांचे रेकॉर्ड मोडत भरघोस मतांनी निवडून आल्याबद्दल अक्कलकोट राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटाचे नेते दिलिप पाटील यांनी सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### पिलीव येथे गुटखा विक्री करणाऱ्यावर गुन्हा


**पिलीव, दि. १६ मे-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील बाळु माणीक सातपुते याच्या दुकानावर उपविभागीय पोलिस अधिकारी अकलूज यांनी छापा मारुन १७ हजार रुपयाचा गुटखा जप्त केला. मात्र यातील आरोपी सध्या फरार असून पोलिसांकडून सध्या शोध सुरु आहे. याचा अधिक तपास उपविभागीय पोलिस अधिकारी वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस नाईक सचिन डुबल हे करीत आहेत.

# निमगाव (ह) येथील धरणग्रस्तांच्या लढ्यास यश

## रश्मी बागल यांच्या हस्ते ९ कोटी ६१ लाखांचा धनादेश सुपूर्त

**तभा वृत्तसेवा.**
**करमाळा, दि. १६ मे -**



करमाळा तालुक्यातील पूर्व भागातील निमगाव (ह) येथील धरणग्रस्त शेतकरी २७-२८ वर्षा पासून भू संपादन झालेल्या शेत जमिनीचा वाढीव मोबदला मिळावा म्हणून सतीश नीळ यांच्या नेतृत्वाखाली संघर्ष करत होते. यास अखेर यश मिळाले असून हे काम मार्गी लावण्यासाठी भाजप जिल्हा परिषद गट नेत्या रश्मी बागल यांच्याहस्ते त्यांना ९ कोटी ६१ लाख रुपयांचा धनादेश सुपुर्त केला.

रश्मी बागल, युवा नेते दिग्विजय बागल यांनी धरणग्रस्त संघटनेचे अध्यक्ष सतीश नीळ यांना सोबत घेऊन अनेक वेळा जिल्हाधिकारी, पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. तसेच ॲड. सूर्यकांत सरडे यांनीही धरणग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी काम केले. याचाच परिपाक म्हणून आज ९ कोटी ६१ लाख ९१ हजार रुपये निधी मंजूर होऊन त्याचा धनादेश उपविभागीय अधिकारी माढा कुर्डुवाडी यांचे प्रतिनिधी तथा तहसीलदार शिल्पा ठोकडे यांच्याकडे सुपूर्त केला. यावेळी रश्मी बागल, ॲड. सूर्यकांत सरडे, तहसीलदार शिल्पा ठोकडे यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह देऊन विशेष सन्मान करून ऋण व्यक्त करण्यात आले. या प्रसंगी श्री मकाई साखर कारखाना चेअरमन दिनेश भांडवलकर, संचालक राम हाके, संचालक सचिन पिसाळ, नगरसेवक दीपक चव्हाण, विजय लावंड, प्रकाश नीळ, आंबऋषी भील, धर्मराज जगताप, लक्ष्मण रोकडे, दत्ता साळूंके, धनंजय नीळ, निमगावचे माजी चेअरमन अतुल नीळ, राजेंद्र भील, विष्णु नीळ, कालिदास नीळ, सोमनाथ जगदाळे, हनुमंत अतकरे, विकास रोकडे, सुदाम साळुंके आदी धरणग्रस्त शेतकरी उपस्थित होते.

### २८ वर्षांपासूनचा लढा यशस्वी

गेल्या २७-२८ वर्षापासून लढा सुरू होता. त्यास पालकमंत्री जयकुमार गोरे, भाजप महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल, युवा नेते दिग्विजय बागल व ॲड. सूर्यकांत सरडे यांचे मोलाचे सहकार्य मिळाल्याने यश मिळाले आहे.

**- सतीश नीळ, अध्यक्ष, सीना कोळेगाव धरणग्रस्त संघटना.**

# शेतकऱ्यांचे लक्ष कर्जमाफीकडे; मे महिन्यात होणार का निर्णय ?

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १६ मे-**

विधानसभा निवडणुकीत महायुतीने शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा निर्णय जाहीर केला होता. याची अंमलबजावणी करण्याच्या हालचाली शासनाने सुरु केल्या आहेत. आता शेतकरी कर्जमाफीकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. मे महिन्यात हा निर्णय होतो का याची प्रतिक्षा आहे.

कर्ज माफीसाठी शासनाने प्रवीणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. समितीने आपला अहवाल एप्रिल महिन्यात शासनाला सादर केला आहे. शासनाने ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पिक कर्ज थकीत असणाऱ्या शेतकऱ्यांना लाभ देण्याचे जाहीर केले आहे. यासाठी थकबाकीदार व नियमीत कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांची शासनाने बँका व सोसायट्यांकडून जवळपास ५४ प्रकारची माहिती घेतली आहे. अंदाजे १ एप्रिल २०२२ ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतचे थकबाकीदार व नियमीत कर्ज फेड करणाऱ्या शेतकऱ्यांची संपुर्ण माहिती संकलित केली आहे. शासनाने बँक व सोसायट्यांकडून शेतकऱ्यांची माहिती घेतली आहे यामध्ये बँक शाखा, आयएफएससी कोड, सभासद क्रमांक, संस्था आयडी, आधार क्रमांक, नाव ,लिंग, जात, मोबाईल नंबर, पत्ता आदी संपुर्ण कर्जदार तसेच नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्याची माहिती संकलित केली आहे.

शासनाने जाहीर केलेल्या निकषानूसार कर्जमाफी होणार आहे.दोन लाखापर्यंत थकबाकीदार शेतकऱ्याची व नियमित कर्ज फेड करणाऱ्यांना पन्नास हजार रुपये अशी घोषणा शासनाने केली आहे.

### नियमित कर्ज फेड करणाऱ्यांना तुटपुंजी माफी

नियमित कर्ज फेड करणाऱ्या शेतकऱ्यांना फक्त पन्नास हजार रुपयांची तुटपुंजी माफी जाहीर केली आहे. आम्ही जिवाचा आटापिटा करुन तसेच अडचणींवर मात करीत दरवर्षी नियमित कर्ज फेड केली हा गुन्हा केला का असा संतप्त सवाल नियमीत कर्ज फेड करणाऱ्या शेतकऱ्यांकडून विचारला जात आहे.

## कांदा उत्पादकांना प्रति किलो ५ रुपये अनुदान

### माढा तालुका किसान मोर्चाच्या मागणीला यश

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १६ मे-**

कांदा उत्पादकांना कमी दर मिळत असल्याने भाजप किसान मोर्चा माढा तालुकाध्यक्ष नंदकुमार मोरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कांदा उत्पादकांना प्रति किलो ५ रुपये अनुदानाची मागणी निवेदनाद्वारे केली होती. त्यानूसार मुख्यमंत्र्यांनी प्रति किलो ५ रुपये अनुदान दिल्याची माहिती मोरे यांनी दिली.

मुख्यमंत्र्यांनी १२.३५ पैसे दराने कांदा खरेदी चालू केली आहे. सध्या बाजारात कांदा ७/८ रुपये प्रति किलो दराने विक्री होत आहे. या नवीन खरेदी दराने शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्याचे मोरे यांनी सांगितले: सरकारने कांदा खरेदी चालू केल्याने शेतकऱ्यात आनंदाचे वातावरण पसरले असून किसान मोर्चाच्या मागणीला यश मिळाले आहे. सीना नदीला आलेल्या पूरप्रसंगी किसान मोर्चातर्फे मुख्यमंत्र्यांकडे विशेष पॅकेजद्वारे शेतकऱ्यांना सावरण्यासाठी मदत करण्याची मागणी केली होती. ही मागणी त्यांनी तत्वत: मागणी मान्य करून शेतकऱ्यांना भरघोस मदत करणार असल्याचे त्यांनी सांगितले. किसान मोर्चा शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. वेळोवेळी प्रश्न मार्गी लावण्यासाठी सहकार्य करत आहे. सदर निवेदन भाजप जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, भाजप नेते रणजित शिंदे, भाजप तालुकाध्यक्ष योगेश पाटील, राज्य परिषद सदस्य दत्तात्रय जाधव, प्रकाश कुलकर्णी, राहुल केदार, विवेक कुंभेजकर, प्रताप व्यवहारे यांच्या मार्गदर्शनाखाली दिल्याचे नंदकुमार मोरे यांनी सांगितले.

## अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवले; आरोपीचा जामीन अर्ज मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ मे-**

आरोपीने फिर्यादीस फूस लावून पळवून नेले आहे, अशी फिर्याद दिल्याने फिर्यादीवरुन वैराग पोलीस ठाणे भारतीय संहिता कलम ६४ (२) (एम), ३५१ (२) भा.न्या.सं. सह बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (POSCO) कलम ८,१२,४२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास करीत असताना, यातील पिडीत मुलगी निर्भया अ.ब.क. हिस आरोपी याने फुस लावुन पळवून यातील आरोपी याने वारंवार तिचे इच्छेविरुध्द तिचेसोबत शारीरीक संबंध ठेवले असल्याचे सांगितले. सदरबाबत फिर्यादीचा जबाब नोंद करण्यात आला आहे. यातील आरोपी हा सदर पिडीत मुलीसोबत मिळून आलेने नमूद आरोपींकडे सदर गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी करुन, त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे कबूल केला. सदर प्रकरणात आरोपीच्यावतीने ॲड. अनिकेत सहदेव गुंड यांनी न्यायालयीन रणनीती आणि कुशल युक्तिवाद मांडून आरोपींना न्याय मिळवून दिला. या युक्तिवादामुळेच न्यायालयाने आरोपीचा जामीन अर्ज मंजूर केला. आरोपीतर्फे ॲड. अनिकेत गुंड यांनी काम पाहिले.

## महूद येथील फुटलेली गटार दुरुस्त करण्याची मागणी

**सांगोला, दि. १६ मे-**



सांगोला तालुक्यातील महूद गावातून जाणाऱ्या पंढरपूर-मल्हारपेठ राज्य मार्गावरील उत्तर व दक्षिण बाजूचे गटार बांधकाम फुटले असून मोठ-मोठे तडे गेले आहेत. संबंधित विभागाने लवकरात लवकर फुटलेली गटार दुरुस्त करून देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात आली आहे. गटार बांधकाम फुटल्यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झालेला आहे. त्यामध्ये कचरा व घाण पाणी साठल्यामुळे डास निर्माण झाले आहेत. तसेच उग्र वास येत आहे. संबंधित विभागाने याची दखल लवकर नाही घेतली तर आम्ही मोठे जनआंदोलन करू असा इशारा महूद येथील सामाजिक कार्यकर्ते दिलीप केसकर, नितीन सरतापे, पवन बाजारे यांनी दिला आहे.

# आमचा ध्यास ग्रामीण भागाचा विकास : प्रा. प्रमोद आवताडे

## श्रीकृष्ण शैक्षणिक समूहाच्या वतीने गुणवंतांचा सत्कार व करिअर मार्गदर्शन मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १६ मे-**



श्रीकृष्ण शैक्षणिक समूहाने मोहोळ तालुक्यात प्रथम क्रमांकाचा निकाल लावून आपली गुणवत्ता आणि विश्वासार्हता आधीच सिद्ध केली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहराच्या तोडीस तोड आणि उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे, हाच आमचा एकमेव ध्यास आहे, असे प्रतिपादन श्रीकृष्ण शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रमोद आवताडे यांनी केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण, कडक शिस्त आणि भारतीय संस्कृतीचे संस्कार मिळावेत या उद्देशाने कार्यरत असलेल्या श्रीकृष्ण शैक्षणिक समूहाच्या वतीने एक स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. एम. बी. चव्हाण गुरुकुल (कामती खुर्द) येथे इयत्ता १० वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार सोहळा आणि ‘१० वी नंतर पुढे काय?’ या विषयावर मार्गदर्शन मेळावा उत्साहात आणि मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या पालक-विद्यार्थ्यांच्या साक्षीने पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

या सोहळ्याला प्रमुख मार्गदर्शक म्हणून लातूर पॅटर्नचे तज्ज्ञ ऋषिकेश जवळगे उपस्थित होते. त्यांनी पालकांशी संवाद साधताना सांगितले की, आजकाल शाळा-कॉलेजचा केवळ बाह्य झगमगाट पाहून प्रवेश घेण्याची चूक केली जाते. पालकांनी झगमगाटावर न जाता संस्थेची खरी गुणवत्ता आणि पूर्वइतिहास पाहूनच आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करावा. विद्यार्थ्यांनीही आपल्या घरच्या परिस्थितीची जाणीव ठेवून पूर्ण लक्ष शिक्षणावर केंद्रित केले पाहिजे. यावेळी त्यांनी ११ वी आणि १२ वी सायन्स शाखेचे महत्त्व पटवून देत, १२ वी नंतर उपलब्ध असणाऱ्या विविध करिअरच्या संधींवर सविस्तर प्रकाश टाकला. तसेच प्रा. सुनील गरड यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, १० वी ही विद्यार्थ्यांच्या यशाची पहिली पायरी आहे. त्यामुळे या टप्प्यावर जाहिरातबाजीला बळी न पडता, विद्यार्थ्यांच्या भविष्याला योग्य आकार देणाऱ्या संस्थेची निवड करणे अत्यंत गरजेचे आहे. पुढे बोलताना प्रा. आवताडे म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना भविष्यातील जागतिक स्पर्धेत टिकवून ठेवण्यासाठी श्रीकृष्ण शैक्षणिक समूहाने हे संस्कारक्षम व्यासपीठ उभे केले असून, पालकांनी १० वी नंतर पाल्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी श्रीकृष्ण समूहाची निवड करावी, असे आवाहनही त्यांनी केले. मेळाव्यासाठी प्रा. ऋषिकेश जवळगे (भौतिकशास्त्र), प्रा. निरंजन बनसुडे (रसायनशास्त्र), प्रा. अविनाश गायकवाड (जीवशास्त्र), प्रा. मोहम्मद आफताब अंसारी (गणित), प्रा. गौरी त्रिभुवन (इंग्रजी) तसेच पालक प्रतिनिधी म्हणून रमेश आवताडे व गायकवाड यांची उपस्थित होते.

इयत्ता १० वीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करून संस्थेचे आणि पालकांचे नाव लौकिक करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा, संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रमोद आवताडे यांच्या हस्ते ट्रॉफी आणि पुष्पगुच्छ देऊन विशेष गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. पाटील यांनी केले. आभार एम. बी. चव्हाण गुरुकुलचे मुख्याध्यापक आप्पासाहेब कोळी यांनी मानले. कार्यक्रम संपल्यानंतर संस्थेच्या वतीने उपस्थित सर्व विद्यार्थी आणि पालकांसाठी ‘स्नेहभोजनाचे’ अतिशय उत्तम आयोजन करण्यात आले होते.